# स्फुलिंग

अंक २, एप्रिल २०१५

रु. २०




- चांगल्या दिवसांचे वास्तव आणि पर्यायाचा सवाल
- दिल्ली मध्ये 'आम आदमी पक्षा'चा विजय आणि कष्टकरी जनतेसाठी काही धडे
- महाराष्ट्रात कामगार हितांवर घाला
- भारतीय विज्ञान परिषद - वैज्ञानिक तर्कपद्धतीचे श्राद्ध घालण्याची तयारी
- नफाखोर व्यवस्थेत प्रभावहीन ठरताहेत जीवन-रक्षक औषधे
- 'गांधी'कार रिचर्ड ॲटनबरो यांना खुले पत्र
- जवखेड दलित हत्याकांडाने पुन्हा उघडकीस आणले व्यवस्थेचे वास्तव

# हुतात्मा भगतसिंह, राजगुरू आणि सुखदेव यांच्या हौतात्म्य दिना (२३ मार्च) निमित्त







प्रगती घडवायला सज्ज ठाकलेल्या माणसाला जुन्या श्रद्धेतील प्रत्येक बाबीबद्दल टीका करावी लागते, अविश्वास दाखवावा लागतो व तिला आव्हान द्यावे लागते. प्रचलित श्रद्धेचा कानाकोपरा धुंडाळून त्याला प्रत्येक लहानसहान बाबींची विवेकनिष्ठ चिकित्सा करावी लागते. अशा बऱ्याच विचारांती जर त्याला एखाद्या सिद्धान्तावर किंवा तत्त्वज्ञानावर विश्वास ठेवणे योग्य वाटले, तर त्याच्या विश्वासाचे आपण स्वागत करू. त्याची विचारपद्धती चूक असू शकते, चुकीच्या मार्गाने गेलेली असू शकते किंवा खोटी व फसवी असू शकते. पण त्याच्या विचारांमध्ये सुधारणा होऊ शकते, कारण विवेकबुद्धी हा त्याच्या जीवनाचा दिशादर्शक ध्रुवतारा असतो.

**मी नास्तिक का आहे? ( ऑक्टोबर, १९३० मध्ये लिहिलेला लेख )**

आम्ही हे सांगू इच्छितो की युद्ध पेटले आहे, आणि जोपर्यंत मूठभर बलवान बांडगुळे स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी, भारतातील मोलमजुरी करणाऱ्यांच्या आणि सामान्य जनतेच्या निसर्गदत्त साधनांचे शोषण व लूट करत राहतील, तोपर्यंत हे युद्ध चालू राहील- मग ते शुद्ध ब्रिटिश भांडवलदार असोत किंवा ब्रिटिश-भारतीय असोत किंवा केवळ हिंदुस्थानी ( भांडवलदार ) असोत. हे कावेबाज शोषण, ते मिश्र वा शुद्ध भारतीय स्वरूपाच्या नोकरशाही यंत्रणेच्या माध्यमातून पार पाडोत, त्यामुळे परिस्थितीत काहीही फरक पडत नाही.

**( फाशीच्या तीन दिवस अगोदर भगतसिंह, राजगुरू आणि सुखदेव यांनी फाशीऐवजी बंदुकीच्या गोळीने मृत्यूदंड देण्याच्या मागणीसाठी गव्हर्नरला लिहिलेल्या पत्रातील एक अंश )**

# स्फुलिंग २

**एप्रिल २०१५**

एक अनियतकालिक पत्र

**संपादक**
नारायण खराडे

संपादन पूर्णतः अवैतनिक व अव्यावसायिक

**या अंकाचे मूल्य रु. २०**
**सदस्यता मूल्य (आगामी चार अंकांसाठी) रु. १००**

**सदस्यता मूल्य जमा करण्यासाठी बँक खाते विवरण.**
खातेधारकांचे नाव - नारायण खराडे
बचत खाते क्र. ०१९८००१०१०१९८१४,
कॉर्पोरेशन बँक, म्हापसा शाखा
आईएफएससी कोड -CORP0000198

**संपादकीय कार्यालय** : रुम नं. ७, धनलक्ष्मी कोऑ. हाउसिंग सोसायटी, प्लॉट नं. बी- १६, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई - ४१०२१०
मो.क्र.- ९७६९९०३५८९,९६१९०३९७९३
ईमेल - sfuling.mag@gmail.com
वेबसाइट - www.sfuling.com

हे अनियतकालिक मुद्रक व संपादक **नारायण खराडे** यांनी व्ही २ एंटरप्राइज, गाला-१०, सर्वे न ३/१३, वालीव, वसाई पूर्व, ठाणे-४०१२०८, फोन न. ०२५०-६०६६६०८ कडून मुद्रित करवून धनलक्ष्मी कोऑ. हाउसिंग सोसायटी, प्लॉट नं. बी- १६, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई - ४१०२१० हून प्रसिद्ध केले आहे.

**जेव्हा नैतिकता धर्मशास्त्रावर आधारलेली असेल, जेव्हा अधिकार कोणत्याही दैवी सत्तेवर अवलंबून असेल, तेव्हा सर्वात अनैतिक, अन्याय्य, कुख्यात गोष्टी योग्य ठरवल्या जाऊ शकतात आणि स्थापित केल्या जाऊ शकतात.**

**लुडविग फायरबाख ( जर्मन तत्त्वज्ञ )**

# अंतरंग

●**वाचकपीठ** २

●**संपादकीय**
चांगल्या दिवसांचे वास्तव आणि पर्यायाचा सवाल ३

●**प्रासंगिक**
दिल्ली मध्ये ‘आम आदमी पक्षा’चा विजय आणि कष्टकरी जनतेसाठी काही धडे ५
महाराष्ट्रात कामगार हितांवर घाला ११

●**समाज**
भारतीय विज्ञान परिषद - वैज्ञानिक तर्कपद्धतीचे श्राद्ध घालण्याची तयारी १२
ढंढारी बलात्कार आणि हत्या प्रकरण — सामाजिक वास्तावाचे दर्शन ४१
जवखेड दलित हत्याकांडाने पुन्हा उघडकीस आणले व्यवस्थेचे वास्तव ४३

●**मीडिया**
कॉर्पोरेट भांडवली प्रसारमाध्यमांचे वर्चस्व आणि क्रांतिकारी वैकल्पिक प्रसारमाध्यमांसमोरील आव्हाने १५

●**आरोग्य**
नफाखोर व्यवस्थेत प्रभावहीन ठरताहेत जीवन-रक्षक औषधे १८

●**जगाच्या पाठीवर**
अमेरिकन सत्ताधाऱ्यांच्या पापाचे ओझे वाहते अमेरिकन सैनिक २०
‘फॉक्सकॉन’च्या कामगारांचे नारकीय जीवन ३५

●**इतिहास**
पहिल्या महायुद्धाची शंभर वर्षे - युद्धखोर साम्राज्यवादाचे सिंहावलोकन २३

●**घडामोडी**
सांप्रदायिक फासीवाद्यांचे जनतेत फूट पाडण्याचे प्रयत्न हाणून पाडा! २९

●**सिनेमा**
‘गांधी’कार रिचर्ड अ‍ॅटनबरो यांना खुले पत्र ३३

●**साहित्य**
एका कामगाराच्या कविता ३६
कथा / किचाट ३७
कुसुमाग्रज यांची एक कविता - आश्चर्य ४६
आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त (८ मार्च) कात्यायनी यांच्या निवडक कविता ४८

●**श्रद्धांजली**
प्रा. तुलसीराम यांना ‘स्फुलिंग’ची श्रद्धांजली ४०
कॉम्रेड गोविंद पानसरेंच्या बलिदानानंतर... ४७

# वाचकपीठ

'स्फुलिंग'चे अंक महाराष्ट्रात नक्कीच विचारांची घुसळण सुरू करतील. याचं मुख्य कारण म्हणजे ह्यात आरामखुर्चीत बसून केलेले मार्गदर्शन नाही तर रस्त्यावर उतरून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी अनियंत्रित भांडवलशाही, जातीचे प्रश्न व वाढता फासीवाद यांना शोधलेले उत्तर आहे.या सर्व लढाऊ टीमला हार्दिक शुभेच्छा !

**आमोद कुलकर्णी, पुणे**

माननीय संपादक,

मराठी साहित्याच्या वैचारिकतेचा परीघ दिवसेंदिवस आक्रसत असतानाच्या आणि एकंदरीतच महाराष्ट्रातील राजकीय-सामाजिक जीवनावर फासिवादाचे मळभ दाटून आलेले असतानाच्या काळात 'स्फुलिंग'च्या रुपात आशेचा नवीन किरण बघावयास मिळत आहे, ही नक्कीच दिलासा देणारी गोष्ट आहे. खास करून युवकांच्या अपेक्षा आणि आकांक्षांना भांडवली संकटामुळे जे जबर धक्के बसले आहेत त्यामागचे 'स्फुलिंग' इतके सविस्तर विश्लेषण दुसऱ्या कुठल्याही मासिकामध्ये आलेले नाही. विषयांचे वैविध्य आणि त्यांची जनवादी दृष्टीकोनातून केली गेलेली मांडणी हे 'स्फुलिंग'चे बलस्थान आहे. भांडवली अजगराचा विळखा समाजाभोवती अधिकाधिक घट्ट होत असताना समाजाला एका नवीन प्रबोधन पर्वाच्या दिशेने उद्युक्त करण्याच्या दृष्टीने, येणाऱ्या दिवसांमध्ये मराठी वाचकांमध्ये 'स्फुलिंग'चा प्रसार महत्वाचा ठरणार आहे. त्यासाठी 'स्फुलिंग'च्या सर्व टीम ला शुभेच्छा!

**संतोष पाटिल, पुणे**

'स्फुलिंग'चा पहिला अंक आवडला. कोणत्याही जाहिरातीशिवाय अंक प्रकाशित करण्याचा प्रयत्न महत्त्वाचा आहे. त्याबद्दल अभिनंदन. मात्र पुढच्या अंकांसाठी काही सूचना देऊ इच्छितो. लेख माहितीपूर्ण आहेत, परंतु मांडणी आणि शैली काहीशी बोजड आहे, ती अधिक सुबोध व्हावी. सर्वसामान्य माणूस केंद्रस्थानी मानून अंक प्रसिद्ध केला जात असल्यामुळे लेखन तळागाळातल्या माणसालाही समजेल इतके सुबोध करण्याचा प्रयत्न करावा. आजची परिस्थिती गुंतागुंतीची आहे, परंतु त्या परिस्थितीचे भान करून देणारे लिखाण गुंतागुंतीचे होऊ नये. लिखाणामध्ये टोकाची नकारात्मकता आहे. आजच्या परिस्थितीत ती तशी असणे स्वाभाविक आहे, परंतु निव्वळ नकारात्मकता असू नये, याची दक्षता घ्यावी. लेख वेगवेगळ्या लेखकांनी लिहिलेले असूनही त्यांमध्ये एकच सूर जाणवतो. त्याबाबत विचार व्हावा. आशयाबरोबरच रूपामध्येदेखील वैविध्य जेवढे जास्त असेल तेवढा अंक अधिक वाचनीय होईल. शुभेच्छा!

**नागेश भारत धुर्वे, मालाड, मुंबई.**

### लढाऊ पत्रकार गणेश शंकर विद्यार्थी यांच्या हौतात्म्य दिना (२५ मार्च) निमित्त

## महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे कर्तव्य

जगभरात सध्या जी उलथापालथ चाललेली आहे आणि आपल्या देशाला तिचा कसा लाभ घेता येईल, याविषयी जर आपण अगदी आवेश बाजूल ठेवून विचार केला तर आपण या निष्कर्षापर्यंत पोहोचू शकतो की ज्यांनी त्यांच्यापुरते हे ठरवून टाकले आहे की जगात काय वाट्टेल ते होवो आपल्याला त्याच्याशी काही देणेघेणे नाही, आपल्याला आपल्या सुखाशी मतलब आहे, जग आणि देश स्वर्गात जावोत अथवा नरकात असे ज्यांनी आपल्यापुरते ठरवून टाकले आहे आणि ज्यांना असे वाटते की जग आणि देशाच्या वास्तवाकडे डोळेझाक केल्यामुळे त्यांच्या ऐशारामात काहीच फरक पडणार नाही, अशा तरुण-तरुणी वगळता देशातील सर्व तरुण-तरुणींनी आपली जीवनचर्या बदलण्याची आणि यथाशक्ती समाज आणि देशासाठी उपयुक्त ठरण्याची वेळ येऊन ठेपली आहे. ज्या तरुण किंवा तरुणीच्या देहामध्ये युवा रक्त सळसळते आहे, ज्यांना देश आणि बाहेरच्या जगाकडे पाहण्याचे आणि समजून घेण्याचे किंचितसुद्धा ज्ञान आहे, आपल्या माणसांच्या दुर्दशा अनुभवण्यासाठी ज्याच्यामध्ये पुरेशी सहृदयता आणि प्रेम आहे, ती दुर्दशा दूर करण्याची किंचितसुद्धा इच्छा आहे, जीवन केवळ खा-प्या आणि मजेत राहा यासाठी नाही आणि आदर्शांसाठी जगण्यात आणि मरण्यातच उत्तुंग आणि चांगले जीवन सामावलेले आहे, अशी भावना ज्यांच्या मनात आहे, असे युवक-युवती सध्याच्या आपल्या निश्चेष्ट अवस्थेवर कदापि समाधानी असणार नाहीत.



देशाच्या सेवेची ही संधी अशा तरुणांना उत्कटपणे आपल्याकडे बोलावते आहे. वेळोवेळी इतर देशांमध्येसुद्धा असा काळ होता. तेथील तरुण-तरुणींनी त्याची हाक ऐकली आणि त्याग आणि सत्यनिष्ठेसह तन आणि मन सेवेच्या मार्गावर अर्पण केले, तेथे त्यांनी आपल्या देशबांधवांना उंचावले आणि स्वत: कांचन बनून गेले.

संपादकीय

# चांगल्या दिवसांचे वास्तव आणि पर्यायाचा सवाल

१६ मे २०१४ नंतर आतापर्यंत बरेच काही घडले आहे. भारतीय जनतेला डोळे दिपवणारी स्वप्ने दाखवणारा ''चायवाला'' आता स्वत:च्या नावाचे नक्षीकाम असलेला नऊ लाख रुपयांचा सूट घालू लागलाय. १० महिन्यांपूर्वी केंद्रात सत्तांतर झाल्यानंतर स्वतंत्र भारताच्या इतिहासात प्रथमच काँग्रेस सोडून अन्य पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाल्यामुळे देशात क्रांती घडत असल्याचे भास तमाम प्रसारमाध्यमांना होऊ लागले होते. त्यानंतर महाराष्ट्र, झारखंड, हरयाणा विधानसभा निवडणुकांमध्ये केंद्रातील यशाची पुनरावृत्ती केल्यानंतर भाजपच्या सुसाट विजयरथाची दिल्लीमध्ये पार चाके निखळली. यावेळी 'आप'च्या रूपात प्रसारमाध्यमांना पुन्हा अमूलाग्र परिवर्तनाचे भास होऊ लागले. ''सबसे तेज'' न्यूजच्या काळात भराभर परिवर्तनाचे असे भास होणे स्वाभाविक आहे, परंतु प्रसारमाध्यमांच्या या धुमाळीत चांगल्या दिवसांची प्रतीक्षा लवकर संपण्याची चिन्हे काही दिसत नाहीत याची ओळख सर्वसामान्य जनतेला होऊ लागली आहे. नुकताच केंद्र सरकारने आपला पहिला पूर्ण अर्थसंकल्प सादर केल्यानंतर नरेंद्र मोदींमध्ये विकासपुरुष पाहणाऱ्या मध्यमवर्गालासुद्धा आपला अपेक्षाभंग लपविणे अशक्य बनले आहे.

नवीन सरकार सत्तेत येताच देशातील जनतेच्या सगळ्या समस्या बघता बघता दूर होतील असेच वातावरण सर्वत्र निर्माण झालेले ( किंवा केलेले) होते. काळा पैसा देशात येणार होता, आणि प्रत्येक नागरिकाच्या खात्यात १५ लाख रुपये जमा होणार होते! आज जनधन योजनेतून मिळालेल्या झिरो बॅलन्स खात्याचे काय करायचे हा प्रश्न लोकांसमोर आहे, आणि १५ लाख रुपयांचा रूपकात्मक अर्थही अमित शहांनी जनतेला समजावून सांगितला आहे. परंतु गेल्या दहा महिन्यांमध्ये काहीच परिवर्तन झाले नाही असे म्हणता येणार नाही. मोठी सामाजिक-सांस्कृतिक उलथापालथ होते आहे. कुटुंब नियोजनापासून इतिहास आणि विज्ञानापर्यंत सर्वच क्षेत्रांमध्ये नव्या धोरणांची रेलचेल आहे. या एकूणच मोहिमेत आघाडीवर असलेल्या साध्वी प्राची यांनी अगोदर प्रत्येक स्त्रीने किमान चार मुले जन्माला घालण्याचा ''सल्ला'' दिला, आणि नंतर सलमान खान, शाहरूख खान आणि आमीर खान यांच्या फोटोंची होळी करण्याचे आवाहन करून ''सांस्कृतिक शुद्धीकरणा''कडे मोर्चा वळविला. विश्व हिंदू परिषदेने कधी काळी आपल्या धर्माला पारखे झालेल्यांना पुन्हा हिंदू धर्मात घरवापसी देण्याचे अभियान सुरू केलेले आहे, आणि घरवापसीला विरोध असेल तर देशात धर्मांतरबंदी कायदा आणण्याची मागणी योगी आदित्यनाथ करत आहेत. मधल्या काळात लव्ह जिहादचा ''राक्षस'' समाजात कसा थैमान घालतो आहे त्याबद्दल मोठी ''जागृती'' करण्यात आली, आणि प्रसारमाध्यमांनीही या ''जागृती'' मोहीमेत आपली भूमिका चोख पार पाडली. भविष्यकाळ भूतकाळाशी जोडलेला असल्यामुळे अपेक्षित भविष्यकाळ घडवण्यासाठी भूतकाळही त्यादृष्टीने दुरुस्त करून घेण्याची गरज असते. नथुराम गोडसेवरचा ''अन्याय'' दूर करून त्याला इतिहासात ''योग्य'' स्थान देण्यासाठी त्याचे मंदिर उभारण्याची सुरुवातही झालेली आहे. प्राचीन काळी भारतीयांकडे असलेल्या आणि मधल्या काळात गायब झालेल्या इतर ग्रहांवर झेपावणाऱ्या विमानांचाही शोध सुरू झाला आहे. पूर्वीचा भारतीय समाज किती विज्ञाननिष्ठ होता त्याचे पुरावेही दिले जात आहेत. पूर्वीचा तो समाज ''विज्ञाननिष्ठ'' होता म्हणजेच जातिव्यवस्थासुद्धा ''विज्ञाननिष्ठ'' होती, हेही ओघानेच आले. त्यामुळे दलितांवरील अत्याचारांमध्ये वाढ झाल्यास त्यात कसलेच आश्चर्य नाही. असे एकंदर परिवर्तनाचे वारे जोरात वाहते आहे. धडाकेबाज भाषणबाजीद्वारे सत्तासोपान चढणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी या गदारोळात मौन पाळून आहेत. गुजरात दंगलीच्या मुद्द्याला चिकटून राहण्यात अर्थ नाही, आता पुढे गेले पाहिजे म्हणून सांगणारे, आणि पंतप्रधानपदी येताच नरेंद्र मोदीचा हिंदुत्त्ववादी चेहरा बदलेल अशी आशा बाळगणारे सध्या गोंधळलेल्या अवस्थेत आहेत.

एकीकडे हिंदुत्त्ववादाचा वारू उधळत असताना दुसरीकडे ज्यांच्या पाठबळामुळे केंद्रातील सत्ता हस्तगत झाली त्या भांडवलदारांशी नवीन सरकार पूर्ण इमान राखून आहे. 'मेक इन इंडिया'च्या घोषणेसह देशाच्या विकासाकरिता व्यापाऱ्यांसाठी लाल गालिचा अंथरण्याच्या धोरणाला अनुसरून अर्थसंकल्पात कॉर्पोरेट करामध्ये पुढच्या पाच वर्षांसाठी पाच टक्के कपात घोषित करताना, दुसरीकडे करामध्ये वाढीव सवलतीची

अपेक्षा बाळगणाऱ्या मध्यमवर्गाचा अर्थमंत्र्यांनी अपेक्षाभंग केलेला आहे. त्यातच सेवा कर वाढवल्यामुळे जनतेला महागाईचा मार बसणार हे ठरलेले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात पेट्रोलियम पदार्थांच्या किंमती घसरल्यामुळे पेट्रोल डिझेलचे भाव कमी करून त्याचे श्रेय लाटण्याचे काम सरकारने अवश्य केले. परंतु घरगुती गॅसचे काय, हा प्रश्न लोकांना पडला आहे. गेल्या १० महिन्यांत महागाई कोणत्याही प्रकारे कमी झालेली नाही. लोकांना चांगल्या दिवसांसाठी अजून काही काळ प्रतीक्षा करण्याचे आवाहन करणारे सरकार भांडवलदारांच्या बाबतीत मात्र कमालीची तत्परता दाखवते आहे. सत्तेत येताच सर्वप्रथम मोदी सरकारने उद्योजकांना ''त्रासदायक'' ठरणाऱ्या कामगार कायद्यांमध्ये ''सुधारणा'' करण्याच्या दृष्टीने पाउले उचलण्यास सुरुवात केली. महाराष्ट्रातील भाजप सरकारदेखील या बाबतीत केंद्राचे अनुकरण करताना दिसते आहे. त्याचबरोबर विकासाला गती देण्यासाठी नवीन जमीन अधिग्रहण कायदा आणण्याच्या सरकारच्या हालचाली लोकांच्या जमिनी भांडवलदारांच्या घशात घालणार, हे स्पष्ट आहे. सर्वच क्षेत्रांमध्ये पीपीपी तत्त्वावर चालणाऱ्या प्रकल्पांमध्ये किती रोजगार तयार होणार आणि त्या रोजगाराचे स्वरूप काय असणार, हे आजवरच्या पीपीपीच्या इतिहासावरून कळू शकते.

गेल्या दहा महिन्यांचा विचार करताना एक जागतिक नेता म्हणून झालेल्या नरेंद्र मोदी यांच्या उदयाकडे डोळेझाक करून चालणार नाही. त्यांच्यामुळेच अमेरिकेसारख्या महासत्तेचा अध्यक्ष आपल्या प्रजासत्ताक दिनी प्रमुख पाहुणा म्हणून आलेला पाहण्याचे ''भाग्य'' देशवासियांना लाभले. दोन नेत्यांमधील घनिष्ठ मैत्रीचे हृद्य दर्शन घडले. मैत्री म्हटली की त्याग आलाच! त्यामुळे अणुकरारातील अमेरिकन भांडवलदारांना अडचणीच्या असलेल्या तरतूदी दूर करणे आलेच. मित्राच्या प्रेमापोटी अमेरिकन औषध कंपन्यांना थोडी लुटालूट करू देण्यासही हरकत नाही. न परवडणाऱ्या औषधांमुळे देशवासियांना जीव गमवावा लागला तरी त्याचे दु:ख मानू नये. कारण मैत्रीचे पावित्र्य जपणे महत्त्वाचे. नरेंद्र मोदी यांनी ओबामा यांना बराक म्हणून हाक मारणे किती ऐतिहासिक होते ते आपल्याला प्रसारमाध्यमांनी सांगितलेलेच आहे. त्यामुळे येत्या काळात बारकू आणि नरू यांच्या मैत्रीवर एखादा धडा पाठ्यपुस्तकांमध्ये समाविष्ट करायला हरकत नाही. विद्याभारती कदाचित त्याबद्दल विचार करीत असेलही.

एकंदर गेल्या दहा महिन्यांमध्ये एक ना अनेक विलक्षण गोष्टी घडलेल्या आहेत. परंतु लोकांचे समाधान होताना काही दिसत नाही. बाजारू भांडवली प्रसारमाध्यमांच्या मदतीने जाहीरातबाजीच्या तंत्राचा जोरदार वापर करून ज्या असंतोषावर स्वार होऊन नरेंद्र मोदी सत्तेवर आले, तो असंतोष काही दूर झालेला नाही. किंबहुना, भ्रमनिरासामुळे तो येत्या काळात वाढण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

कधी संसदेच्या कॅंटीनमध्ये राईसप्लेट खाऊन अन्नदाता सुखी भवचा संदेश द्यावा, तर कधी आपला एकच धर्म आहे, आणि तो म्हणजे इंडिया फर्स्ट यासारखी मन हेलावून टाकणारी वाक्ये बोलावीत, असे काही ना काही करून प्रधानसेवक आपली तळमळ किती खरी आहे ते सिद्ध करू पाहत आहेत. परंतु जनतेची संवेदनशीलताच बहुतेक नष्ट झालेली असावी! म्हणूनच ज्या दिल्लीत लोकसभा निवडणुकीत सर्वच्या सर्व सात जागा भाजपला मिळाल्या होत्या तिथे नऊ महिन्यांनंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत ७० पैकी फक्त तीन जागांची नामुष्की भाजपवर ओढवली. तिथे सत्तेत आलेल्या 'आप' पक्षाने निवडून येताच ''दिल्लीमध्ये गरीब आणि श्रीमंतांचे सरकार असेल'' असे सांगून आपली भूमिका बऱ्यापैकी स्पष्ट केलेली आहे. त्यानंतर हरयाणाचे मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर यांच्या गाड्यांच्या ताफ्याखाली एका तरुणाला जीव गमवावा लागल्यानंतर एकीकडे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया नेत्यांनी स्वत:ला जनतेचा मालक मानणे कसे चुकीचे आहे याचे धडे देत होते, आणि दुसरीकडे दिल्लीत उद्योगमंत्र्यांची भेट घेऊ इच्छिणाऱ्या दिल्ली मेट्रो रेल्वे कामगारांवर लाठी चार्ज होत होता. आपच्या पक्षांतर्गत कट कारस्थानांनी आप व इतर पक्ष यांच्यामध्ये कितीसा फरक आहे, झलक दाखविलेली आहे. देशातील अशा एकंदर राजकीय सामाजिक परिस्थितीच्या परिप्रेक्ष्यातच आपल्याला महाराष्ट्रात घडलेल्या कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्येकडे पाहावे लागेल.

पानसरेंच्या हत्येनंतर बंदुकीच्या गोळीने विचार मरणार नाही या चिरंतन वाक्याचे सर्वांनाच स्मरण झाले. तसेच महाराष्ट्राचे पुरोगामीपण मरते आहे याचाही पुन्हा एकदा साक्षात्कार झाला. बंदुकीच्या गोळीने विचार मरत नाही आणि महाराष्ट्राचे पुरोगामीपण मरते आहे या दोन सत्यांची संगती कशी लावायची असा प्रश्न कुठल्याही विचारी माणसाच्या मनात सहजच येऊ शकतो. मनाच्या सिलबंद डब्यात जपून ठेवले म्हणून विचार जिवंत राहतात का? पानसरे यांच्या हत्येनंतर अपेक्षेप्रमाणे विविध सोशल नेटवर्किंग माध्यमांमधून निषेधाचा सूर उमटला, प्रतिगामी शक्तींना विरोध व्यक्त झाला. ठिकठिकाणी लोक रस्त्यांवर उतरून त्यांनी निषेध नोंदवला. अशा प्रकारच्या विरोधाला कमी लेखण्याचे कारण नाही. परंतु सुसंघटित अशा प्रतिगामी शक्तींना रोखण्यासाठी तेवढे पुरेसे आहे का? त्यांचा प्रतिकार करण्यासाठी व्यापक संघटित शक्ती आज आपल्या समाजात अस्तित्वात नाही याची जळजळीत जाणीव या घटनेने आपल्याला करून दिलेली आहे, हे मान्य करावे लागेल. कॉ. पानसरे यांच्या हत्येचा निषेध होत असताना कोणत्याही पुराव्याविना एखाद्या संघटनेच्या विरोधात घोषणा देणे, संघटनेला जबाबदार धरणे हे कसे ''बौद्धिक समतोल'' ढासळल्याचे लक्षण आहे, ते सांगणारे लेखही आघाडीच्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाले. तटस्थपणाचे महत्त्व सांगण्यात आले. तटस्थपणा ही एक विलक्षण चीज सध्या तेजीत आहे. रस्त्यात महिलांवर अत्याचार होतानाही अनेकजण असेच तटस्थ राहतात. बांधिलकी मानणाऱ्या एका नेत्याच्या हौतात्म्यामुळे हा तटस्थपणाचा प्रश्नही इतर प्रश्नांप्रमाणेच आपल्यासमोर उभा केला आहे. तटस्थपणा म्हणजे बलिष्ठाला दिलेले समर्थनच असते, आणि आज कोणत्या शक्ती बलिष्ठ झालेल्या आहेत ते ओळखण्यासाठी संशोधन करण्याची गरज नाही. आपल्याला बाजू निवडावी लागेल. ठोस भूमिका घ्यावी लागेल. त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. आपल्याला आपली भूमिका स्पष्ट करावी लागेल. काळाची चाके उलटी फिरवण्याचा अट्टाहास करणाऱ्यांना रोखण्यासाठी आणि समाज परिवर्तनासाठी संघटित होणे ही काळाजी गरज आहे. त्याच आवाहनासह स्फुलिंगचा हा दुसरा अंक आपल्या हाती देत आहोत...

## प्रासंगिक

# दिल्ली मध्ये 'आम आदमी पक्षा'चा विजय आणि कष्टकरी जनतेसाठी काही धडे

काँग्रेस, भाजप सारखे मोठ्या भांडवलदार वर्गाची सेवा करणारे राजकीय पक्ष, छोटे-मोठे प्रादेशिक भांडवली पक्ष आणि संसदीय डाव्यांपासून भ्रमनिरास झालेल्या दिल्लीच्या जनतेने मागील वेळी अपूर्ण राहिलेली कसर मनापासून भरून काढली आहे. 'आम आदमी पक्षा'ला ह्या विधानसभा निवडणुकीमध्ये ७० पैकी ६७ जागी विजय मिळाला आहे. ६७ टक्के मतदारांनी मतदान केले आणि त्यापैकी ५४ टक्केपेक्षा जास्त मते 'आप'ला मिळाली. **'आप'ला प्रामुख्याने गरीब कष्टकरी जनता आणि मध्यम वर्गाची मते मिळाली आहेत.** मध्यम-मध्यम वर्ग आणि वरिष्ठ मध्यम वर्गाने सुद्धा 'आप'ला मते दिली आहेत पण त्यापैकी एका मोठ्या भागाने भाजपलासुद्धा मते दिली आहेत. ह्या निवडणूक निकालांमुळे काही गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत.

### केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील 'आप'च्या जबरदस्त विजयाचे निहीतार्थ

**पहिली गोष्ट** - काँग्रेस आणि भाजपद्वारा अगदी उघडपणे श्रीमंत आणि भांडवलदार वर्गाच्या बाजूने राबवण्यात आलेल्या धोरणांच्या विरोधातील जनतेचा जुना असंतोष पुन्हा उफाळून आला आहे. नुकतीच भाजप सरकारकडून श्रम कायदे प्रभावहीन बनवण्याची सुरुवात, भूमी अधिग्रहण कायद्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या इच्छेविरुद्ध जमिनींच्या अधिग्रहणाची तरतूद, रेल्वे भाड्यांमध्ये वाढ, जागतिक बाजारामधील कच्च्या तेलाच्या भावामध्ये प्रचंड घसरण होऊनही पेट्रोल, डिझेलचे दर त्या प्रमाणात कमी न करणे आणि महागाईवर कुठलेही नियंत्रण न ठेवल्या कारणाने मोदी सरकार मुख्यत: कामगार वर्गात आणि सामान्य कष्टकरी जनतेत वेगाने अप्रिय ठरत चालले आहे. अर्थातच, हे सरकार देशपातळीवर अलोकप्रिय व्हायला अजून वेळ आहे; काँग्रेसने आपल्या पूर्ण ५० वर्षांच्या शासन काळात जनतेला गरिबी, महागाई, अन्याय आणि भ्रष्टाचार ह्या व्यतिरिक्त दुसरे काही दिले नाही; जनता कुठे न कुठे काँग्रेसला कंटाळली होती; अशात, जनतेने ह्या दोन्ही पक्षांच्या विरुद्धचा असंतोष जबरदस्तरित्या दाखवून दिला आहे.

**दुसरी गोष्ट** - जनतेच्या मनात बऱ्याच काळापासून हा असंतोष धुमसत होता, परंतु निवडणुकांच्या राजकारणात त्याला कुठलाही पर्याय दिसत नव्हता. मागच्या तीन दशकांच्या काळात सपा, बसप, जद(यु.) इत्यादींसारख्या पक्षांचे पितळ उघडे पडले आहे. अशात, 'आम आदमी पक्ष' सदाचार, ईमानदारी और पारदर्शकतेचा नारा देत लोकांमध्ये गेला. लोकांना त्यांनी भ्रष्टाचारमुक्त दिल्ली आणि देशाचे स्वप्न दाखवले. शोषण असो, गरिबी किंवा बेरोजगारी, या सर्व समस्येचे मूळ भ्रष्टाचारात असल्याचे त्यांनी लोकांना सांगितले. त्यांच्या मते देशातील व्यवस्थेमध्ये आणि भांडवलशाही मध्ये कुठलेही वैगुण्य नाही, समस्या आहे भ्रष्टाचाराची. जर सगळे सरकारी कर्मचारी प्रामाणिकपणे काम करू लागले आणि भांडवलदार प्रामाणिकपणे नफा कमवू लागले तर सर्व काही व्यवस्थित होईल! केजरीवाल यांच्या मते समस्या केवळ ''हेतू''ची आहे. सध्या जे लोक सत्तेमध्ये आहेत त्यांचा ''हेतू'' वाइट आहे आणि 'आम आदमी पक्ष' हा चांगली नियत असलेल्या लोकांचा पक्ष आहे. जर हा पक्ष सत्तेमध्ये आला तर भारतामधील आणि दिल्लीमधील सर्व समस्या दूर होतील, लोकांचे जीवन सुखी होईल. केजारीवाल यांच्याच शब्दांमध्ये 'गरीब आणि श्रीमंत दोघे मिळून दिल्लीवर गुण्यागोविंदाने राज्य करतील!' **अव्यवस्था, गरिबी, बेरोजगारी आणि महागाई ह्यांमुळे सामान्य कष्टकरी जनता इतकी वैतागली आहे, विटली आहे आणि पर्यायहीनतेमुळे इतकी निराश झाली आहे की तिला केजरीवाल आणि 'आप' चे लोकरंजक नारे भुरळ पाडत आहेत. आपण असेही म्हणू शकतो की जनतेने पर्यायहीनता आणि असंतोष ह्यांनी मिळून जनतेला भुलवण्याची मुभा केजरीवाल आणि 'आप' ला दिली आहे.** जनतेच्या मनात काँग्रेस आणि भाजप ह्यांच्या उघड उघड श्रीमंतधार्जिण्या धोरणांच्या विरुद्ध वर्गीय असंतोष हे सुद्धा यामागचे एक कारण आहेच. ती 'आम आदमी पक्षा'च्या आश्वासनांबद्दल इतकी आश्वस्त नाही जितकी दोन प्रमुख भांडवली पक्षांवर नाराज आहे. 'आम आदमी पक्षा'च्या वरवर गरिबांच्या बाजूने दिसणाऱ्या घोषणाबाजीने बऱ्याच अंशी जरीब जनतेमधील असंतोषाचा पुरेपूर वापर करून घेतला आहे.

**तिसरी गोष्ट** - जनतेच्या एका मोठ्या वर्गामध्ये 'आम आदमी पक्षा'बद्दल एक भ्रमसुद्धा आहे. ह्याचे एक कारण हे आहे कि 'आप'ला मागील वेळी पूर्ण बहुमत मिळाले नव्हते, त्यामुळे त्यांना अशक्य आश्वासने पूर्ण करण्यापासून पळ काढण्याची संधी मिळाली होती. **सर्वांना माहित आहे की केजरीवाल यांनी मागच्या वेळी ४९ दिवसांमध्ये पळ काढण्यामागचे खरे कारण जनलोकापाल वरून झालेला विवाद नसून दिल्लीमधील ६० लाख कंत्राटी कामगार आणि कर्मचाऱ्यांना कायम करून घेण्याची केलेली घोषणा पूर्ण करण्याचा दबाव हे होते. परंतु आपल्या दैनंदिन जीवनात व्यस्त असलेले कष्टकरी लोक सगळ्या गोष्टी लवकर विसरून जातात आणि क्षमासुद्धा करतात.** खास

करून तेव्हा जेव्हा अन्य कुठलाही पर्याय त्यांच्या समोर नसतो. ह्याशिवाय, जनतेच्या एका भागाला असे वाटते की अन्य कुठलाही चांगला पर्याय शिल्लक नसल्यामुळे केजरीवाल सरकारलाच पूर्ण बहुमत देऊन एक संधी दिली पाहिजे. खरे तर केजरीवाल यांच्याबद्दलचे संभ्रम दूर होण्यासाठी कष्टकरी जनतेने गेल्या वेळी राहिलेली कसर एकदा भरून काढणे गरजेचेसुद्धा होतेच.

**चौथी गोष्ट**–केजरीवाल यांच्या जबरदस्त विजयाने हे दाखवून दिले आहे की भांडवली राजकीय आणि आर्थिक व्यवस्थेचे संकट आणि अंतर्विरोध जेव्हा जेव्हा एका मर्यादेबाहेर वाढतात तेव्हा एखाद्या सज्जन, स्वच्छा प्रतिमा असलेल्या 'सद्गृस्थाचा' जन्म होतो, जो (१) गरमागरम नारेबाजी करत जनतेमधील असंतोष अभिव्यक्त करतो, त्यांच्या असंतोषाला वाट करून देतो; (२) जो जनतेच्या दु:खाचे एक काल्पनिक कारण जनतेच्या समोर उभे करतो, उदाहरणार्थ भ्रष्टाचार किंवा हेतू वगैरे, (३) जो वर्गसंघर्षांना वारंवार नाकारतो आणि वर्ग समन्वयाच्या गोष्टी करतो, जसे की केजरीवाल यांनी श्रीमंत आणि गरीब ह्या विभाजानालाच नाकारले आहे आणि वारंवार सदाचार आणि भ्रष्टाचार ह्यांची काल्पनिक विभाजन रेषा तयार करण्यावर जोर दिला आहे. केजरीवाल आणि 'आम आदमी पक्ष' ही सद्य परिस्थितीत भांडवली व्यवस्थेची गरज आहे. ते भांडवली समाज आणि व्यवस्थेच्या असमाधेय अंतर्विरोधांचे वर्गचारित्र्य लपवण्याचे काम करतात आणि वर्गसंघर्षांच्या चेतनेची धार बोथट करण्याचे काम करतात. हीच भूमिका एका वेळी भारतीय भांडवली राजकारणाच्या इतिहासामध्ये 'जेपी' आंदोलनाने बजावली होती. आज एका दुसऱ्या रूपात भारतीय भांडवली राजकारण आणि अर्थव्यवस्था भयंकर अशा संकटाने ग्रस्त आहे. त्याचे एक हुकूमशाही आणि फॅसिस्ट समाधान नरेंद्र मोदीच्या नेतृत्वाखालील भाजपची सांप्रदायिक फॅसिस्ट सरकार सादर करत आहे, तर दुसरीकडे दुसरे समाधान 'आम आदमी पक्ष' आणि अरविंद केजरीवाल सादर करत आहेत. हे सांगायची आवश्यकता नाही की केजरीवाल यांची ही लाट त्यानी स्वत: केलेल्या घोषणा पूर्ण न करू शकण्याबरोबरच किंवा त्यांपासून माघार घेण्याबरोबरच विरून जाईल आणि आज जे लोक भांडवली व्यवस्थेला वैतागून प्रतिक्रियेच्या रूपात केजरीवाल यांच्या मागे गेले आहेत, त्यातील बहुतांशी लोक अगोदरपेक्षा अधिक प्रतिक्रियावादी होऊन भाजप आणि संघ परिवार यांच्यासारख्या आत्यंतिक उजव्या, फॅसिस्ट शक्तींच्या – जे कामगार वर्गाचे सर्वात मोठे शत्रू आहेत – समर्थनात पुढे येतील.

## अरविंद केजरीवाल आणि 'आम आदमी पक्ष' कष्टकरी गरीब जनतेचे मित्र आहेत?

दिल्लीमधील कष्टकरी जनतेसाठी सगळ्यात महत्वाचा प्रश्न हा आहे की अरविंद केजरीवाल आणि त्यांचा 'आम आदमी पक्ष' त्यांचा मित्र आहे का? तो कॉंग्रेस किंवा भाजप या पक्षांपेक्षा खरोखर वेगळा किंवा त्यांच्यापेक्षा चांगला आहे का? त्यांच्याकडून काही अपेक्षा बाळगावी का? ह्या गोष्टींची पडताळणी एकाच निकषावर होऊ शकते, आणि तो म्हणजे कामगार वर्गाचा निकष. चला तर मग, बघू या केजरीवाल आणि 'आम आदमी पक्ष' यांचे ह्या बाबतीत काय मत आहे.

### 'श्रीमंत आणि गरीब मिळून दिल्लीवर राज्य करतील!' काय म्हणता, खरेच?

नुकतेच, 'आम आदमी पक्षा'चे चाणक्य योगेंद्र यादव यांनी म्हटले आहे की 'आम आदमी पक्ष' वर्गसंघार्षांवर विश्वास ठेवत नाही. त्यांचे म्हणणे आहे की श्रीमंतांपासून काहीही हिसकावून घेणे योग्य नाही. गरिबांना जे काही मिळेल ते भ्रष्टाचार नष्ट करून मिळाले पाहिजे, श्रीमंतांचे काही हिरावून नाही. हीच गोष्ट अरविंद केजरीवाल यांनीसुद्धा वेगवेगळ्या टीव्ही वाहिन्यांशी बोलताना सांगितली आहे. पण ह्या संपूर्ण कथनातच गडबड आहे. **विचार करण्याची गोष्ट ही आहे की श्रीमंत श्रीमंत झालाच कसा? गरीब गरीब का आहे? आणि श्रीमंत हा श्रीमंत राहून आणि गरीब हा गरीबच राहून समाजात संपन्नता कशी येईल? समाजात संपत्तीची निर्मिती कोण करते आणि तिचे वाटप कसे होते? श्रीमंत वर्ग, मालक वर्ग, भांडवलदार वर्ग श्रीमंत आहे कारण तो कामगार वर्गाच्या श्रमाचे शोषण करतो, हे आपल्याला कळत नाही का? त्याची श्रीमंती, त्याचे ऐश्वर्य आणि अय्याशबाजीची किंमत कामगार वर्ग स्वत:च्या रक्ताने आणि घामाने चुकवतो, हे आपण जाणत नाही का?**

आपण हे चांगलेच जाणतो की भांडवलदारांची प्रचंड संपत्ती आकाशातून टपकत नाही; त्यांची बॅंकेतील भलीमोठी शिल्लक 'ईश्वराची कृपा' नसते; त्यांच्या दिमतीस असलेली नौकरांची फौज 'देवतांनी' पाठवलेली नसते! ह्या सगळ्याची किंमत कष्टकरी जनता मोजत असते. खाजगी संपत्ती दुसरे तिसरे काही नसून केवळ आणि केवळ भांडवल आहे; जर पैश्याच्या बदल्यात खरेदी करण्यासाठी विविध वस्तू आणि सेवांची निर्मितीच होत नसेल तर पैश्याचे स्वत:चे असे काहीही मूल्य नाही; दुकानदार, व्यापारी, भांडवलदार, मालक किंवा कंत्राटदार हे वस्तू व सेवा निर्माण करत नाहीत! त्यांची निर्मिती सर्वहारा वर्ग करतो! **अगदी लहान सुईपासून अजस्त्र जहाजांपर्यंतची प्रत्येक गोष्ट सर्वहारा वर्ग बनवतो! ह्या वस्तू बनवूनसुद्धा ह्या सगळ्या वस्तू कामगारांपासून हिरावून घेतल्या जातात आणि त्या बदल्यात त्यांना जेमतेमे जगण्यासाठी पुरेल इतकीच खुराक मिळते. ही लूटच गरिबांच्या गरीबीचे खरे कारण आहे!** अशात, जोवर संपूर्ण उत्पादन भांडवलदारांच्या ताब्यात आह, जोपर्यंत उत्पादन समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी न होता भांडवलदारांच्या नफ्यासाठी होत राहील, तोपर्यंत गरीब गरीबच राहणार! भांडवलदार भलेही चांगली नियत असलेला आणि संत प्रवृत्तीचा का असेना, जर त्याला भांडवलदार म्हणून तग धरायचा असेल तर त्याला कामगारांचे शोषण करणे भाग आहे, त्याला कामगारांना बेकारीच्या दलदलीत ढकलावेच लागते. इथे नियत आणि हेतूंचा प्रश्नच नाही, प्रश्न वर्गाचा आहे! प्रश्न संपूर्ण व्यवस्था आणि सामाजिक संरचनेचा आहे! केजरीवाल

आणि 'आम आदमी पक्ष' ह्या भांडवली व्यवस्थेवर कुठलेच प्रश्नचिन्ह उपस्थित करत नाहीत, किंबहुना तिचे समर्थनच करतात. ते केवळ असा भ्रष्टाचार दूर करण्याची बात करतात ज्यामुळे मध्यमवर्ग आणि भांडवलदार वर्ग त्रस्त असतो. त्यामुळेच ते गरिबी आणि श्रीमंती हे विभाजन संपवण्याची भाषा करत नाहीत, त्याएवजी फक्त तोंडाची वाफ करत, हवाई भाषणबाजी करत म्हणतात की 'दिल्लीवर गरीब आणि श्रीमंत एकत्र राज्य करतील आणि गुण्यागोविंदाने राहतील!' केजरीवाल सरकारचे हे म्हणणे की ते श्रीमंतांपासून काहीही हिसकावून घेणार नाहीत आणि गरिबांना सगळ्या गोष्टी देतील, हास्यास्पद आहे आणि ही गोष्ट हेच दाखवते की एक तर केजरीवाल आणि त्यांचे बगलबच्चे मूर्ख आहेत किंवा दिल्लीमधील गरीब कामगारांना ते मूर्ख बनवत आहेत.

## केवळ भ्रष्टाचार संपल्यामुळे कामगारांचे शोषण थांबेल?

**केजरीवाल सरकार जरी सगळा भ्रष्टाचार संपवू शकले तरी त्यामुळे कामगारांची लूट थांबणे शक्य नाही.** जर भांडवलदार आणि मालक एकदम संविधान आणि श्रम कायद्यांच्या चौकटीत काम करू लागले तरी एका कामगाराला किती मजुरी मिळेल? जर दिल्ली राज्यात किमान वेतन कायद्याची सक्तीने अंमलबजावणी केली तरी कामगारांना दरमहा जास्तीत जास्त १०-११ हजार रुपये वेतन मिळेल. इतक्याने कष्टकरी जनतेचे जीवनमान उंचावेल का? तेसुद्धा दिल्ली सारख्या ठिकाणी जिथे रोजचं जगणं इतकं महाग झालं आहे की दोन वेळा भाकरी मिळवणेसुद्धा अवघड होऊन बसले आहे? **तसेही केजरीवाल श्रम कायद्यांच्या उल्लंघनाबद्दल - जरी हा सर्वात मोठा भ्रष्टाचार असला तरीही - चकार शब्दही बोलत नाहीत. दिल्लीमधील ६० लाखांपेक्षा जास्त कामगारांसाठी हा सर्वात महत्वाचा मुद्दा आहे. हा तो भ्रष्टाचार आहे ज्याने दिल्लीमधील जनतेचा खूप मोठा भाग प्रभावित झालेला आहे. परंतु केजरीवाल आणि त्यांचा 'आम आदमी पक्ष' ह्याबाबत मूग गिळून गप्प आहेत. ह्याचे कारण हे आहे की 'आप'च्या समर्थकांचा आणि नेते मंडळींचा एक मोठा हिस्सा छोट्या आणि मध्यम स्वरूपाचे मालक, कंत्राटदार, व्यापारी, प्रॉपर्टी डीलर्स आणि दुकानदारांमधून आलेला आहे. मागील 'आप' सरकारचे श्रममंत्री गिरीश सोनी स्वत: एक कारखाना मालक होते!** ह्यावरूनच हे स्पष्ट होते की कामगारांच्या प्रश्नांवर 'आप'ची काय भूमिका आहे!

## 'आम आदमी पक्षा'ची छोटे कारखानदार, कंत्राटदार, दलाल आणि दुकानदारांशी मैत्री!

**केजरीवाल यांनी नुकतेच एका टीव्ही इण्टरव्यू मध्ये म्हटले आहे की त्यांच्या मागील ४९ दिवसांच्या सरकारच्या कार्यकाळात त्यांनी टैक्स चोरी करणारे भ्रष्टाचारी दुकानदार आणि व्यापारी यांच्यावर छापा घालण्यापासून सरकारी कर विभागाला थांबवले होते.** त्यांचा हा तर्क होता की हे सरकारी विभाग आणि त्यांचे कर्मचारी कर चोरी करणाऱ्या दुकानदारांपासून लाच घेतात. म्हणजेच, सरकारी विभागाचा भ्रष्टाचार आणि व्यापाऱ्यांच्या भ्रष्टाचारामध्ये केजरीवाल यांनी केवळ सरकारी विभाग आणि कर्मचाऱ्यांच्या भ्रष्टाचाराला निशाणा बनवले आणि व्यापाऱ्यांच्या भ्रष्टाचाराकडे कानाडोळा केला किंवा त्यांना वाचवले! हेच केजरीवाल यांचे खरे धोरण आहे. ते केवळ सरकारी अधिकारी आणि राजकीय पुढारी यांच्या भ्रष्टाचारास मुख्य मुद्दा बनवतात आणि त्यातही मुख्यतः असा भ्रष्टाचार ज्यामुळे दुकानदार, भांडवलदार इत्यादींचे नुकसान होते. म्हणूनच केजरीवाल यांनी म्हटले होते की ते जातीने 'वैश्य' आहते आणि व्यापाऱ्यांचे दुःख ते जाणतात! केजरीवाल यांनी खास करून छोटे मालक, उद्योजक आणि दुकानदार यांना विश्वास दिला आहे की त्यांना 'आप'च्या सरकारला घाबरण्याचे कारण नाही! उलट त्यांना सरकारी विभागाच्या भ्रष्टाचारविरोधी छाप्यांपासून मुक्ती मिळेल!

**त्याच बरोबर, केजरीवाल यांनी भांडवलदारांना वचन दिले आहे की ते दिल्लीमध्ये दुकान लावणे आणि धंदा करणे अजून सुलभ करतील. हे कसे शक्य होईल?** आपल्याला माहिती असेलच की कोणताही कारखाना किंवा दुकान सुरू करण्यापूर्वी भांडवलदारांना बऱ्याच सरकारी चौकश्यांमधून जावे लागते, उदाहरणार्थ पर्यावरणाशी संबंधित चौकशी, श्रम कायद्यासंबंधी चौकशी, करसंबंधी चौकशी इत्यादी. केजरीवाल यांनी हे वचन दिले आहे की ह्या सगळ्या चौकश्यांपासून (इंस्पेक्शन्स) भांडवलदारांची सुटका होणार आहे. परंतु कामगारांना श्रम कायद्यांतर्गत मिळणारे अधिकार सुनिश्चित करणे, श्रम विभागांमध्ये लेबर इंस्पेक्टर्स आणि फैक्टरी इंस्पेक्टर्सची संख्या वाढवणे, श्रम कायदे काटेकोरपणे लागू करणे अशा मागण्यांबद्दल केजरीवाल कुठलेही ठोस वचन देत नाहीत. ह्यातूनच स्पष्ट होते की केजरीवाल आणि त्यांचा 'आम आदमी पक्ष' कामगारांसोबत मतांसाठी विश्वासघात करत आहेत, व त्यांचा खरा हेतू दिल्लीमधील भांडवलदार आणि खास करून छोटे आणि मध्यम व्यापारी यांची सेवा करणे हाच आहे.

## मागील वेळी कंत्राटी पद्धती रद्द करण्याच्या आश्वासनापासून का पलटले होते केजरीवाल सरकार आणि ह्या वेळी कामगारांचा विश्वासघात करण्यासाठी त्यांची रणनीती काय आहे?

हे सत्य आहे की केजरीवाल यांनी मागील निवडणुकीमध्ये कंत्राटी पद्धत बंद करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु त्यांच्या ४९ दिवसांच्या सरकारच्या कालावधीत केजरीवाल सरकारने ह्या आश्वासनापासून माघार घेतली होती. त्यांचे श्रम मंत्री गिरीश सोनी यांनी ६ फेब्रुवारीला हजारो कामगार निदर्शकांच्या समोर उघडपणे सांगितले होते की ते कंत्राटी पद्धत बंद करू शकत नाहीत कारण त्यांना मालक, व्यवस्थापन आणि कंत्राटदार यांचे हितसुद्धा बघावे लागते! ह्या वेळी कंत्राटी प्रथा बंद करण्याचे आश्वासन 'आम आदमी पक्षा'ने

त्यांच्या घोषणापत्रात केले तर आहे पण त्यावर ह्यावेळी मागच्या वेळेइतका जोर दिलेला नाही. ह्याचे कारण हे आहे की मागच्या ४९ दिवसांच्या कार्यकालामध्ये केजरीवाल सरकारला दिल्लीमधील कामगार आणि कर्मचाऱ्यांनी वारंवार घेरले होते. डीटीसीच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांपासून ते दिल्ली मेट्रो रेल्वे, दिल्ली मधील विविध औद्योगिक भागांमधील कंत्राटी कामगार, कंत्राटी पद्धतीवर काम करणारे होमगार्ड, शिक्षक इत्यादींनी केजरीवाल सरकारला वारंवार घेरून ह्या आश्वासनाची आठवण करून दिली होती. ६ फेब्रुवारीचे निदर्शन ह्या मालिकेमधले शेवटचे मोठे निदर्शन होते, ज्यानंतर एका आठ्वड्यातच केजरीवाल यांनी सरकार सोडून पळ काढला होता. ही मागणी ते पूर्ण करू शकत नाहीत हे त्यांच्याही लक्षात आले होते कारण असे केले तर दिल्लीमधील छोटे मालक, व्यापारी, कंत्राटदार इत्यादी 'आम आदमी पक्षा'वर नाराज होतील. जर ते नाराज झाले तर मग 'आम आदमी पक्षा'ला पैसा कोण देणार? मग 'आम आदमी पक्षा' चे सगळे नेते कुठे जातील जे स्वत:च कारखाना मालक, दुकानदार वा कंत्राटदार आहेत? ह्या वेळी केजरीवाल सरकारने त्यांच्या रणनीतीमध्ये बदल केला आहे. त्यांनी मागच्या वेळेप्रमाणे हे म्हटलेले नाहीये की ते ६ महिन्यांमध्ये दिलेली निम्मी आश्वासने पूर्ण करतील. ह्या वेळी केजरीवाल सरकारने म्हटले आहे की ही सर्व आश्वासने ५ वर्षांमध्ये पूर्ण केली जातील. सुरुवातीचे काही महिने काही प्रतीकात्मक कामं पूर्ण करून, मध्यमवर्गाला खूष करून आणि भ्रष्टाचार इत्यादींवर दिखाऊ हल्लाबोल करून काढावेत, अशी त्यांची रणनीती आहे. कामगारांना आश्वासन देऊन देऊन वाट बघायला लावायची आणि ते ही आश्वासने विसरून जातील ह्याची वाट बघायची. म्हणजेच, **केजरीवाल सरकार ह्या वेळी उच्च मध्यमवर्ग आणि मध्यम मध्यम वर्गाशी केलेली काही आश्वासने अगोदर पूर्ण करील आणि कामगारांच्या तोंडाला पाने पुसून ५ वर्षे ढकलेल. हीच त्यांची योजना आहे.**

## वीज बिल अर्धे कमी करणे आणि पाणी फुकट पुरवणे या आश्वासनांमागची केजरीवाल सरकारची रणनीती

विजेचे बिल अर्धे करण्याबाबतही केजरीवाल सरकार ह्यावेळी वेगळी भाषा बोलत आहे, ज्यावर कुणाचेही व्यवस्थित लक्ष गेलेले नाही. **ह्यावेळी ते म्हणत आहेत की वीज कंपन्यांचे ऑडिट केले जाईपर्यंत सरकार स्वत:च्या तिजोरीतून सब्सिडी देऊन विजेचे बिल अर्धे करेल आणि त्यानंतर ऑडिटचे निष्कर्ष आल्यानंतर विजेचे दर ठरवले जातील.** मागील वेळी सब्सिडी देणे अवघड झाले होते तेव्हा केजरीवाल सरकारने हा तर्क दिला होता. परंतु मागील निवडणुकांमध्ये केजरीवाल यांनी असे म्हटले नव्हते की विजेचे बिल तोपर्यंतच अर्धे ठेवले जाईल जोपर्यंत ऑडिट होत नाही. हे त्यांनी ४९ दिवसांच्या सरकराच्या कार्यकालात सांगितली होती, जेव्हा त्यांना ही गोष्ट लक्षात आली की अमर्याद काळासाठी शेकडो रुपयांची सबसिडी देता येणे शक्य नाही. हे ऑडिट 'कैग' नामक एक सरकारी संस्था करते. आतापर्यंतच्या इतिहासामध्ये ह्या संस्थेने अश्या प्रकारचे कोणतेही ऑडिट केलेले नाही जे सरळ सरळ मोठ्या कंपन्यांच्या विरोधात असेल. दिल्लीमध्ये वीज तयार होत नाही तर ती बाहेरून विकत घ्यावी लागते. ह्या विजेचे वितरण सुरुवातीस सरकारी विभाग 'दिल्ली विद्युत बोर्ड' करत असे. त्यानंतर हे काम दिल्लीच्या वेगवेगळ्या भागांमध्ये टाटाची कंपनी 'एनडीपीएल' आणि अंबानीची कंपनी 'बीएसईएस' ला बहाल करण्यात आले. 'कैग'च्या ऑडिटमध्ये हे स्पष्ट होईल की ह्या कंपन्यांना जर नफा कमवत विजेचे वितरण करायचे असेल तर विजेचे बिल निम्मे करता येणे शक्य नाही आणि त्यानंतर केजरीवाल सरकार वीज बिलामध्ये किरकोळ कपात करून हात वर करेल आणि म्हणेल – 'ऑडिटच्या निष्कर्षांमध्ये हे सिद्ध झाले आहे की विजेच्या बिलांमध्ये जास्त कपात करता येणे शक्य नाही, त्यावर आम्ही काय करू शकतो?' असेही होऊ शकते की विजेच्या बिलांमध्ये कुठलीही कपात होणारच नाही! विजेच्या बिलांमध्ये भरीव अशी कपात तेव्हाच होऊ शकते जर वीज वितरणामधील खाजगीकरण संपुष्टात येईल. मागील वेळी केजरीवाल यांनी संकेत दिले होते की जर दुसरा कुठलाही मार्ग उरला नाही तर खाजगीकरण संपवण्यात येईल. परंतु ह्यावेळी ते म्हणत आहेत की देशभरामध्ये खूप साऱ्या कंपन्या आहेत, त्यापैकी कुणाला तरी वीज वितरणाचे कंत्राट देण्यात येईल! हे निश्चितच आहे की, कुठलीही कंपनी नफ्यासाठीच कंत्राट घेईल, दिल्लीच्या जनतेला स्वस्त वीज देण्याकरिता नाही आणि कितीही स्पर्धा असली तरीही खाजगीकरणाच्या माध्यमातून विजेचे दर एका विशिष्ट मर्यादेपेक्षा खाली येणार नाहीत. खाजगीकरणाच्या माध्यमातून विजेचे दर सरळ निम्म्याने कमी केले जाणे शक्यच नाही कारण केजरीवाल सरकार अमर्याद काळासाठी सरकारी तिजोरीमधून सबसिडी देऊ शकत नाही. अशात, सरकारजवळ आपल्या कर्मचाऱ्यांना देण्यासाठी पगाराचे पैसेसुद्धा उरणार नाहीत! हीच गोष्ट पाणी फुकट पुरवण्याबाबतही लागू होते. दीर्घ काळ हे करणे भांडवली व्यवस्थेच्या चौकटीत खूपच अवघड काम आहे.

केजरीवाल सरकारने ह्यावेळी झोपडपट्टीवासियांना पुन्हा हे आश्वासन दिले आहे की त्यांना त्यांच्या झोपड्यांच्या जागी पक्की घरे बांधून देण्यात येतील. हे सुद्धा एक हवाई आश्वासनच आहे. दिल्लीमधील झोपडपट्टीवासी ५ वर्षे हे आश्वासन पूर्ण होण्याची वाट बघत राहतील. ह्याचे कारण हे आहे की सर्व झोपडपट्ट्या रेल्वे व अन्य केंद्रीय विभागांच्या जागेवरती वसलेल्या आहेत आणि त्याच जागेवर पक्की घरे देण्याचे कार्य नोकरशाहीच्या फेऱ्यामध्येच अडकून जाईल. अशाच प्रकारची अन्य खोटी आश्वासने देऊन केजरीवाल सरकार ह्या वेळी भारी बहुमताने सत्तेत आले आहे.

## 'आम आदमी पक्षा'च्या बाबतीत कष्टकरी जनतेने समजून घ्यावयाच्या काही अन्य गोष्टी

**कष्टकरी जनतेला काही गोष्टी समजून घेणे गरजेचे आहे: जो पक्ष भांडवलदार आणि कामगार यांच्यामध्ये**

**सामंजस्याची भाषा करत संपन्नतेचे आश्वासन देतो आहे तो त्यांचा विश्वासघात करत आहे; दुसरी गोष्ट, ज्या पक्षाचे बहुतेक नेते स्वतः कारखानदार, कंत्राटदार, व्यापारी, दुकानदार, पूर्वीचे खाते-पिते नोकरशाह आणि एनजीओ चालवणारे धन्देबाज आहेत, तो पक्ष कामगारांचे काय भले करणार? सत्तारूढ झालेले केजरीवाल सरकार कामगारांना कंत्राटी पद्धत नष्ट करण्यासाठी एका अशा विधेयकाचे आश्वासन का देत नाही जे दिल्ली राज्यातील सर्व नियमित प्रकारच्या कार्यामध्ये कंत्राटी पद्धतीवर बंदी आणेल? जर भ्रष्टाचाराच्या प्रश्नावर केंद्रीय कायदा असूनही दिल्ली राज्य स्तरावर जनलोकपाल विधेयक पास केले जाऊ शकते, तर मग केंद्रीय कंत्राटी मजुरी कायदा कमकुवत होण्याच्या परिस्थितीमध्ये दिल्ली राज्य स्तरावर कंत्राटी पद्धती उन्मूलन विधेयक का पास केले जाऊ शकत नाही? जर भ्रष्टाचाराच्या विरोधात मागील वेळेप्रमाणे जर एक हेल्पलाइन सुरु केली जाऊ शकते, तर मग कामगारांबरोबर होणारा अन्याय आणि भ्रष्टाचाराच्या विरुद्ध एक वेगळी कामगार हेल्पलाइन का सुरू केली जाऊ शकत नाही? दिल्ली राज्यात जगणे महाग होत चालले असताना केजरीवाल सरकार हे आश्वासन का देत नाही की ते दिल्ली राज्य स्तरावर किमान वेतन वाढवून कमीत कमी १५००० पर्यंत करेल?** ते हे करत नाहीत कारण ह्या मागण्या भांडवलदार आणि मालकांच्या विरोधात जातील, ज्यांच्याबरोबर केजरीवाल सरकार आणि 'आम आदमी पक्षा'चा घरोबा आहे. केजरीवाल सरकार गरीब आणि कामगारांना केवळ आणि केवळ लोकरंजक नारे देऊ शकते आणि काही प्रतीकात्मक सुधारवादी पाऊले उचलू शकते.

## दिल्ली मधील कष्टकरी जनतेने काय करावयास हवे?

दिल्ली मधील कामगारांना केजरीवाल सरकारने त्यांना दिलेली आश्वासनांची वारंवार आठवण करून द्यावी लागेल. **मुख्यत्वे दोन आश्वासने पूर्ण करण्यासाठी केजरीवाल सरकारला वारंवार घेरावे लागेल. लोक जेव्हा सत्तेत जातात तेव्हा सत्तेत येण्यासाठी केलेली आश्वासने विसरून जातात, कारण ही आश्वासने केवळ सत्तेत येण्यासाठी दिलेली असतात. अशात, वारंवार या आश्वासनांचे स्मरण करून द्यावे लागेल.** ह्या आश्वासनांपैकी दोन आश्वासने महत्वाची आहेत. पहिले आश्वासन आहे कंत्राटी पद्धत समाप्त करण्याचे. आणि दुसरे, झोपडपट्टीवासियांना त्यांच्या झोपड्यांच्या जागेवर पक्के घर देण्याचे आश्वासन.

**ह्यातील एका आश्वासनाबद्दल केजरीवाल सरकार म्हणू शकते की त्याची पूर्तता होण्यासाठी वेळ लागेल आणि त्यासाठी ५ वर्ष वाट बघा.** हे आश्वासन आहे झोपडपट्ट्यांच्या जागी पक्की घरे देण्याचे आश्वासन. त्यामुळे कामगारांनी ही मागणी करावी की केजरीवाल सरकारने पक्की घरे देण्याची एक पूर्ण कालबद्ध योजना सादर करावी, ज्यात विविध भागांमध्ये पक्की घरे देण्याची अंतिम तारीख दिली जावी, मग भले ती तारीख दोन, तीन किंवा ४ वर्षांनंतरची असो! जोपर्यंत केजरीवाल सरकार ह्यासाठीचे एक कालबद्ध आश्वासन देत नाही तोपर्यंत झोपड्यांच्या जागी पक्की घरे देण्याच्या आश्वासनामध्ये काहीही अर्थ नाही. दुसरी गोष्ट ही की केजरीवाल सरकारवर ह्याबाबतीत ठोस आश्वासन मिळवण्यासाठी दबाव निर्माण करावा लागेल की जोपर्यंत पक्की घरे दिली जात नाहीत तोपर्यंत एकही झोपडी पाडण्यात येणार नाही. कारण असे झाले तर झोपड्यांच्या जागी पक्की घरे देण्याच्या आश्वासनाला काहीही अर्थ उरणार नाही.

**दुसरे आश्वासन अशा प्रकारचे आहे की त्याची पूर्तता करण्यासाठीची सुरुवात लगेच केली जाऊ शकते. हे आश्वासन आहे कंत्राटी पद्धती समाप्त करण्याचे. ह्या बाबतीत दिल्लीमधील कंत्राटी कामगारांनी संघटित होऊन मागणी केली पाहिजे की दिल्ली राज्याच्या पातळीवर केजरीवाल सरकारने एक असा कायदा पास करावा जेणे करून नियमित स्वरूपांच्या कामामध्ये कंत्राटी कामगार ठेवण्यावर पूर्ण बंदी आणली जावी. अशा कायद्याशिवाय दिल्लीमध्ये कंत्राटी पद्धतीचे उन्मूलन शक्यच नाही. केंद्रीय कायद्यातील सगळ्या पळवाटा उपयोगात आणून कंत्राटदार आणि मालक कंत्राटी पद्धत चालूच ठेवतील. त्यामुळे जर केंद्रीय भ्रष्टाचारविरोधी कायद्याच्या कमकुवत होण्यामुळे दिल्ली राज्य स्तरावर एक जनलोकपाल कायदा पास केला जाऊ शकतो, तर मग कंत्राटी पद्धती उन्मूलन विधेयकसुद्धा पास केले जाऊ शकते. जर केजरीवाल सरकार कोलांटी मारत असेल तर त्यावरून स्पष्टच होईल की कंत्राटी पद्धतीचे उन्मूलन करण्याचे त्यांनी दिलेले आश्वासन ही निव्वळ धूळफेक होती.** असा कायदा बनल्यानंतर दिल्लीमधील कामगारांनी ही मागणी केली पाहिजे की ह्या कायद्याच्या अंमलबजावणीसाकरिता योग्य ती व्यवस्था उभी केली जावी. त्यात सगळ्यात महत्वाचे आहे ते म्हणजे दिल्ली मधील श्रम विभागामध्ये कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ करणे. ह्या अगोदरही सरकार वारंवार हे सांगून स्वत:ची जबाबदारी झटकत राहिले आहे की श्रम विभागामध्ये पुरेश्या संख्येमध्ये लेबर इंस्पेक्टर व फैक्टरी इंस्पेक्टर नाहीत. दिल्लीमध्ये लाखोंच्या संख्येने पदवीधर व पदव्युत्तर स्नातक नोकऱ्यांच्या शोधात फिरत आहेत, तेव्हा केजरीवाल सरकार श्रम विभागामध्ये मोठ्या प्रमाणात भर्ती करून रोजगारसुद्धा निर्माण करू शकते आणि त्याचबरोबर श्रम कायद्यांची अंमलबजावणीसुद्धा सुनिश्चित करू शकते. कंत्राटी पद्धतीच्या संपूर्ण उन्मूलनाची मागणी प्रभावी पद्धतीने मांडण्यासाठी दिल्लीमधील सर्व खाजगी आणि सार्वजनिक उपक्रमांमधील, विभागांमधील कर्मचारी आणि कामगारांना संघटित केले पाहिजे. केवळ ह्याच मार्गाने हे सिद्ध होऊ शकेल की केजरीवाल सरकार खरेच गरिबांच्या बाजूने आहे की त्याने केवळ मतांच्या राजकारणासाठी दिल्लीमधील गरीब जनतेचा विश्वासघात केला आहे.

**अजून एक मागणी जी दिल्लीमधील कामगार आणि निम्न मध्यमवर्गातील तरुणांनी खास करून केली पाहिजे ती म्हणजे दिल्ली राज्य स्तरावर एका रोजगार हमी**

**विधेयकाची मागणी.** आमचा तर्क हा आहे की जर कॉंग्रेस शासनाच्या काळात अखिल भारतीय स्तरावर ग्रामीण रोजगार हमी कायदा पास केला गेला होता, तर मग दिल्ली राज्यामध्ये जनतेला रोजगार हमी कायदा का देण्यात येऊ नये? 'मनरेगा'मध्ये केवळ १०० दिवसांचा रोजगार मिळत असे आणि त्यासाठी किमान मजुरीही मिळत नसे, पण तरीही आपण ह्या अधिकाराची मागणी केली पाहिजे आणि त्याचबरोबर ही मागणीसुद्धा करू शकतो की ह्या कायद्यान्वये १०० दिवसांऐवजी कमीत कमी २०० दिवसांचा रोजगार मिळावा आणि त्याबदल्यात दिल्ली राज्यातील किमान मजुरी मिळावी. ह्या कायद्यात एक तरतूद ही असावी की जर दिल्ली सरकार दिल्लीमधील कोणत्याही नागरिकाला रोजगार देऊ शकत नसेल तर त्याला उदरनिर्वाह भत्ता दिला जावा. म्हणजे उत्तर प्रदेश सारखा १०००-१२०० रुपयांचा बेरोजगारी भत्ता नव्हे तर राष्ट्रीय किमान मजुरीच्या हिशोबाने भत्ता मिळाला पाहिजे. ह्या मागणीच्या माध्यमातून दिल्ली मधील कामगारांना काही अंशी सुरक्षितता मिळू शकते, जे औद्योगिक मंदीमुळे बऱ्याच वेळा बेकारीच्या झळा सोसतात. त्याच बरोबर ह्या मागणीच्या पूर्ततेबरोबरच दिल्लीमधील लाखो तरुणांना रोजगार मिळू शकतो.

ह्या तीन मुलभूत मागण्या घेऊन दिल्लीमधील कामगारांनी संघर्ष केला पाहिजे. येणाऱ्या ५ वर्षांमध्ये हा संघर्षच स्पष्ट करेल की 'आम आदमी पक्ष' आणि केजरीवाल यांच्या 'सदाचार' आणि 'सद्हेतू'मागचे सत्य काय आहे. कामगारांसमोर देखील ह्यांचा खरा चेहरा उघड होईल. कामगार चळवळीला 'आम आदमी पक्षा'चे शेपूट बनण्याऐवजी स्वत:च्या राजकारणाची स्वतंत्रता आणि स्वायत्तता राखून ठेवावी लागेल. जर कामगार वर्ग स्वत:च्या राजकारणाची स्वतंत्रता आणि स्वायत्तता राखून ठेऊ शकला नाही, जर तो आपल्या वेगवेगळ्या स्वतंत्र संघटनांची स्वायत्तता राखू शकला नाही तर तो स्वत:ची शक्ती गमावून बसेल. अशा परिस्थितीमध्ये तो त्याच्या विरुद्ध रचण्यात येणारे षड्यंत्र आणि विश्वासघात यांचा सामना करू शकणार नाही. तो निष्क्रिय आणि अशक्त होईल. त्यामुळेच 'आम आदमी पक्षा'च्या राजकारणाचे वर्गचारित्र्य समजून घेण्याची आवश्यकता आहे. ह्या पक्षाने जी आश्वासने दिली आहेत, त्यापैकी एका एका आश्वासनाच्या पूर्ततेसाठी कामगारांना त्यांच्या स्वतंत्र आंदोलनाच्या माध्यमातून केजरीवाल सरकारवर दबाव टाकावा लागेल, त्यांचे शेपूट बनून त्यांच्या मागे मागे जाण्याचे धोरण चालणार नाही. जर कामगारांनी आपले स्वतंत्र आणि स्वायत्त वर्गीय आंदोलन कमकुवत होऊ दिले तर येणाऱ्या काळात केजरीवाल यांच्याकडून केवळ आणि केवळ विश्वासघात पदरी पडेल. केजरीवाल सरकारने कामगारांना मोठमोठी आश्वासने दिली आहेत, त्यामुळे कामगारांनी त्यांच्या स्वतंत्र वर्गीय आंदोलनांच्या माध्यमातून केजरीवाल सरकारच्या छाताडावर बसून सरकार दिलेल्या आश्वासानांपासून माघार घेणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

**कामगार वर्तमान पत्रक 'मजदूर बिगुल' मधून साभार**
**– अनुवाद अमित शिंदे**

●

# महाराष्ट्रात कामगार हितांवर घाला

**( पान ११ वरून )**

तयार करत आहेत आणि त्यानंतर कुठल्याश्या एका जागी ते सर्व भाग जुळवण्यात (असेम्बल) येतात. ह्या मुळे केवळ फॅक्ट्रीचा आकारच छोटा होत नाही तर कामगारांच्या संगङ्गित होण्यावरसुद्धा मर्यादा येतात. त्याच बरोबर बहुतांशी काम हे लोकांच्या घरात किंवा छोट्या छोट्या वर्कशॉप्समध्ये करवून घेणे शक्य होते. फॅक्ट्री एक्टमधील उपरोक्त दुरुस्तीच्या माध्यमातून देशभरात मोठ्या संख्येने असलेल्या छोट्या कारखानदारांना कामगारांचे शोषण करण्याची खुली सूट मिळणार आहे.

कंत्राटी कायदा - १९७० आता २० वा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या कारखान्यांवर लागू होण्याऐवजी ५० वा जास्त कामगार असलेल्या कारखान्यांसाठी लागू होईल. उल्लेखनीय गोष्ट ही आहे की आज देशभरातील कामगारांच्या एकूण संख्येपैकी ९२ टक्के कामगार हे असंगङ्गित क्षेत्रात काम करत आहेत. त्यांच्यासाठी अगोदरच फार थोडे श्रम कायदे अस्तित्वात आहेत आणि त्यातूनही जे कायदे आहेत त्यांची अंमलबजावणीसुद्धा होत नाही. पिस रेट, रोजंदारी, कंत्राट इत्यादी मार्गांनी कामगारांचे प्रचंड शोषण करणे शक्य होते. अशा परिस्थितीत आणखी जास्त कामगारांना कायद्यांच्या कक्षेच्या बाहेर फेकण्यास ह्या कायद्यामधील दुरुस्तीमुळे मदतच होईल आणि राज्यातील कंत्राटी कामगारांच्या शोषणाच्या मर्यादेमध्ये वाढ केल्याबद्दल धनदांडगे महाराष्ट्रातील देवेंद्र फडणवीस सरकारला दुवाच देतील.

मे, २०१४ मध्ये 'अच्छे दिन'चे पिल्लू सोडून सत्तेत आलेल्या भाजपने सत्तेमध्ये येताच स्वत:चा खरा रंग दाखवण्यास सुरुवात केली आहे. केंद्रातील नरेंद्र मोदीच्या नेतृत्वाखालील भाजप सरकार दररोज अशी धोरणे लागू करत आहे जेणेकरून देशभरातील कष्टकरी जनतेचे 'बुरे दिन' येत आहेत आणि त्याच पावलांवर पाउल ठेवत महाराष्ट्रामध्ये देवेंद्र फडणवीस सरकार कामगार हितांना धाब्यावर बसवून धनदांडग्यांचे 'अच्छे दिन' आणण्यास सज्ज झाले आहे. कामगारांनी ह्या 'अच्छे दिन'चा अर्थ नीट समजून घेतला पाहिजे.

**जेव्हा विवेक झोपी जातो,**
**तेव्हा राक्षस जन्मास येतात.**
**फ्रांसिस्को द गोया ( विख्यात स्पॅनिश चित्रकार, १७४६ - १८२८ )**

प्रासंगिक

# महाराष्ट्रात कामगार हितांवर घाला

## श्रम कायद्यांमध्ये ‘सुधारणां’च्या नावाखाली उरले-सुरले अधिकार हिरावून घेण्याची तयारी

• सत्यनारायण

राजस्थान आणि मध्यप्रदेश मधील भाजप सरकारांच्या पावलांवर पाऊल ठेऊन आता महाराष्ट्र सरकारनेसुद्धा श्रम कायद्यांमध्ये सुधारणा करण्याचा बहाणा करून कामगारांच्या अधिकारांवर मोठा हल्ला केला आहे. नरेंद्र मोदीच्या ‘मेक इन इंडिया’ घोषणेच्या धर्तीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘मेक इन महाराष्ट्र’ची घोषणा दिली आहे आणि त्यासाठी भांडवलदारांना पर्यावरण विषयक कायद्यांमध्ये सवलती देणे, स्वस्त दरामध्ये किंवा फुकट जमिनी आंदण देणे, करांमध्ये सूट देणे आणि श्रम कायदे मोडीत काढण्याच्या दिशेने पाऊले उचलण्यात आली आहेत.




महाराष्ट्र सरकारच्या श्रम विभागाने तीन कायद्यांमध्ये - फॅक्ट्री एक्ट - १९४८, इण्डस्ट्रियल डिस्प्युट एक्ट -१९४७ आणि कंत्राटी कायदा -१९७१ - मध्ये त्याच दुरुस्त्या सुचवल्या आहेत, ज्या राजस्थान सरकारने लागू केल्या आहेत. केंद्र सरकारकडून ह्या दुरुस्त्या लागू होऊ देण्यामध्ये कुठलीही आडकाठी नसल्यामुळे ह्या दुरुस्त्यांचे कुठल्याही आडकाठी शिवाय कायद्यात रूपांतर होईल.

स्वत:चा फायदा वाढवण्यासाठी कामगारांना कामावरून कमी करणे, उद्योग बंद करणे इत्यादी बाबत अमर्याद सूट मिळावी असे प्रत्येक भांडवलदारास वाटत असते. हीच गोष्ट लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने इण्डस्ट्रियल डिस्प्युट एक्ट -१९४७ जिच्या अन्वये कुठलाही उद्योग, ज्यात १०० पेक्षा जास्त कामगार काम करतात, बंद करणे किंवा कामगारांना कामावरून काढून टाकण्यासाठी सरकारची परवानगी घ्यावी लागत असे, त्याच्या तरतुदींमध्ये ‘सुधारणा’ करण्याच्या दिशेने पाउले उचलण्यास सुरुवात केली आहे. आता ही मर्यादा वाढवून ३०० कामगार-संख्या करण्यात येत आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जवळ जवळ ४१००० औद्योगिक आस्थापन आहेत ज्यापैकी ३९००० आस्थापनांमध्ये ३०० पेक्षा कमी कामगार काम करतात, हे येथे लक्षात घेतले पाहिजे. म्हणजेच हा कायदा लागू झाल्यानंतर इथल्या ९५टक्के कारखाना मालकांना कामगार कपात करण्याची खुली सूट मिळेल. बेशरमपणाची हद्द म्हणजे सरकार, मिडिया आणि मोठमोठे धनदांडगे ह्या उपायांचे समर्थन करत आहेत (आणि करणार का नाहीत? हे त्यांच्याच फायद्यासाठी तर चालू आहे!). इण्डियन मर्चेण्टस चैम्बरचे अध्यक्ष प्रबोध ठक्कर यांनी ह्यावर टिपण्णी करत असताना म्हटले आहे - ‘‘जुनाट श्रम कायद्यांमुळे उत्पादनावर विपरित परिणाम होतो. उद्योगपती अशा देशांमध्ये गुंतवणूक करण्यास प्राधान्य देतात जिथले श्रम कायदे लवचिक असतात. नोकरी शिवाय श्रम कायद्यांच्या रूपातील सुरक्षेचा तरी काय उपयोग?’’

अशाच प्रकारे श्रम विभागाने फॅक्ट्री एक्ट १९४८ मध्ये दुरुस्ती प्रस्तावित केली आहे. फॅक्ट्री एक्ट लागू होण्यासाठी म्हणून आवश्यक असलेल्या कामगारांच्या संख्येचा निकष दुप्पट केला आहे. आता फॅक्ट्री एक्ट, २० वा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या (जिथे विजेचा उपयोग होतो) किंवा ४० वा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या (जिथे विजेचा उपयोग होत नाही) कारखान्यांसाठीच लागू होइल. अशा प्रकारे सरळ-सरळ मोठ्या संख्येने छोट्या कारखानदारांना फॅक्ट्री एक्ट मधून मुक्त करण्यात आले आहे. जागतिक असेम्बली लाईनच्या ह्या युगात बहुतेक कारखाना मालक वेगवेगळ्या ठिकाणी (जिथे जी गोष्ट स्वस्त मिळेल आणि जिथे श्रम स्वतात मिळेल ह्या सूत्राने) त्यांच्या उत्पादनाचा एक-एक भाग

( पान १० वर )

समाज

# भारतीय विज्ञान परिषद

## वैज्ञानिक तर्कपद्धतीचे श्राद्ध घालण्याची तयारी

• तपीश


तसे पाहिले तर ह्या लेखाचा विषय नुकत्याच संपन्न झालेल्या भारतीय विज्ञान परिषदेशी निगडीत आहे, तरीही मी ह्या लेखाची सुरुवात थोडेसे मागे जाऊन, फार नाही, एक वर्षभर मागे जाऊन करत आहे. २ मार्च, २०१३ रोजी राजनाथ सिंग म्हणाले होते, ''जर आमची सत्ता आली तर भारताला जगाची बौद्धिक राजधानी (वाचक 'कुपमंडूकांची राजधानी' असेही वाचू शकतात!) बनवू, भारताला पुनश्च जगद्गुरुच्या ( वाचक 'गुरु घंटाल' असेही वाचू शकतात!) स्थानी विराजमान करू.'' त्याच भाषणामध्ये त्यांनी हेही सांगितले होते की भौतिकशास्त्राचा जगप्रसिद्ध अनिश्चिततेचा सिद्धांत वेदांमध्ये अगोदरच विशद केलेला आहे. ह्या सिद्धांताचे जनक समजले जाणारे हाइजेनबर्ग यांना ह्या सिद्धांताची माहिती १९२९ मधील भारतभेटीच्या दरम्यान रवींद्रनाथ टागोर यांच्याशी झालेल्या चर्चेमधून मिळाली. बिचाऱ्या राजनाथ सिंग यांना हे माहिती नव्हते की हाइजेनबर्ग यांनी हा सिद्धांत भारतभेटीच्या २ वर्षे अगोदरच मांडला होता! अशाच प्रकारे केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री हर्षवर्धन यांच्याकडून शुल्भ-सूत्रांची मोडतोड करून त्याला पायथागोरसच्या प्रमेयाच्या समतुल्य दाखवण्याचा प्रयत्न असो किंवा मोदींनी (गणपतीचे उदाहरण देऊन) केलेला प्लास्टिक सर्जरीचा दावा किंवा संघाशी संबंधित किंवा संघाच्या विचारधारेने प्रभावित बुद्धिवंतांकडून (?!) केल्या जात असलेल्या जैनेटिक इंजीनीयरिंग, अणूबॉम्बचे अस्तित्व, गुरुत्वाकर्षणाच्या नियमाचा शोध... म्हणजेच सर्व आधुनिक वैज्ञानिक शोधांचा उल्लेख वेदांमध्ये पूर्वीच होता अश्या दाव्यांची मालिकाच सुरू झाली आहे.

देशातील पुराणपंथी आणि पुनरुत्थानवादी शक्ती ज्या ''बौद्धिक'' वातावरण निर्मितीमध्ये तन-मन-धन (येथे हे लक्षात घ्या की हे 'धन' देशी-विदेशी भांडवलदारांच्या तिजोरीमधून बरसते) अर्पण करून लागल्या आहेत त्याचेच प्रतिबिंब भारतीय विज्ञान परिषदेच्या मुंबई येथील अधिवेशनामध्ये पडलेले बघावयास मिळाले. भारतीय विज्ञान परिषदेच्या मुंबई येथील अधिवेशनामध्ये प्राचीन भारतामधील वैमानिक तंत्रज्ञानाच्या (Aviation Technology) प्रगतीवर एक पेपर प्रस्तुत करण्यात आला. ह्या पेपरचे लेखक आनंद बोडस यांनी दावा केला की आपल्याकडील ऋषी-मुनींनी ७००० वर्षांपूर्वी विमान बनवण्याची कला आणि तंत्रज्ञान ह्यात नैपुण्य प्राप्त केले होते. ही विमाने एका देशातून दुसऱ्या देशाची, एका खंडातून दुसऱ्या खंडाची आणि एका ग्रहावरून दुसऱ्या ग्रहाची यात्रा करू शकत असत! हा दावा सादर करणाऱ्या ह्या नकली वैज्ञानिकाने, तो सांगत असलेली माहिती 'वैमानिक शास्त्र' नामक ग्रंथातून घेतल्याचे सांगितले. ह्या पाखंडी माणसाने असा दावासुद्धा केला की ह्या शास्त्राची रचना ऋषी भारद्वाज यांनी ७००० वर्षांपूर्वी केली होती. श्री बोडस यांचा असा दावा आहे की ही विमाने ६० ते २०० फूट लांब असत आणि त्यांच्यामध्ये ४० छोटी इंजिने लावलेली असत. ही विमाने चालवणाऱ्या वैमानिकांच्या पोशाखाचा उल्लेख करत असताना हे महाशय म्हणतात की त्यांचे कपडे पाण्यामध्ये उगवणाऱ्या एका विशिष्ट प्रकारच्या वनस्पतीपासून तयार केले जात. अशाच प्रकारे ह्या अधिवेशनामध्ये अन्य दोन पेपर्सच्या माध्यमातून हे सांगण्याचा प्रयत्न केला गेला की प्राचीन काळातच भारतामध्ये आजच्या एवढी उन्नत शल्य चिकित्सा पद्धती (Surgical Science) अस्तित्वात होती आणि वनस्पती शास्त्र (Botany) सुद्धा आजच्या इतकेच उन्नत होते. चला तर मग, सर्वप्रथम आनंद बोडस यांच्या 'वैमानिक शास्त्र'मधील दावे आधुनिक वैज्ञानिकांनी केलेल्या शोधांच्या कसोटीवर टिकतात की नाही ते पाहू आणि त्यावर ह्या वैज्ञानिकांचे काय मत आहे तेही बघू या.

४० वर्षांपूर्वी IISC, बेंगलोर मधील प्राध्यापक मुकुंद, एस.एस.देशपांडे, एच.आर. नागेन्द्र, ए.प्रभु आणि एस.पी गोविन्दराजू ह्यांच्या टीमने १९७४ मध्ये Scientific Opinion नामक शोध-पत्रिकेमध्ये एक पेपर प्रकाशित केला होता ज्याचे शीर्षक होते ''Critical Study of the Work Vyamanika Shastra''. ह्या पेपरमध्ये ह्या वैज्ञानिकांनी 'वैमानिक शास्त्र' ह्या पुस्तकाच्या अभ्यासाच्या आधारे काही निष्कर्ष काढले होते जे अवैज्ञानिक दृष्टीकोन ठेवणाऱ्या लोकांच्या काल्पनिक उपलब्धींमधील हवा काढून घेण्यास पुरेसे आहेत. ह्या पेपरमध्ये वैज्ञानिकांनी ह्या पुस्तकाच्या अभ्यासाच्या आधारे असे म्हटले होते की हे पुस्तक पंडित सुब्भार्या शास्त्री द्वारा १९०० ते १९२२ च्या दरम्यान शोधले गेले आहे, ज्याला १९५१ मध्ये International Academy of Sanskrit Research at Mysore चे संस्थापक ए.एम. जोयसेर यांच्या द्वारे प्रकाशित केले गेले होते. त्यामुळे हे पुस्तक ७००० वर्षांपूर्वी ऋषी भारद्वाज यांनी लिहिले आहे असे म्हणणे चुकीचे आहे. ह्या पेपरमध्ये 'वैमानिक शास्त्र'मध्ये वर्णिलेल्या विमानांच्या बाबतीत प्राध्यापक मुकुन्द यांनी त्यांच्या चमूबरोबर सखोल अभ्यास करून नमूद केले की ''ह्या पुस्तकामध्ये विमानांच्या बाबत वास्तविक

तथ्य देण्या ऐवजी मनमानी विवरण देण्यात आले आहे''. वर्णन केलेल्या कुठल्याही विमानाची ना योग्यता आहे, ना त्यांच्यामध्ये अशी लक्षणे आहेत ज्यांच्या आधारे त्यांना उडवता येऊ शकेल; त्यांचे त्रिकोनमितिय स्वरूप उडण्यासाठी आवश्यक निकषांच्या पातळीवर अकल्पनीयरित्या भयंकर असे आहे, आणि ज्या सिद्धांतांचे वर्णन विमानाच्या उडण्या संबंधात केले गेले आहे ते सिद्धांत प्रत्यक्षात त्यांना उडण्यास सहाय्यभूत ठरणारे नाहीत'.[१]

दूरच्या भूतकाळात अस्तित्वात असलेल्या स्वर्णिम इतिहासाची मनमोहक कल्पना वास्तवात विज्ञानाचा मार्ग कश्या प्रकारे प्रशस्त करू शकेल ह्याचा निर्णय आपण सुजाण वाचकांवरती सोडूयात आणि ह्या विज्ञान परिषदेमध्ये प्रस्तुत केल्या गेलेल्या वनस्पती शास्त्राचा विकास आणि शल्य चिकित्सेसंबंधीच्या अतिरंजित दाव्यांच्या मागचे सत्य समजून घेण्याचा प्रयत्न करूयात.




आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त भारतीय विचारवंत देवीप्रसाद चट्टोपाध्याय यांनी आपल्या प्रसिद्ध 'प्राचीन भारतातील विज्ञान आणि समाज' या ग्रंथातील अकराव्या अध्यायामध्ये चरक संहिता, सुश्रुत संहिता आणि अष्टांग—हृदय संहिता यामध्ये नमूद केलेल्या वनस्पतींसंबंधात स्पष्ट उल्लेख केला आहे - ''सर्वप्रथम वनस्पतींची चर्चा करूयात - ठाकुर बळवंत सिंह आणि के. सी. चुनेकर यांनी कित्येक दशके चिकाटीने संशोधन करून आयुर्वेद विषयक ३ प्रमुख ग्रंथांमध्ये उल्लेखिलेल्या जडी-बुटी, वनस्पतींची यादी बनवली आहे. त्यांच्या संख्येविषयी ते लिहितात : 'ह्या तिन्ही संहितांमध्ये उल्लेख आलेल्या जडी-बुटी, वनस्पतींची संख्या ढोबळमानाने ६०० ते ७०० च्या दरम्यान असल्याचे अनुमान आहे....' इथे लक्षात घेण्याची गोष्ट ही आहे कि ह्या आयुर्वेदिक ग्रंथांमध्ये ह्या वनस्पतींवर वनस्पतींच्या रूपात विचार केला गेलेला नाही. ह्यांमध्ये केवळ ह्या गोष्टीचे विवेचन केले गेले आहे की ह्या वनस्पतींच्या विभिन्न भागांचा किंवा त्यांच्यापासून निर्मित उत्पादनांच्या उपयोगाने मनुष्याच्या शरीरावर काय प्रभाव पडतो.''[२] वाचक इथे हे बघू शकतात की प्राचीन आयुर्वेदाचार्यांच्या वनस्पती जगतातील रुचीचे मुख्य कारण वनस्पती शास्त्राचा आधुनिक दृष्टीकोन - ज्याने ज्ञानाच्या ह्या शाखेला स्वतंत्र अश्या संशोधन शाखेत रुपांतरीत केले - नसून त्या वनस्पतींमधील औषधी गुणधर्म हे होते.

ह्याच विज्ञान परिषदेमध्ये अश्विन सावंत यांच्या द्वारे शल्य चिकित्सेवर सादर केलेल्या पेपरमध्ये दावा केला गेला की भारतामध्ये आजपासून ८००० वर्षांपूर्वी प्लास्टिक सर्जरी सोबतच कपाळ आणि डोळ्यांची सर्जरीसुद्धा होत असे. हे सत्य आहे की चरक संहितेमध्ये शल्य चिकित्सेचे वर्णन आढळते. परंतु अश्विन सावंत यांच्याकडून ८००० वर्षांपूर्वी शल्य चिकित्सा अस्तित्वात असल्यासंबंधी जो दावा केला गेला आहे, त्याची सत्यता पडताळण्यासाठी आपल्याला ह्या विषयाचा विस्तृत धांडोळा घ्यावा लागेल.

सत्य तर हे आहे की आयुर्वेदाच्या विकासाचा इतिहास हा भारतातील प्रगतिशील आणि प्रतिगामी शक्तींमधील संघर्षाचा इतिहास राहिला आहे. पुरातन काळात आयुर्वेदाला, जेव्हा तो त्याच्या विकासाच्या प्रारंभिक अवस्थेत होता, समाज-बहिष्कृत करण्यात आले होते आणि अशा प्रकारे प्राचीन भारतातील एका महान भौतिकवादी वैज्ञानिक परंपरेला परम्परावाद्यांकडून आणि पोंगा-पंडितांकडून धुळीस मिळवले गेले. आता ह्यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीही नाही की त्या काळातील पोंगा पंडितांचे आजचे वारसदार अर्थातच आर.एस.एस. आणि त्यांचे संस्कृती-धर्म-ध्वजधारी नवनवीन मार्गांनी विज्ञान विरोधी प्रचार करत आहेत.

आयुर्वेदाच्या इतिहासाची चर्चा करत असताना देवी प्रसाद चट्टोपाध्याय यांनी त्यांची रचना 'प्राचीन भारतातील विज्ञान आणि समाज' मध्ये एका ठिकाणी सांगितले आहे की ''आयुर्विज्ञानाला भारतीय परंपरेमध्ये आयुर्वेद म्हटले गेले आहे. त्याचे ३ प्रमुख स्त्रोत ग्रंथ आहेत ज्यांना अलंकारिक भाषेमध्ये वृद्धत्रयी अर्थातच तीन प्राचीन ग्रंथ असे म्हटले जाते. ते ग्रंथ आहेत : चरक संहिता, सुश्रुत संहिता आणि अष्टांग संग्रह.''...[३] प्राचीन काळामध्ये चरक संहितेच्या उपेक्षेचे ठोस ऐतिहासिक पुरावे उपलब्ध आहेत. चट्टोपाध्याय हे सांगतात की संहितेच्या रचनेमध्ये अंतिम योगदान दिलेल्या दृढ़बल ह्याने स्वत: हे कबूल केले आहे की ''अग्निवेशद्वारे तंत्रबद्ध आणि चरकाद्वारे संस्कृतबद्ध करून त्याच्यापर्यंत (दृढ़बल पर्यंत) पोहोचेतो चरक संहितेचा जवळ जवळ एक तृतीयांश भाग गायब झाला होता.''...[४] वाचकांनी ही गोष्ट लक्षात घ्यावी की दृढ़बलाचा जन्म गुप्त काळात सहाव्या शतकाच्या आसपास झाला होता. भारतीय विधी निर्मात्यांमध्ये सर्वात प्राचीन मानले जाणारे आपस्तंब, गौतम आणि वसिष्ठ यांची वचने उद्धृत करून चट्टोपाध्याय यांनी काया चिकित्सक आणि शल्य चिकित्सकांच्या (Physicians) प्रती ब्राह्मण आणि पुरोहित वर्गाने पसरवलेल्या घृणेच्या भावनेचा संदर्भ देत म्हटले आहे की ''आपस्तंब धर्मसूत्रात म्हणतात : 'एखाद्या काया चिकित्सकाकडून, शिकाऱ्याकडून, शल्य चिकित्सकाकडून, व्याभिचाऱ्याकडून किंवा षंढ व्यक्तीकडून अन्न ग्रहण करू नये...' गौतम धर्मसूत्रामध्ये ह्या गोष्टीवर जोर दिला गेला आहे की 'ब्राह्मण एखाद्या अशा व्यापाऱ्याकडून तर अन्न ग्रहण करू शकतो जो

स्वत: कारागीर नाही परंतु त्याने एखाद्या कारागीर, व्यभिचारिणी स्त्री, अपराधी, सुतार, शल्य चिकित्सक आणि अशाच अन्य लोकांकडून अन्न ग्रहण करता कामा नये.' त्याच प्रकारे वसिष्ठसुद्धा म्हणतो की 'याचना न करताही जर एखादा काया चिकित्सक, शिकारी, शल्य चिकित्सक भिक्षा देऊ इच्छित असेल तरी ती भिक्षा घेण्याचा निषेध केला पाहिजे.' "[५]

चट्टोपाध्याय पुढे लिहितात की धर्मसूत्रांपासून ते स्मृतींच्या रचनेच्या दीर्घ कालखंडामध्ये चिकित्सक आणि त्याच्या चिकित्सा कार्याविषयी जवळ जवळ सर्व धर्मासूत्रकार आणि स्मृतीकारांची तिरस्काराची भावना जशीच्या तशी कायम राहिली. ते पुढे लिहितात की मनुने तर हेदेखील घोषित केले की "चिकित्सकाकडून प्राप्त झालेले अन्न 'पू'सारखे दूषित असते"[६] अशा प्रकारे आपण बघू शकतो की भारतीय चिकित्सा शास्त्रामधील महान वैज्ञानिकांवरसुद्धा शूद्रांप्रमाणेच नीचता लादण्यात आली.

आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्याच्याशी निगडित शेकडो संघटना तसेच खाटे बुद्धिजीवी पुराणांत आणि शास्त्रांमध्ये असलेल्या आणि धर्माच्या वेष्टनात गुंडाळून ठेवलेल्या महान भौतिकवादी परंपरा आणि वैज्ञानिक उपलब्धींच्या जागी मिथक, भाकडकथा यांनाच प्राचीन भारताच्या वैज्ञानिक उपलब्धींच्या रूपात प्रस्तुत करण्याच्या आपल्या फॅसिस्ट अजेंड्यावर मोठ्या प्रमाणात काम करत आहेत. आपण विसरता कामा नये की फॅसिस्ट शक्तींचा पहिला हल्ला जनतेची तर्कशक्ती आणि इतिहासबोध यांवरच असतो. तर्कशक्ती आणि इतिहासबोध ह्यांनी रिक्त समाजमानस फॅसिस्ट अजेंड्यावर संघटित करणे नेहमीच सोपे असते. जर्मनीमध्ये हिटलरने पाठ्यपुस्तकांचे पुनर्लेखन करावयास लावले होते, हा निव्वळ योगायोग नाही. त्याने जर्मन समाजाचे हरवलेले वैभव पुन्हा प्राप्त करून देण्याचे आश्वासन जनतेला दिले होते आणि जर्मनीला जगातील सर्वात शक्तिशाली देश बनवण्याचे स्वप्न दाखवले होते. आज आपणसुद्धा चहूबाजूंनी अश्या असंख्य घटना घडताना बघत आहोत.

आपण हेही लक्षात घेतले पाहिजे की अंधविश्वास आणि इतिहासोन्मुखता यांच्या वाढत्या ज्वराचा संबंध केवळ आर.एस.एस, भाजपा किंवा त्यांच्या सहयोगी संघटनांपुरता मर्यादित नाही. आज ही एक विश्वव्यापी परिघटना बनली आहे आणि वेगवेगळ्या धार्मिक कट्टरपंथी आणि पुनरुत्थानवादी शक्ती ह्यामध्ये सहभागी आहेत. ह्या परिघटनेचा वस्तुगत आधार भांडवलशाहीच्या विश्वव्यापी पतनोन्मुखतेमध्ये निहित आहे. आज जागतिक भांडवलशाही तिच्या स्वाभाविक गतीने अशा स्थितीला येऊन पोहोचली आहे जेथून तिच्याकडे जनतेला देण्यासाठी सकारात्मक असे काहीही उरलेले नाही. विज्ञान, कला आणि इतिहास ही क्षेत्रेसुद्धा ह्याला अपवाद नाहीत. भांडवलाचे वर्चस्व कायम राखण्यासाठी भांडवलशाही स्वयंस्फूर्त गतीने समाजात अंधविश्वास, अंधभक्ति, कूपमंडूकता आणि इतिहासोन्मुखता ह्यासारख्या टाकावू मूल्यांना खतपाणी घालत आहे. अनिर्बंध भांडवली शक्तीचे अस्तित्व कायम ठेवण्यासाठी आवश्यकता असते ती म्हणजे सर्व प्रकारच्या पुरातन आणि नवनवीन अंध-उन्मादी विचारांना समाजाच्या धमन्यांमध्ये भिनवले जाण्याची! आर.एस.एस आणि भाजप यांचा तथाकथित वैज्ञानिक-सांस्कृतिक अजेंडा प्रत्यक्षात भारतीय भांडवली वर्गाच्या ह्याच अचेतन वस्तुगत आवश्यकतेची सचेतन अभिव्यक्ति आहे.

या सामान्य परिस्थितीच्या संदर्भातच आपण भारतीय विज्ञान परिषदेच्या मुंबई अधिवेशनामध्ये घडलेल्या लाजिरवाण्या घटना बघू-समजू शकतो. ह्यावेळी हल्ल्यासाठी देशामध्ये विज्ञानासाठी प्रख्यात असलेल्या सर्वोच्च संस्थेचा मंच निवडला गेला होता, त्यामुळे ह्या प्रकरणाचे गांभीर्य जास्त आहे. सांप्रदायिक फॅसिस्ट शक्तींनी ह्या मंचाला निशाणा बनवून आणि सोबतच 'विज्ञाना'चा नारा देऊन देशाच्या उरल्या-सुरल्या वैज्ञानिक तर्कशक्तीचे थडगे खोदण्याची घोषणा केली आहे.

## स्रोत


१. लेख 'वैदिक-विज्ञान : महाकाव्यांमधील मिथक आणि फिक्शन यांच्याकडे बघण्याच्या दृष्टिकोनाबाबत काही प्रश्न', Blog: The Spark of Change

२. पान ९६,'प्राचीन भारतामध्ये विज्ञान आणि समाज',देवी प्रसाद चट्टोपाध्याय

३. पान २८,उपरोक्त

४. पान ३९,उपरोक्त

५. पान २४१,उपरोक्त

६. पान २४३,उपरोक्त


धार्मिक दृष्टिकोनाणाच्या आधारे जगाच्या कोणत्याही भागात आंदोलन होऊ शकते. परंतु त्यामुळे कोणताही बहुमुखी विकास होईल असे वाटत नाही. आपणा सर्वांनाच जीवन प्रिय आहे आणि आपण सर्वजण जीवनाच्या रहस्यांचा भेद करण्यास उत्सुक आहोत. प्रचीन काळी विज्ञानाच्या मर्यादांमुळे ज्याला निसर्गाच्या नियमांचा नियंता मानण्यात आले अशा एका कल्पित इश्वराच्या चरणाशी दयेची भीक मागण्यावाचून आपल्यासमोर दुसरा कोणताही मार्ग नव्हता. प्राग्वैज्ञानिक युगातील मानवाला आपण असहाय्य असल्याचा अनुभव येत होता आणि कदाचित याच मानसिकतेतून धर्माचा उदय झाला. प्राचीन धर्मांमध्ये निसर्गासंबंधी विचारांची क्वचितच सुयोग्य व्याख्या दिसून येते. तसेच त्यांचे स्वरूप आत्मनिष्ठ आहे व म्हणूनच ते आधुनिक युगाच्या मागण्या पूर्ण करू शकत नाहीत.

**महान शास्त्रज्ञ डॉ. मेघनाद साहा ( विज्ञान आणि धर्म )**

मीडिया

# कॉर्पोरेट भांडवली प्रसारमाध्यमांचे वर्चस्व आणि क्रांतिकारी वैकल्पिक प्रसारमाध्यमांसमोरील आव्हाने

भांडवलशाही ह्या अगोदरच्या सर्व शोषण व्यवस्थांच्या तुलनेत अनेक अर्थांनी भिन्न आहे. आर्थिक आणि राजकीय पातळीवरील सगळ्या वेगळेपणाबरोबरच एक मोठा फरक हा आहे की भांडवलशाही अंतर्गत शोषक-उत्पीडक वर्गांची सत्ता एकतर्फी प्रभुत्वावर नव्हे तर वर्चस्वावर आधारलेली असते. प्रभुत्व आणि वर्चस्व ह्यातील फरक आंतोनिओ ग्राम्शी यांनी स्पष्ट केला होता; प्रभुत्वावर आधारित सत्ता शासित जनतेकडून 'सहमती' घेत नाही आणि ती तिची वैधता कुठल्याश्या दिव्य शक्तीच्या माध्यमातून स्थापित करते. उदाहरणार्थ, सामंती समाज आणि त्या पूर्वीच्या प्राक्‌भांडवली समाजांमध्ये सत्ताधारी वर्गांच्या सत्तेचे वैधीकरण ईश्वर-प्रदत्त होते; राजा किंवा सामंत हा ईश्वराची सावली मानला जायचा आणि त्यांच्या मुखातून प्रत्यक्ष ईश्वर बोलत असे! परंतु भांडवलदार वर्गाने जेव्हा सामंतशाहीच्या विरोधात संघर्ष सुरू केला तेव्हा त्याने मानवकेंद्रित समाज, सेक्युलरिजम (धर्मनिरपेक्षतेच्या अर्थाने नव्हे तर 'ऐहिकता' या अर्थाने), मानवतावाद आदी घोषणांचा उद्‌घोष केला. बुर्झ्वा विचारांचा जन्म होण्याअगोदरच्या पुनर्जागरणाच्या काळातदेखील ह्याच विचारांचा बोलबाला होता. त्यानंतर धार्मिक सुधारवादी आंदोलन आणि प्रबोधन काळात ही परंपरा अधिक पुढे गेली आणि व्यापारी प्रवृत्ती सोडून औद्योगिक प्रवृत्ती धारण करू पाहणाऱ्या भांडवली वर्गाने तर्कशीलता आणि विज्ञानाचा झेंडा हाती घेतला. भांडवली विचारवंतांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ह्या मूल्यांवर आधारलेल्या एका आदर्श समाजाचे स्वप्न पाहिले. पहिल्या टप्प्यातील भांडवली क्रांत्यांनंतर भांडवली वर्गाने ह्या घोषणा अशा प्रकारे अमलात आणल्या की समानता ही न्यायासमोरील औपचारिक समानता बनली, बंधुभाव हा भांडवलदारांमधील बंधुभावापुरता मर्यादित झाला आणि स्वातंत्र्य हे नफा कमावण्याचे आणि आपली श्रमशक्ती विकण्याचे स्वातंत्र्य ह्या मर्यादित अर्थाने तेवढे उरले! निश्चितपणे, प्रबोधनकालीन विचारवंतांच्या क्रांतिकारी विचारातील सामातामूलक समाज हा आदर्शवादी स्वप्नरंजनच होते, पण हे आदर्शवादी समाजाचे स्वप्न विचारांच्या केंद्रस्थानी आणणे हेच मोठे क्रांतिकारी पाऊल होते. १८४८ च्या युरोपियन क्रांतींच्या दरम्यान भांडवली वर्गाचा खोटारडेपणा उघड झाला. परंतु तरीही भांडवली समाज हे सामंती अत्याचारांच्या आणि शोषणाच्या तुलनेत एक प्रगतिशील पाऊल होते. सामंती आर्थिकेतर शोषणाची जागा आता भांडवली आर्थिक शोषणाने घेतली होती. केवळ औपचारिकपणे का होईना राजकीय स्वातंत्र्य, अभिव्यक्ती आणि संगठित होण्याचा अधिकार जनतेला मिळाला. वाढत्या आर्थिक विषमता असलेल्या नफा केंद्रित व्यवस्थेमध्ये ह्या कायदेशीर समानतेला आणि स्वातंत्र्याला काहीही अर्थ नव्हता, ही गोष्ट अलाहिदा. भांडवली राज्यकर्त्यांचा हा दावा होता कि ते जनतेच्या सहमतीने राज्य करतात. भांडवली संसदीय लोकशाहीच्या राजकीय रूपात निवडणुकांच्या माध्यमातून सत्ताधाऱ्यांचा निर्णय होणार होता. आता शोषणकर्त्यांना त्यांच्या सत्तेचे वैधीकरण जनतेच्या मतांच्या आणि निवडणूक प्रक्रियेच्या माध्यमातून करावयाचे होते त्यामुळे जनतेचे मत निर्धारित करण्याला अत्यंत महत्व प्राप्त झाले. भांडवली वर्गाचे राज्य हे कुठल्याही दैवी रुपात प्रकट झालेल्या वैधीकरणावर आधारलेले नसून ते जनतेच्या 'सहमती'वर आधारलेले होते. येथेच ग्राम्शीने त्याच्या वर्चस्वाच्या (Hegemony) अवधारणेची मांडणी केली आहे. आता शोषण करणाऱ्यांना जनतेची सहमती प्राप्त करावयाची असल्यामुळे त्या सहमतीचे 'निर्माण कार्य' महत्वाचे बनले आणि त्याचबरोबर अशा सहमतीची निर्मिती करण्यासाठीच्या उपकरणांचे असणेही महत्वाचे बनले.

प्रिंटिंग प्रेसचा शोध १४४० मध्ये लागला आणि पहिल्यांदा लिखित सामग्रीचे मोठ्या प्रमाणात उत्पादन, वितरण आणि प्रसार शक्य झाला, हा काही निव्वळ योगायोग नव्हता. पहिले वर्तमानपत्र १६०५ मध्ये जर्मनीमध्ये सुरु झाले, हादेखील योगायोग नाही. इतिहासामध्ये अशा युगप्रवर्तक गोष्टींच्या घडण्यामध्ये योगायोगाने काही दशकांचा फरक असू शकतो पण हा फरक शेकडो, हजारो वर्षांचा असू शकत नाही. मानव समाज त्याच प्रश्नांवरती विचार करतो जे प्रश्न त्याच्या काळातील जिवंत प्रश्न असतात. मार्क्सने म्हटल्याप्रमाणे, मनुष्य स्वत: समोर तेच लक्ष्य निर्धारित करतो जे तो प्राप्त करू शकतो. प्रेस आणि वर्तमानपत्र ह्यांची सुरुवात १५ ते १७ व्या शतकाच्या दरम्यान होते तर ही गोष्ट त्या काळाबद्दल बरेच काही सांगून जाते. नव्याने उदयास येत असलेल्या वर्गांनी आणि त्यांच्या वारसदारांनी चर्च आणि सामंतवादाच्या विरोधात जो संघर्ष सुरू केला होता त्यासाठी अशा साधनांचा शोध स्वाभाविक होता; १७ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत राजकीय पत्रके, पुस्तिका आणि पुस्तकांची संस्कृती युरोपात मजबूत होऊ लागली होती. पहिल्या टप्प्यातील भांडवली लोकशाही क्रांतीच्या नंतरही वर्तमानपत्रे, पुस्तके आणि मुद्रित साहित्य मोठ्या प्रमाणात प्रकाशित होत राहिले. त्याच बरोबर नाटक, संगीत आणि अन्य व्यावसायिक कलांचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. जेव्हा कलेची ही सर्व माध्यमे सामंत आणि जमीनदारांच्या मैफिलीपुरती बंदिस्त झालेली होती, अशा सामंती काळाच्या विपरित आता कलेची सर्व माध्यमे पुनरुत्पादन योग्य बनू लागली; १८ व्या शतकाच्या शेवटी

आणि १९ व्या शतकाच्या सुरुवातीस फोटोग्राफीचा शोध लागल्यानंतर आणि त्यानंतर काही दशकांच्या अंतराने चलचित्राचा शोध लागल्यानंतर कलात्मक रचनांच्या पुनरुत्पादनात अभूतपूर्व क्रांती घडून आली. विचारांच्या प्रसाराचा वेग अभूतपूर्व असाच होता. ही प्रक्रिया आजही चालूच आहे. ह्या सबंध प्रक्रियेमध्ये भांडवली प्रसारमाध्यमांचा विकास झाला. निश्चितपणे प्रसारमाध्यमे हे सुद्धा वर्ग संघर्षाचे ठिकाण आहे, परंतु स्वाभाविकपणेच 'ज्या वर्गांच्या हातात भौतिक उत्पादनाच्या साधनांची मालकी असते त्याच वर्गाचे बौद्धिक उत्पादनावरसुद्धा नियंत्रण असते.'

भांडवलशाहीला प्रसारमाध्यमांची गरज होती आणि भांडवलशाही अंतर्गतच व्यापक प्रसारमाध्यमासारखी गोष्ट अस्तित्वात येऊ शकत होती. आपण तांत्रिक पातळीवर कुठल्याही 'सामंती प्रसारमाध्यम' किंवा 'दास प्रसारमाध्यम' यासारख्या गोष्टीची कल्पनाही करू शकत नाही. भांडवली वर्गाला प्रसारमाध्यमांची गरज ह्यासाठी असते, कारण त्याची सत्ता ही प्रभुत्वावर आधारलेली नसून ती वर्चस्वावर आधारलेली असते. त्यांना आपल्या सत्तेसाठी 'सहमती'चे उत्पादन आणि पुनरुत्पादन करणे गरजेचे असते. निश्चितपणेच, आजच्या समाजाचे वास्तव सांगून भांडवली वर्ग आपल्या सत्तेसाठीची सहमती निर्माण करू शकत नाही. उघडच आहे की हे साध्य करण्यासाठी त्याला एका आभासी चेतनेची निर्मिती करावी लागते, त्याला जनतेच्या चेतनेमधील प्रतिक्रियावादी शक्यता आणि सिद्धतांना क्रियान्वित करावे लागते, त्याला मिथक हे सामान्य ज्ञानाच्या (Common Sense) रूपात स्थापित करावे लागते, त्याला समाजाचे एक खोटे, काल्पनिक चित्र उभे करावे लागते, त्याच्याकडे जनतेला दाखवण्यापेक्षा लपवण्यासाठी जास्त गोष्टी असतात आणि इथेच बुर्ज्वा विचारधारेचे महत्व समोर येते.

भांडवली वर्ग जनतेला विज्ञान आणि तर्कशीलता फक्त तांत्रिक क्षेत्रांपुरता देऊ करतो, किंवा तेवढ्याच माफक प्रमाणात देऊ शकतो ज्यायोगे त्याचे अस्तित्व धोक्यात येणार नाही. त्यामुळेच एकीकडे विज्ञानाचे शिक्षण दिले जाते तर दुसरीकडे सर्व प्रकारचा रूढीवाद, परंपरावाद, कूपमंडुकता, अंध-राष्ट्रवाद आणि त्याचबरोबर एकूण अवैज्ञानिक आणि अतार्किक विचार विद्यार्थ्यांच्या-तरुणांच्या डोक्यामध्ये भरवले जातात. शिक्षण घेणाऱ्या तरुणांसाठी विज्ञान आणि तर्क ह्यांचे महत्व केवळ आणि केवळ प्रयोगशाळेपुरते उरते; भौतिकशास्त्र आणि रसायन शास्त्रांचे उन्नत प्रयोग करणारे विज्ञानाचे विद्यार्थीसुद्धा मुलाखती अगोदर पुट्टूपारथी, बालाजी इत्यादी ठिकाणी आशीर्वाद घेण्यासाठी जातात: वैज्ञानिक उपग्रह बनवल्यानंतर त्याचे प्रक्षेपण करण्याआधी त्याची पूजा करण्यासाठी मंदिरात घेऊन जातात. त्यामुळेच ही व्यवस्था वैज्ञानिक निर्माण न करता विज्ञानाचे कारकून निर्माण करते. अगदी ह्याच प्रकारे प्रसारमाध्यमेसुद्धा काम करतात. जर तुम्ही बातम्या देणाऱ्या वाहिन्या (ज्यांना बातम्या देणारे म्हणणे मूर्खपणा आहे!) बघितल्या तर त्यावर टैरट कार्ड, राशीफळ आणि वास्तूशास्त्रापासून रावणाची ममी आणि सीता जिथे जमिनीमध्ये सामावली ती जमीन सुद्धा दाखवण्यात येते. जर तुम्ही मनोरंजन मालिका एका आठवड्यापेक्षा जास्त काळ बघितल्या तर तुम्ही कदाचित उदात्तता, व्यापकता, असीमता इत्यादी शब्दांचे व्यापक अर्थच विसरून जाल आणि प्रत्येक हिणकस गोष्ट तुम्हाला आवडायला लागेल. जर तुम्ही म्युजिकच्या वाहिन्या किंवा लाइफ़ स्टाइल वाहिन्या बघाल तर त्यावरील रियालिटी शोज बघून तुम्हाला उलटी येऊ शकते (अट केवळ ही आहे की तुमच्यामध्ये मूलभूत मानवी मूल्य जिवंत असायला हवीत). वर्तमापत्रे बघितली तर तुमच्या लक्षात येईल की ज्या गोष्टी बातम्या म्हणून छापण्यात येत आहेत त्या खरे तर बातम्या नाहीतच! ज्या खऱ्या बातम्या असतात त्यांना एक तर वर्तमानपत्रांमध्ये जागाच मिळत नाही आणि जरी मिळाली तरी एखाद्या कोपऱ्यात जागा भरण्यासाठी म्हणून त्या छापण्यात येतात. आजच्या बहुतेक चित्रपटांबद्दल जितके कमी बोलावे तेवढे चांगले. कला समाजाचे सौंदर्यात्मक चित्रण करते. जर हीच कलेची परिभाषा असेल तर अधिकांश चित्रपटांना कलात्मक रचना म्हटले जाऊच शकत नाही, किंबहुना तो सगळा कचराच आहे, आणि ह्या कचऱ्यामधील अर्ध्याहून अधिक चित्रपट सेमी-पॉर्नोग्रार्फिक आहेत.

भांडवली प्रसारमाध्यमे ह्या सर्व माध्यमांमार्फत एक तर मेंदूची विचार करण्याची सवय संपवून टाकतात आणि त्याला हलक्या नशेत ठेवतात किंवा ते आपल्याला केवळ त्याच गोष्टींवर विचार करण्यास भाग पाडतात ज्यावर शासक वर्ग आपल्याला विचार करू देऊ इच्छितो. निश्चितपणे, काही चांगले टिव्ही कार्यक्रम, वर्तमानपत्रामधील आलेख आणि चित्रपट येतात. परंतु त्यांची संख्या अगदीच नगण्य असते आणि सांस्कृतिक पतनशीलतेच्या वातावरणात ते कुठे गायब होऊन जातात कळतही नाही.

वास्तविक पाहता भांडवली प्रसारमाध्यमे भांडवली वर्गाचा विश्वदृष्टीकोन, त्याची विचारधारा आणि संस्कृती ह्यांचे प्रभुत्व जनतेच्या मेंदूवर प्रस्थापित करण्याचे काम इमाने-इतबारे करत असतात. परंतु हे काम प्रसारमाध्यमे यांत्रिक पद्धतीने करत नाहीत तर अत्यंत जटील आणि संश्लिष्ट पद्धतीने करतात. ही प्रक्रिया अंतर्विरोधी आणि विरोधाभासांनी भरलेली असते. ह्या संपूर्ण प्रक्रियेमधून प्रसारमाध्यमे जनतेला आजूबाजूच्या घटनांकडे बघण्याचा एक दृष्टीकोन देतात. हा दृष्टीकोन वेगवेगळ्या घटनांकडे बघण्याची व्याख्यात्मक चौकट असतो. ही व्याख्यात्मक चौकट जनतेला आलोचनात्मकतेपासून दूर घेऊन जाते आणि त्या ऐवजी तिच्या विचारांमध्ये आभासी आलोचनात्मकता भिनवते. ही परिस्थिती वास्तवाची परिवर्तनात्मक टीका प्रस्तुत करण्याच्या क्षमतेपासून जनतेला दूर घेऊन जाते. असे नाही की भांडवली प्रसारमाध्यमे भांडवली समाजातील नग्न सत्य आणि बर्बर यथार्थ बिलकुल चित्रित करत नाहीत. परंतु ह्या गोष्टींचे चित्रण करत असताना ते जनतेसमोर एक आभासी, नपुसक आणि पराजयवादी आलोचना प्रस्तुत करतात. कित्येक वेळी जेव्हा व्यवस्थेची कोणतीही आलोचना करता येत नाही त्यावेळी प्रसार माध्यमे व्यवस्थेची आभासी आलोचना प्रस्तुत करतात. नोम चॉम्स्की यांनी म्हटल्याप्रमाणे - जनतेच्या

मेंदूला नियंत्रित करण्यासाठी शासक वर्ग वाद-विवादासाठी मर्यादित आणि अप्रभावी स्पेस उपलब्ध करून देतो, परंतु त्या स्पेसमध्ये तो खूपच जिवंत वाद-विवाद आयोजित करतो. उघडच आहे की अशा वाद-विवादांनी व्यवस्थेसमोर कुठलाही धोका उत्पन्न होत नाही, किंबहुना तिचे वर्चस्व अधिकच प्रस्थापित होते. ह्या सबंध प्रक्रियेमध्ये भांडवली प्रसारमाध्यमे भांडवली मिथके आणि पूर्वग्रहांना सामान्य ज्ञानाच्या (Common Sense) रूपात प्रस्थापित करतात आणि त्याबरोबरच भांडवली शासन व्यवस्थेला तिच्या एकूण विकृतींसह सर्वाधिक नैसर्गिक आणि उपयुक्त घोषित करतात.

हे सत्य आहे की, भांडवली प्रसार माध्यमे त्यांच्या ह्या कार्यात नेहमीच यशस्वी होत नाहीत. भांडवली समाजात आर्थिक संकट, बेरोजगारी, श्रीमंत आणि गरीब ह्यांच्यामधील वाढती आर्थिक दरी ह्यामुळे प्रसारमाध्यमांच्या 'सहमती' निर्माण करण्यासाठीची प्रणाली बिघडते. भांडवली प्रसारमाध्यमांकडून भांडवली व्यवस्थेची तळी उचलून धरणे अधिकच उपहासात्मक आणि विकृत वाटू लागते. प्रसारमाध्यमांमध्ये बसलेले भांडवली वर्गाचे 'थिंक टैंक' जो संदेश जनतेमध्ये पोहचवू इच्छितात त्या पद्धतीने संदेश पोहचू शकत नाहीत: जनता त्यांना वेगळ्याच पद्धतीने ग्रहण करू लागते आणि त्यातून ती शासक वर्गाला अभिप्रेत नसलेला अर्थ काढू लागते.

पण निश्चितपणे आपण भांडवली प्रसारमाध्यमांचे भयंकर परिणाम आणि त्यांच्या विचारधारात्मक वर्चस्वाचा प्रतिकार करण्यासाठी भांडवली व्यवस्था संकटग्रस्त होण्याची वाट बघू शकत नाही. त्यामुळेच, आपल्याला त्यांच्या वर्चस्वाच्या धर्तीवर आपले प्रति-वर्चस्व निर्माण करावे लागेल; आपल्याला प्रभुत्वशाली भांडवली प्रसारमाध्यमांच्या धर्तीवर क्रांतिकारी पर्यायी प्रसारमाध्यमे उभी करावी लागतील; आपल्याला भांडवली प्रसारमाध्यमांकडून जनतेमध्ये पसरवल्या जात असलेल्या बुर्झ्वा व्याख्यात्मक चौकटीला पर्याय म्हणून देश-जग, समाज, संस्कृती आणि अन्य प्रत्येक विषयाच्या योग्य विश्लेषणासाठी एक क्रांतिकारी वैज्ञानिक व्याख्यात्मक चौकट तयार करावी लागेल; निश्चितपणे अशा प्रकारची क्रांतिकारी पर्यायी प्रसारमाध्यमे विराट अशा भांडवली प्रसार-तंत्राइतकी विराट आणि मोठ्या भांडवलाची गुंतवणूक असलेली नसतील, आणि ती तशी असण्याची गरजही नाही. आपण कॉर्पोरेट प्रसारमाध्यमांच्या भांडवलाच्या शक्तीचा सामना आपल्या स्वयंसेवक आणि कार्यकर्त्यांच्या जोरावर करू शकतो. आपल्याकडे अशे हजारो प्रतिबद्ध तरुण रंगकर्मी, संगीतकार, नाटककार, कवी, लेखक, कथाकार, पत्रकार, अभिनेते इत्यादी तयार झाले पाहिजेत, जे जनतेच्या गरजेच्या बातम्या, संस्कृती, गीत, नाटक, कथा, कविता, कादंबऱ्या उपलब्ध करून देऊ शकतील; जे जनतेला आजच्या जगातील सत्याशी अवगत करतील आणि त्याच बरोबर ह्या अमानवीय जगाच्या पर्यायाच्या निर्मितीसाठी प्रेरित, प्रोत्साहित करतील; जे त्यांना नवीन जगाचे स्वप्न आणि त्याला साकार करण्यासाठीची दृष्टी देतील. कुठे आहेत आज असे कलाकार? कुठे आहेत आज असे लेखक आणि पत्रकार? आपल्याला हवी आहेत अशी जास्तीत जास्त वर्तमानपत्रे जी देशाच्या विभिन्न भागांमध्ये जनतेशी तिच्या भाषेत संवाद स्थापित करू शकतील आणि जी बातम्यांची व्याख्या बदलून टाकू शकतील; आपल्याला हवे आहेत असे नाटक-संघ जे शहरातील झोपडपट्टी आणि निम्न-मध्यमवर्गीय वसाहतींपासून कॉलेज, रेल्वे स्टेशन, बस स्थानकांपर्यंत जनतेच्या जगण्याशी जोडलेल्या प्रश्नांच्या वास्तवाचा पर्दाफाश करणारी नाटके दाखवू शकतील; आपल्याला हवे आहेत असे गायक आणि संगीतकार जे देशाच्या कानाकोपऱ्यात विद्रोहाचे राग भरतील आणि लोकांची चेतना जागवतील; आपल्याला हवे आहेत असे चित्रपटकर्मी जे पडद्यावर आजच्या कष्टकरी जनतेच्या जगण्याची शोकांतिका अश्या पद्धतीने सांगू शकतील की लोक त्यांच्या सवयींच्या गुलामगिरीतून जागे होतील आणि अन्यायाविरुद्ध उभे ठ्ठाकतील; कुठे आहेत असे तरुण नाटककार, संगीतकार, गायक आणि चित्रपटकार? आपल्याला अजूनही बरेच काही हवे आहे; जोपर्यंत भांडवली लोकशाही आपल्याला ठराविक मर्यादेपर्यंत स्पेस देत आहे तोपर्यंत आपल्याला आपली स्वत:ची टिव्ही वाहिनी आणि रेडिओ वाहिनी सुरू केली पाहिजे. आपल्याकडे फिरते पुस्तकप्रदर्शन भरवण्यासाठी अनेक वाहने हवीत. आणि सर्वात महत्वाचे, हा सर्व पसारा सांभाळण्यासाठी, भांडवलदारांचा पैसा आणि वेतनधारी लोक नकोत तर, हजारोंच्या संख्येने समर्पित आणि प्रतिबद्ध अश्या क्रांतिकारी कार्यकर्त्यांची फौज हवी! तरच अशी पर्यायी प्रसामाध्यमे उभी राहू शकतात, जी भांडवली प्रसारमाध्यमांच्या धर्तीवर समाजात स्वत:चे स्थान निर्माण करू शकतील, आपली भूमिका पोहचवू शकतील आणि एका क्रांतिकारी प्रति-वर्चस्वाचे निर्माण करू शकतील. तेव्हाच आपण सध्याच्या भांडवली प्रसारमाध्यमांच्या विकृत खोटारडेपणाचा सामना करू शकू; तेव्हाच आपण भांडवली प्रसारामाध्यमांद्वारे पसरवण्यात येत असलेल्या विकृत संस्कृतीच्या विरोधात क्रांतिकारी जनसंस्कृतीची मशाल पेटवू शकू. जोपर्यंत आपण हे सर्व करणार नाही तोपर्यंत आपण सर्वार्थाने परिवर्तनकारी आणि क्रांतिकारी असा प्रकल्प उभा करू शकणार नाही.

२१व्या शतकाच्या क्रांतींच्या अजेंड्यावर संस्कृतीचा प्रश्न अग्रक्रमात असणार आहे. कारण आजच्या भांडवली वर्गाने संस्कृती आणि प्रसारमाध्यमांचा उपयोग आपल्या वर्गसत्तेचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात केला आहे. आपल्याला त्या वर्चस्वाला आव्हान द्यावे लागेल. त्यासाठी एका नवीन क्रांतिकारी पुनर्जागरण आणि प्रबोधन-पर्वाची गरज आहे. आणि निश्चितपणे, अशा क्रांतिकारी पुनर्जागरण आणि प्रबोधन-पर्वाच्या निर्मितीसाठी आपल्याला गरज आहे ती आपल्या क्रांतिकारी पर्यायी प्रसारमाध्यमांची!

●

**विद्यार्थी युवकांचे पत्र 'मुक्तिकामी छात्रों-युवाओं का आह्वान' मधून साभार - अनुवाद अमित शिंदे**

आरोग्य

# नफाखोर व्यवस्थेत प्रभावहीन ठरताहेत जीवन-रक्षक औषधे

• डॉ. अमृत

आधुनिक आरोग्य प्रणालीचा एक खूप महत्वपूर्ण भाग असलेली रोग-प्रतिरोधक औषधे (ॲण्टीबायोटिक्स) ज्यापद्धतीने प्रभावहीन होण्याच्या दिशेने मार्गक्रमण करत आहेत त्याचे भयंकर परिणाम आता स्पष्टपणे समोर येऊ लागले आहेत आणि त्याबाबत जागतिक पातळीवर चर्चा सुरू झाली आहे. ह्याचा सरळ संबंध सध्याच्या नफ्यावर आधारित व्यवस्थेशी आहे.

भारतात एक मोठा रोग हळुवार स्वत:चा आवाका वाढवत आहे ज्याचे कारण विषाणूंच्या अशा प्रजातींचे मोठ्या प्रमाणात समोर येणे आहे ज्यावर रोग-प्रतिरोधक औषधांचा एक तर काहीच परिणाम होत नाही किंवा खूपच कमी औषधांचा परिणाम होतो आणि योग्य औषधाचा शोध लागेपर्यंत एक तर रोगी त्या उपायांना प्रतिसाद देणे बंद करतो किंवा त्याचा मृत्यू होतो. एका ताज्या रिपोर्टनुसार ह्याचा सगळ्यात भयंकर परिणाम नवजात अर्भकांवर पडत आहे. भारतात दरवर्षी आठ लाख नवजात शिशु कुठल्या न कुठल्या कारणाने मृत्यूमुखी पडतात. मागच्या वर्षी ह्या आठ लाख दुर्दैवी बालकांपैकी ५८,००० बालक अशा जीवाणूंमुळे (बॅक्टीरिया) मृत्युमुखी पडले ज्यावर रोग-प्रतिरोधक औषधे प्रभावहीन ठरली, आणि कधी काळी बरे होण्याजोगे आजार बरे होण्यापलीकडे गेले. जरी सध्या ही संख्या नवजात बालकांच्या एकूण मृत्युच्या प्रमाणात तुलनात्मकदृष्ट्या कमी भासत असली तरी डॉक्टरांच्या मते ही संख्या वेगाने वाढू शकते कारण भारतामध्ये अशा जीवाणूंच्या (बॅक्टीरिया) वाढीसाठी आवश्यक आणि अनुकूल अशी सर्व परिस्थिती उपलब्ध आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी 'स्वच्छ भारत' योजनेच्या नावाने जो काही तमाशा करत आहेत त्यानंतरही वास्तविकता ही आहे की अर्ध्याहून अधिक लोकसंख्येकडे आधुनिक तर सोडाच पण साधारण अशा शौचालयाची सोयसुद्धा नाहीये. परिणामत:, भारतातील पाण्याचे स्रोत, शेतजमिनी, नाले इत्यादी रोग-प्रतिरोधक औषधे प्रभावहीन करणाऱ्या जीवाणूंनी(बॅक्टीरिया) समृद्ध आहेत. लोकसंख्येच्या एका मोठ्या भागाला राहण्यासाठी योग्य घरे मिळत नाहीत आणि अगदी तोकड्या जागेत गरजेपेक्षा अधिक लोक राहत असल्यामुळे व्यक्तीकडून व्यक्तीला जीवाणूंचा संसर्ग मोठ्या प्रमाणात होतो. रहिवासी वस्त्यांबरोबरच दवाखाने, खास करून सरकारी दवाखाने हे गर्दीचे ठिकाण होऊन बसले आहेत. सरकार एका बाजूने महिलांच्या प्रसूती दवाखान्यात व्हाव्यात म्हणून रोख रक्कम देऊ करत आहे परंतु दुसऱ्या बाजूला दवाखाने त्यासाठी पूर्णपणे सिद्ध करण्याकडे सरकारचे लक्ष नाही, कारण प्रसूतीसाठी काही एक रोख रक्कम दिल्याने त्यांची ह्याबाबतची जबाबदारी संपते असे आपल्या नेत्यांना आणि धोरणकर्त्यांना वाटते. दवाखान्यांमध्ये पुरेसे पलंगसुद्धा नाहीयेत, एकाच पलंगावर २-२, ३-३ महिला आपल्या नवजात अर्भकाला घेऊन बसल्या आहेत. ज्या महिलांना पलंग उपलब्ध होऊ शकत नाही त्यांना जमिनीवर चादर अंथरून दिवस ढकलावे लागतात. दवाखान्यांच्या ह्या अवस्थेचा अंदाज युनिसेफने राजस्थानमधील जिल्हा आरोग्यकेंद्रांवर केलेल्या एका अभ्यासामधून येतो, ज्याच्या अनुसार ७०टक्के दवाखान्यांमध्ये उपलब्ध पाणी दूषित होते, हात धुण्यासाठी बनवण्यात आलेल्या ७८ टक्के वॉश-बेसिनवर हात धुण्याचा साबणच उपलब्ध नव्हता, ६७ टक्के स्वच्छतागृहे आणि शौचालये माणसांनी वापरण्याच्या लायकीची नव्हती. हे वास्तव 'स्वच्छ भारत'च्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या तमाशानंतरही बदलणारे नाही. ही सगळी अनावस्था रोग-प्रतिरोधक औषधे प्रभावहीन करणाऱ्या जीवाणूंच्या प्रसारासाठी अनुकूल परिस्थिती तयार करत आहे. डॉक्टरांकडून दिली जाणारी धोक्याची ही सूचना दुर्लक्ष करण्याजोगी नक्कीच नाही कारण एकदा अशा जीवाणूंचा प्रसार जोमाने सुरू झाल्यावर त्यांच्यावर नियंत्रण मिळवणे सोपे नाही.

सर गंगाराम हॉस्पिटल, नवी दिल्ली येथील शिशु-तज्ञ डॉक्टरांच्या मते तिथे दाखल होणाऱ्या मुलांपैकी जवळपास शंभर टक्के मुले अशा जिवाणूंची शिकार झालेली असतात. त्यांच्या मते हा प्रकार मागील काही वर्षांपासूनच सुरू असून परिस्थिती अतिशय गंभीर आहे. भारतासमोर हे संकट उभे राहण्याबरोबरच, नवजात अर्भकांचा मृत्युदर - जो अगोदरच वैद्यकीय विज्ञानाचे मापदंड आणि मानवी विकासाच्या स्तराच्या मानाने खूप जास्त आहे - पुन्हा वाढण्याचे सर्व संकेत मिळत आहेत. तसेही पाश्चात्य देशात झाली तशी भारतातील नवजात अर्भकांच्या मृत्युदरामधील घट कुठल्याही सामाजिक वा आर्थिक बदलांमुळे झालेली नव्हतीच. मागील काही वर्षांमध्ये नवजात अर्भकांच्या मृत्युदरामधील जी घट नोंदवली गेली आहे तिचे कारण नवजात अर्भकांमधील जीवाणूंची लागण रोखण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या रोग-प्रतिरोधक औषधांवरील निर्भरता हे आहे. जर ही औषधे प्रभावहीन होऊ लागली तर नवजात अर्भकांच्या मृत्यूचा दर पुन्हा वाढणे अगदी स्वाभाविक आहे. केवळ लहान मुलेच नाही तर प्रौढांमध्येसुद्धा ह्या जीवाणूंमुळे होणारे आजार पसरण्याचा धोका आहे. सर्वात मोठा धोका 'टीबी'वर इलाज म्हणून उपयोगात आणल्या

जाणाऱ्या औषधांच्या प्रभावहीन होण्याचा आहे. ह्यावर भारतातील अनेक डॉक्टरांचे हे मत आहे की येणाऱ्या काही वर्षांमध्ये भारतात 'टीबी'वर परिणामकारक उपाय करणे अशक्य होणार आहे आणि आपण पुन्हा त्या काळात जाऊन पोहोचणार आहोत ज्या काळी 'टीबी' होण्याचा अर्थ होता – कित्येक महिने रक्त मिश्रित थुंकी थुंकत मृत्यूची वाट बघत बसणे.

भारतासकट तिसऱ्या जगातील अन्य कित्येक देशांमध्ये रोग-प्रतिरोधक औषधे प्रभावहीन होण्याचे प्रमाण विकसित देशांच्या तुलनेत कैक पट जास्त आहे. ह्याचे एक कारण आहे देशांमधील अशा रोग-प्रतिरोधक औषधांचा अंधाधुंद प्रयोग, आणि असे होण्याचे कारण म्हणजे अशिक्षित, अकुशल डॉक्टर आणि मेडिकल स्टोर्सकडून सामान्य जनतेला ही औषधे देण्यवर कोणत्याही निर्बंधांचा अभाव. दुसरे, अधिकृत शिक्षित डॉक्टर्ससुद्धा ह्या औषधांच्या वैज्ञानिक प्रयोगांच्या बाबतीत सचेतन नाहीत आणि कंपन्यांकडून ही औषधे लिहून देण्यासाठी मिळणारे कमिशन त्यांना ह्या बाबतीत सचेतन होऊसुद्धा देत नाही! त्याच बरोबर प्रयोगशाळांमधील अनिवार्य अशा परिक्षणांची अनुपलब्धता किंवा असे परीक्षण खूप महाग असणे हे सुद्धा ह्या औषधांच्या अवाजवी वापरास प्रोत्साहन देते. विकसित देशांमध्येसुद्धा रोग-प्रतिरोधक औषधांचा अनावश्यक उपयोग कमी नाही. विकसित युरोपीय देशांमध्ये अशा औषधांचा उपयोग अर्ध्यापेक्षा जास्त केसेसमध्ये अनावश्यक असतो. परंतु ह्या देशांच्या तुलनेत भारतासारख्या देशांमध्ये ह्या जीवाणूंचा प्रसार होण्याचा धोका अधिक आहे. त्याचे कारण वरती नमूद केलेली परिस्थिती – जी रोग-प्रतिरोधक औषधे प्रभावहीन करणारे जीवाणू तयार झाल्यावर त्यांच्या प्रसारासाठी अधिक पूरक आणि अनुकूल असते – ती भारतासारख्या देशांमध्येच उपलब्ध असते. विकसित देशांमध्ये अशा औषधांच्या बेलगाम वापरावर मागील एक दशकापासून अनेक निर्बंध लादले गेले आहेत. काही दिवसांपूर्वी ओबामा प्रशासनाने ह्या प्रश्नावर राष्ट्रीय आणीबाणी घोषित करून ह्या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी पावले उचलली होती. विकसित देशांमध्ये ह्या औषधांचा खप कमी झाल्यामुळे ह्या औषध निर्मात्या कंपन्यांनी त्यांचा खप विकसनशील देशांमध्ये वाढवण्यासाठी कंबर कसली आहे. अगोदरच प्रभावहीन कायदेशीर आणि प्रभावहीन प्रशासकीय नियामक यंत्रणा सध्याच्या नवउदारवादी काळात अधिकच प्रभावहीन झाली आहे, ह्या कारणाने भारतासारख्या देशांमध्ये ह्या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठीचे पूरक प्रयत्न केले जातील ह्याची शक्यता कमीच दिसत आहे. उलट गंगा उलटी वाहत आहे. केवळ एका वर्षापूर्वी दिल्लीमधील दवाखान्यांमध्ये असाच एक जीवाणू मिळाल्याचा रिपोर्ट जेव्हा एका मेडिकल जर्नलमध्ये प्रसिद्ध झाला तेव्हा भारतीय मिडिया आणि राजकीय पक्षांनी हा 'राष्ट्रीय सन्माना'वरील हल्ला असल्याचे घोषित केले. खरे तर सरकारने ह्या घटनेच्या तळाशी जायला हवे होते कारण अशे जीवाणू आढळणे हे अखिल मानवतेसाठी धोका बनू शकते. पण नाही, भारतातील भांडवलदारांसाठी हा 'राष्ट्रीय सन्माना'चा प्रश्न बनला, कारण ह्या रिपोर्ट बरोबरच दिल्ली आणि अन्य शहरातील मोठ-मोठ्या कार्पोरेट हॉस्पिटल्स मध्ये चालू असलेल्या 'मेडिकल टुरिजम'च्या माध्यमातून होणाऱ्या आर्थिक उलाढालींमधून होणारा नफा धोक्यात आला असता. हा आहे धन-दांडग्यांचा 'राष्ट्रीय सन्मान' जो बाजारामधून तयार होतो आणि बाजाराबरोबरच बहरतो. भारताचे लोकशाही सरकार जे संपूर्ण देशवासीयांसाठी उत्तरदायी असते, जबाबदार असते, धन-दांडग्यांच्या 'राष्ट्रीय सन्माना'वर घाला घातला गेल्या बरोबर सक्रिय झाले आणि रिपोर्ट खोटा आहे हे ठरवण्याच्या कामास लागले. परंतु सत्य समोर येणारच होते, आता ह्या ताज्या रिपोर्टने रोग-प्रतिरोधक औषधे प्रभावहीन करणाऱ्या जीवाणूंच्या प्रसाराचे सत्य बाहेर आणले आहे, परंतु मोदी सरकार मनमोहनी-सरकारच्या दोन पाऊल पुढेच जाईल, मागे नक्कीच नाही जाणार.

परंतु हा सगळा मामला केवळ ह्या औषधांच्या माणसांमधील अनावश्यक प्रयोगांचाच नाही, पशुपालन आणि पोल्ट्री-फार्म्स मध्ये सुद्धा ह्या औषधांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो आहे. पोल्ट्री-फार्म्स मध्ये कोंबड्यांना खाऊ घातल्या जाणाऱ्या चाऱ्यामध्ये रोग-प्रतिरोधकांचा उपयोग ह्यासाठी होतो कारण त्यातून कमी चाऱ्यामध्ये कोंबड्यांचे वजन जास्त वाढवले जाऊ शकते. ह्यातून चाऱ्यावर होणारा खर्च ३०% नी कमी होतो, परिणामत: नफ्याच्या टक्केवारीत वाढ होते. भांडवली व्यवस्थेमध्ये नफा हाच सर्व उत्पादक गतीविधींचा हेतू आहे, अशात माणुसकी कोणाला आठवणार?

●

## 'गांधी'कार अँटनबरो यांना खुले पत्र

( पान ३४ वरून )

मोठेपण त्यामध्ये वापरलेल्या मॉबच्या संख्येत नसावे. म्हणूनच काही वर्षांपूर्वी ''गांधीवादा''चे स्मरण करून देणाऱ्या 'लगे रहो मुन्नाभाई' आणि आपल्या 'गांधी' चित्रपटात फारसा गुणात्मक फरक आहे असे वाटत नाही. शांततेच्या प्रचारासाठी आपण चित्रपट बनविलात. आपल्या त्या भावनेचा आम्ही नक्कीच आदर करतो. परंतु खरे सांगायचे तर अहिंसा, शांतता याबद्दल फारच जिव्हाळ्याने कुणी बोलू लागलं की आता उगाच शंका येऊ लागते!

आपल्या चित्रपटाला अनेक 'ऑस्कर' मिळालेले असल्यामुळे अशा प्रकारचे मत प्रदर्शन करण्याचे धाडस करणे उद्धटपणाचे होईल, हे ठाऊक आहे. परंतु येथे मुद्दा पुन्हा संदर्भांचा आहे. पश्चिमेत मंदी येताच भारतीय कथानकावर आधारित, भारतीय कलाकारांना घेऊन स्लमडॉग मिलियोनेर सारखा चित्रपट बनविला जातो, आणि त्यालासुद्धा कित्येक 'ऑस्कर' मिळतात! आपल्याला भारतातील तत्कालीन काँग्रेस सरकारकडून हा चित्रपट बनविण्यासाठी आर्थिक साहाय्य लाभले होते, त्याचा ''संदर्भ''देखील काही संदर्भ चित्रपटातून गाळण्याशी असावा का असे उगाच वाटू लागते. असो. काही उणेअधिक लिहिले गेल असल्यास, क्षमा करावी. सत्याचा आग्रह धरावा म्हणून हा पत्रलेखनाचा खटाटोप.

कळावे,
एक सामान्य प्रेक्षक.

●

# अमेरिकन सत्ताधाऱ्यांच्या पापाचे ओझे वाहते अमेरिकन सैनिक

• रौशन

''माझे शरीर एक पिंजरा बनले आहे, ते असह्य वेदनांचा स्रोत बनले आहे. ज्या आजाराने मला घेरले आहे त्यावर जगातील सर्वात प्रभावी औषधसुद्धा उपयोगी पडत नाही आणि ह्या आजारावर कुठलाही उपाय नाही. दररोज, प्रत्येक क्षण सबंध शरीरात वेदनांचा संचार असतो. हे सगळे एखाद्या यातनेपेक्षा कमी नाही. डॉक्टरने देऊ केलेल्या सगळ्या औषधांच्या पश्चातही माझे मन वाळवंटासारखे शुष्क झाले आहे आणि ते भयंकर अशा दहशतीच्या छायेत, वाढती बेचैनी आणि सततच्या चिंतेने वेढले गेले आहे. अगदी साध्या गोष्टी, ज्या सगळ्यांसाठी खूप सोप्या आहेत, त्या करणे मला अशक्य झाले आहे. मी न हसू शकतो, न रडू शकतो. मला घराबाहेर निघणेसुद्धा अवघड वाटते. कुठल्याही व्यग्रतेमध्ये मला सुख मिळत नाही. झोप येईपर्यंत कुठलीही गोष्ट माझ्यासाठी केवळ आणि केवळ वेळ घालवण्याचे साधनमात्र आहे. आता कायमस्वरूपी चिरनिद्रेत जाणे हीच सर्वात चांगली गोष्ट आहे.''



वरील वाक्ये ३० वर्षीय अमेरिकन सैनिक डेनियल सॉमर्सच्या पत्रामधील आहेत. डेनियलने आत्महत्या केली आहे. २००३ पासून तो कित्येक वर्षे इराकमध्ये राहिला होता आणि त्याने अनेक सैन्य कारवायांमध्ये भाग घेतला होता. तो त्याच दिवशी अमेरिकेमध्ये आत्महत्या केलेल्या २२ सैनिकांपैकी एक होता. इराक आणि अफगाणिस्तान युद्धात सहभागी सैनिकांवर आभ्यास करणाऱ्या एका संस्थेच्या रिपोर्टनुसार अमेरिकेमध्ये दररोज २२ सैनिक आत्महत्या करत आहेत. २००९ नंतर आत्महत्येच्या संख्येत आणि प्रमाणात लक्षणीय वाढ झाली आहे. केवळ ३० वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या सैनिकांमध्ये आत्महत्येचे प्रमाण ४४ टक्के वाढले आहे. कित्येक प्रकरणांमध्ये आत्महत्या करणाऱ्या सैनिकांची संख्या प्रत्यक्षात युद्धात मारले गेलेल्या सैनिकांपेक्षा जास्त आहे. उदाहरणादाखल, जानेवारी, २०१२ ते सप्टेंबर, २०१२ दरम्यान २४७ सैनिकांनी आत्महत्या केली तर २२२ सैनिक प्रत्यक्ष सैन्य-कार्यवाहीत मृत्यूमुखी पडले. २०१४ च्या पहिल्या तिमाहीमध्येच १८९२ सैनिकांनी आत्महत्या केल्या. सैनिकांच्या आत्महत्येचा दर सामान्य नागरिकांच्या आत्महत्येच्या दराच्या दुप्पटहून अधिक आहे. ह्या व्यतिरिक्त युद्धभूमीवरून परतलेल्या अमेरिकन सैन्यामधील बरेच सैनिक मानसिक रोगी आहेत आणि त्यापैकी बऱ्याच जणांना पी.एस.टी.डी. नामक मानसिक आजाराने घेरले आहे. ह्या आत्महत्या नसून अमेरिकन सत्ताधारी, भांडवलदार ह्यांच्या नफ्याकरिता बळी चढवण्यात आलेल्या हत्या आहेत.

जेव्हा जगातील बड्या लुटारूंच्या, भांडवलदारांच्या नफ्याच्या पुनर्वाटपाच्या प्रश्नावरून दुसरे महायुद्ध झाले तेव्हा अमेरिका आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या इतकी मोठी शक्ती नव्हती. दुसऱ्या महायुद्धामध्ये सोविएत रशिया आणि जर्मनीमधील युद्धात एक शक्ती पराभूत होईल आणि दुसरी दुबळी होईल आणि तिला पराभूत करणे सहजशक्य होईल असा विचार अमेरिकेने केला. ह्या योजनेबरहुकूम अमेरिकेने युद्धामध्ये सुरक्षित अंतर राखले. दुसरे महायुद्ध १९३९ मध्येच सुरू झाले होते पण अमेरिका प्रत्यक्ष युद्धात १९४३-४४ मध्ये उतरली. जेव्हा पूर्वेकडून स्टालिनच्या नेतृत्वाखाली सोविएत रशियाची लाल सेना जर्मन नात्झींना स्टालिनग्राड मधून पळवून लावून बर्लिनपर्यंत पोहचत असतानाच्या अनुकूल परिस्थितीत अमेरिकेने जर्मनीच्या विरोधात पश्चिमेकडून युद्ध आघाडी उघडली. त्यानंतर तिने स्वत:चे सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी जपानच्या दोन शहरांवरती अणुबॉम्ब टाकले. ह्या युद्धादरम्यान अमेरिकन भांडवलदार वर्गाने मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्र, औषधे आणि अन्य युद्ध सामग्री युरोपीय देशांना विकून मोठ्या प्रमाणात नफा कमावला. युद्धानंतर युरोपातील बरेच देश कंगाल झाले होते आणि राजकीय शक्ती गमावून बसले होते. अमेरिकेने ह्या देशांना कर्ज दिले, ह्या देशांमधील पायाभूत सुविधांच्या पुनर्निर्माणाचे प्रकल्प अमेरिकन कंपन्यांनी घेतले आणि अशा प्रकारे अमेरिका

दुसऱ्या महायुद्धानंतर कुटनितीच्या माध्यमातून एक आर्थिक आणि राजकीय महासत्ता म्हणून उदयास आली, ज्यात शस्त्रास्त्रनिर्मिती उद्योगाचे मोठे योगदान होते. दुसऱ्या महायुद्धापासून १९६० च्या दशकापर्यंत जागतिक अर्थव्यवस्थेने सुवर्ण युग अनुभवले आणि त्या कालखंडामध्ये अमेरिका आर्थिक समृद्धी अनुभवत होती. १९७० च्या दशकात सुरू झालेल्या आर्थिक संकटामुळे अमेरिकेसहित अनेक देशांच्या अर्थव्यवस्था डळमळू लागल्या, २० व्या शतकाच्या शेवटी जागतिक अर्थ व्यवस्थेची परिस्थिती थोडी बहुत सुधारली पण पुन्हा हाउसिंग बूम, सब-प्राइम संकट आणि कर्ज संकट यांसारख्या एकापाठोपाठ आलेल्या संकटांमुळे अमेरिकन अर्थव्यवस्था जास्तच डळमळीत झाली. भांडवलाची ताकत आणि नफ्याचा हव्यास ह्यामुळे शस्त्रास्त्रांचा उद्योग हा अमेरिकेच्या गळ्यातील ढोल बनला आणि हा ढोल वाजता ठेवण्यासाठी युद्धे अनिवार्य झाली.

वास्तविक पाहता, भांडवली समाजात एकूण संपत्तीवर मूठभर लोकांची मालकी असते आणि ह्या लोकांच्या अंतर्गत प्रतिस्पर्धेमुळे बाजारामध्ये अराजकतेचे वातावरण तयार होते ज्यातून पुन्हा पुन्हा आर्थिक संकटे तयार होतात. आर्थिक संकटामध्ये गरजेपेक्षा जास्त उत्पादन होते आणि रोजगार गेल्यामुळे जनतेची क्रयशक्ती कमी होते. अशा वेळी भांडवली व्यवस्थेला टिकून राहण्यासाठी उत्पादन साधनांचा मोठ्या प्रमाणात विनाश करावा लागतो जेणे करून त्यांच्या पुनर्निर्माणामधून नवीन बाजार आणि नवीन रोजगार निर्माण करणे शक्य व्हावे. ह्याच कारणाने भांडवली व्यवस्था मानवतेवर पुन्हा-पुन्हा युद्धे लादते जेणे करून भांडवलदारांना गुंतवणूक करण्यासाठी नवीन संधी तयार होतील. पहिले व दुसरे महायुद्ध आणि त्यानंतरची तमाम छोटी-मोठी युद्धे ह्यांचे खरे कारण ह्यात दडले आहे.

अमेरिकेची स्थिती अजून गुंतागुंतीची आहे कारण तिला केवळ युद्धांच्या माध्यमातून मोठा विध्वंस घडवून आणून आपल्या भांडवलदारांच्या नफ्यासाठी बाजार हवा आहे असे नव्हे तर अमेरिकेचा शस्त्रास्त्रांचा व्यापारही प्रचंड मोठा आहे. जर जगात शांतता प्रस्थापित झाली आणि देशा-देशांमधील तणावपूर्ण वातावरण संपुष्टात आले तर अमेरिकन शस्त्रास्त्र-निर्मिती उद्योग नष्ट होईल आणि तिच्या अर्थव्यवस्थेचा पायाच उखडून जाईल. अमेरिकेचे युद्ध लढण्यामागचे तिसरे कारण हेसुद्धा आहे की तिला कित्येक वर्षांपासून चालत आलेली स्वत:ची नेतागिरी टिकवायची आहे. त्यामुळेच अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धानंतर व्हिएतनाम, इराक आणि अफगाणिस्तान सारखी तीन मोठी युद्धे मानवतेवर लादली. ह्या तीन युद्धांव्यतिरिक्त अमेरिका जगभरातील ७० पेक्षा जास्त देशांमध्ये कुठल्या ना कुठल्या स्वरूपात सैन्य कारवाया करत राहिली आहे. ह्या युद्धांमध्ये निरपराध लोकांवर केले गेलेले अत्याचार अजूनही विसरले गेले नाहीयेत. ह्या बरोबरच देशा-देशांमध्ये तणावाचे वातावरण कायम राहण्यासाठी प्रयत्न करणे, इतर देशांमध्ये स्वत:चे हित सांभाळणारे सरकार स्थापित करणे किंवा त्यासाठीच्या जनविरोधी विद्रोहांना सक्रिय पाठींबा देणे आणि गाझामध्ये निर्मम हत्याकांड करणाऱ्या इस्त्रायलसारख्या देशांची पाठराखण करण्याचे काम अमेरिका करत आली आहे. ह्या घृणित आणि निर्मम कामासाठी अमेरिकेकडे जगातील सर्वात मोठी सैन्य शक्ती आहे, आधुनिक शस्त्रास्त्र आहेत आणि वेगवेगळ्या प्रकारच्या निर्दयी कारवाया करण्यासाठी सैन्यामध्ये स्पेशल युनिट्स अस्तित्वात आहेत. ह्या ताकदीचा उपयोग करून जगभरातील निर्दोष लोकांवर केले गेलेले काळजाचा थरकाप उडवणारे अत्याचार लपून राहिलेले नाहीत. हिरोशिमा व नागासाकीच्या जखमा अजून भरल्या गेल्या नाहीयेत. व्हिएतनाममध्ये दुसऱ्या महायुद्धापेक्षा जास्त प्रमाणात बॉम्ब वर्षाव केला गेला. निष्क्रिय बॉम्बची कित्येक वर्षे असलेली दहशत तिथे ज्यांनी अनुभवली आहे त्यांना रात्री झोपणे सुद्धा कठीण आहे. निरपराधांना कैदी बनवून त्यांच्यावर करण्यात आलेले अत्याचार आणि ड्रोन हल्लयांच्या माध्यमातून केलेली हत्याकांडेही कोणी विसरू शकत नाही. अमेरिकन युद्धखोरांनी लहान मुलं, बायकांना सुद्धा सोडले नाही.

नफ्याच्या हव्यासापोटी केल्या जाणाऱ्या ह्या हत्याकांडासाठी तंत्रज्ञान आणि मशिन्स ह्यापेक्षाही महत्वाचे हत्यार आहे ते म्हणजे - मनुष्य, ज्याचे रुपांतर जनावराप्रमाणे हिंस्त्र पशूमध्ये आणि आदेशाबरहुकूम हत्या करणाऱ्या मशीनमध्ये करण्यावर पूर्ण जोर दिला जातो. शिव्यांची लाखोली, अपमानजनक शब्द आणि कडक शिक्षा ह्यांचा भडीमार असलेल्या सैनिक प्रशिक्षणामध्ये त्यांना हत्या करण्यास सक्षम बनवले जाते. सैन्यामध्ये हे शिकवले जाते कि सैनिकाचे काम विचार करणे नसून आदेशांचे पालन करणे आहे. परंतु, जर्मन कवी ब्रेख्तने म्हटल्याप्रमाणे - मनुष्य सर्वात प्रभावी हत्यार आहे पण त्याचा एक गुणधर्म आहे की तो विचार करू शकतो. जेव्हा कधी ह्या मशिन्समधील मानवी मन जागे होते तेव्हा ते ह्या हत्या करण्याच्या विरोधात विद्रोह करते. हा विद्रोह विविध रूपांमध्ये व्यक्त होतो आणि अमेरिकन सैनिकांच्या आत्महत्या त्याचेच एक रूप आहे. अफगाणिस्तान, इराकमधील हत्याकांडामध्ये सहभागी असलेल्या सैनिकांपैकी जे पूर्णपणे पशू बनले नाहीत त्यांना रक्ताचे वाहणारे पाट, बायकांचा आकांत, लहानग्यांचे रडणे आणि निरपराधांचे निरागस, घाबरलेले आणि दयनीय चेहरे नेहमी छळत राहतात. ते मानसिक तणाव, बेचैनी आणि निद्रानाश ह्यांना बळी पडतात आणि हे सर्व इतक्या टोकाला जाते कि त्यांच्या समोर पशू बनणे किंवा आत्महत्या करणे हे दोनच मार्ग शिल्लक राहतात. ल्ल

हे सर्व केवळ अमेरिकेतच होत आहे असे नाही तर सबंध जगभरात अशा घटना घडत आहेत. भांडवली व्यवस्थेसाठी युद्ध किती अनिवार्य झाले आहे ह्याचा अंदाज ह्या तथ्यातून घेता येईल की २०१३ मध्ये जागतिक पातळीवर शस्त्रास्त्र व्यवहारांची उलाढाल १०० दश अब्ज डॉलर्सच्या आसपास होती. जगभरात मनुष्यास संवेदनाहीन, निर्दयी बनवण्याचे काम लहान असल्यापासूनच सुरू होते. टिव्ही, मीडिया, पुस्तके, पत्रिका आणि चित्रपट इत्यादींचा खुराक देऊन

सुरुवातीपासूनच मनुष्याला पशू बनवण्याचे प्रयत्न केले जातात. चित्रपट, खास करून हॉलीवुडच्या चित्रपटांमधून हिंसा एवढ्या मोठ्या प्रमाणात आणि इतक्या घृणित पातळीवर दाखवली जाते की प्रेक्षकाला हळूहळू त्या हिंसेची सवय होऊन जाते. नायक नेहमी लोकांना भाजी कापल्यासारखे कापतो आणि लोकांना ह्याचे काहीही वाईट वाटत नाही, किंबहुना आनंदच होतो. अशा प्रकारे लोकांना हे शिकवण्याचा प्रयत्न केला जातो की एखाद्या मनुष्याचे मारले जाणे ही काही खूप मोठी गोष्ट नाही. चित्रपट हे तर एक उदाहरण आहे, मानवतेच्या शत्रूंकडून अशा प्रकारचा हल्ला अनेकविध रूपांमधून केला जातोय. यासंबंधीची इतिहासातील एक घटना आठवते – सॉण्डर्सच्या हत्येनंतर सर्व सहकारी राजगुरूच्या अचूक निशाण्याचे कौतुक करत होते त्यावेळी राजगुरूने म्हटले होते सॉण्डर्स सुद्धा कोण्या एका आईचा मुलगाच होता. भगत सिंगने सुद्धा सॉण्डर्सच्या हत्येनंतर वितरीत केलेल्या पत्रकांमध्ये लिहिले होते – ''आम्हाला माणसाच्या मृत्यूचे दुःख आहे''. आज पावलोपावली दिसणाऱ्या हिंसेच्या माध्यमातून लोकांना इतक्या टोकाचे असंवेदनशील बनवले जात आहे कि त्यांना इस्रायल द्वारा पॅलेस्टाईनमध्ये लहान मुलांसकट हजारोंच्या हत्याकांडाची बातमी वर्तमानपत्रामधील इतर बातम्यांपेक्षा वेगळी वाटत नाही, त्यांना ती बातमी बेचैन करत नाही, कुठलीही चीड निर्माण करत नाही. हिंसेचा हा पाठ हत्या करण्यासाठी तयार केल्या जाणाऱ्या सैनिकांसाठीच असतो असे नाही तर सामान्य नागरिकांसाठीसुद्धा असतो. तमाम सत्ताधारी लुटारू त्यांच्याकडून केल्या जाणाऱ्या वा करवून घेतल्या जाणाऱ्या हत्याकांडांना लोकांची संमती मिळवण्याचे किंवा अशा हत्याकांडांना 'छोटी–मोठी' घटना बनवून प्रस्तुत करण्याचे काम करतात. भारतातसुद्धा सैन्य आणि पोलिस दलाला ह्याच आधारे तयार केले जाते. जर असे नसते तर काश्मीर, पूर्वोत्तर भारतासहित देशभरातील विविध भागांमध्ये केले जात असलेले सरकारी दमनचक्र भारतीय राज्यत्तेला कधीच शक्य झाले नसते. भारतामध्येसुद्धा सैन्य आणि अर्धसैनिक दलांमध्ये सैनिकांच्या आत्महत्या किंवा त्यांच्या वरिष्ठांच्या हत्या करण्यासारख्या वाढत्या घटना सैन्यदलातील वाढत्या बेचैनीच्याच निदर्शक आहेत.

त्यामुळेच, जोपर्यंत भांडवली व्यवस्थेचे अस्तित्व आहे तोपर्यंत ती मानवजातीवर युद्धे लादेल, नफ्यासाठी निरपराध लोकांचे हत्याकांड करत राहील, सैनिकांना हत्या करणारी मशीन बनण्यास  किंवा आत्महत्या करण्यास बाध्य करत राहील आणि मानव जातीस पशूंच्या पातळीवर पतित होण्यास भाग पाडेल. परंतु इतिहासाचा हा धडा आहे कि त्यांच्या संपूर्ण प्रयत्नांच्या पश्चातही लुटारू सत्ताधारी संपूर्ण मानवजातीला कदापि पशू बनवू शकणार नाहीत. रशियन कथाकार चेखवच्या मते – ''जिवंत माणसे अन्यायाच्या विरोधात प्रतिकार करतात''. इतिहासाच्या प्रत्येक कालखंडात स्पार्टाकस आणि भगात सिंह आदी जन्म घेत राहिले आहेत आणि क्रांतीच्या माध्यमातून लुटारूंना धुळीस मिळवत राहिले आहेत. आज अमेरिकन सैनिकांचा राग व्यक्तिगत विद्रोह किंवा आत्महत्यांच्या रूपात समोर येत आहे, कदाचित उद्या जन–आंदोलनांच्या समर्थनाच्या रूपातही पुढे येईल आणि ते मानवतेला पशु बनवणाऱ्या ह्या लुटारू व्यवस्थेचा अंत करू पाहणाऱ्या लढाईमध्ये भागीदार बनतील.

## विश्व सर्वहाराचे  महान नेता जोसेफ स्तालिन



(१८ डिसेंबर १८७८ - ५ मार्च १९५३)

**माझ्यासाठी ही कल्पना करणे सुद्धा अवघड आहे की एक बेरोजगार, भुकेला माणूस कुठल्या प्रकारे 'व्यक्तिगत स्वातंत्र्याचा' आनंद उपभोगू शकतो. वास्तविक पाहता स्वातंत्र्य केवळ तेच असू शकते जिथे एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीचे शोषण आणि उत्पीडन नसेल; जिथे बेरोजगारी नसेल, आणि व्यक्तीला स्वतःचा रोजगार, स्वतःचे घर आणि दररोजची भाकरी हिसकावून घेतली जाण्याची भीती नसेल. केवळ अशाच समाजात, कागदावर नव्हे, तर प्रत्यक्षात व्यक्तिगत आणि अन्य कुठल्याही प्रकारचे स्वातंत्र्य अस्तित्वात येऊ शकते.**

इतिहास

# पहिल्या महायुद्धाची शंभर वर्षे
# युद्धखोर साम्राज्यवादाचे सिंहावलोकन

• विराट

गेल्या शतकात साम्राज्यवादाने मानवतेला दोन साम्राज्यवादी युद्धांच्या आगीत लोटून नफ्यासाठी मोठ्या प्रमाणात नरबळी दिले. १९१४ ते १९१८ पर्यंत चाललेले पहिले महायुद्ध आणि १९३९ ते १९४५ पर्यंत चाललेले दुसरे महायुद्ध यांनी असंख्य लोकांचे जीव घेतले. त्या अगोदर मानवसमाजाला एवढ्या मोठ्या नरसंहाराला कधीच सामोरे जावे लागले नव्हते. आजपासून १०० वर्षांपूर्वी १९१४ साली पहिल्या महायुद्धाला तोंड फुटले. एकूण जग दोन गटांमध्ये विभागले गेले. ब्रिटन, फ्रान्स, रशिया, संयुक्त राज्य अमेरिका, जपान आदी 'मित्र शक्ती' (एलाइड पावर्स) च्या नावाने ओळखल्या जात होत्या, तर जर्मनी, ऑस्ट्रिया हंगेरी, ऑटोमन साम्राज्य, बल्गेरिया आदी 'एक्सिस पावर्स'च्या नावाने ओळखल्या जात होत्या. मित्र शक्तींकडून जवळपास ४ कोटी ३० लाख लोकांनी या युद्धामध्ये भाग घेतला ज्यांपैकी ५६ लाख लोक मारले गेले आणि 'ॲक्सिस पावर्स'कडून जवळपास २.५ कोटी लोक युद्धात उतरले ज्यांपैकी ४४ लाख लोक मारले गेले. युद्धात मित्र शक्तींचा विजय झाला. या भयंकर युद्धाने सुमारे १ कोटी ६० लाख लोकांचे जीव घेतले आणि असंख्य लोक शारीरिकदृष्ट्या निकामी झाले. नव्या भांडवली शक्तींच्या उदयामुळे जगाच्या पुनर्विभाजनासाठी लढले जाणारे हे एक साम्राज्यवादी युद्ध होते.

आज पहिल्या महायुद्धाला १०० वर्षे लोटल्यानंतर पुन्हा एकदा त्याच्या कारणांचे विवेचन- विश्लेषण करणे म्हणजे काही ॲकॅडमिक कसरत नाही. आजसुद्धा आपण साम्राज्यवादाच्या युगातच जगतो आहोत आणि आजसुद्धा साम्राज्यवादाद्वारे सामान्य कष्टकरी जनतेवर अनेक युद्धे लादली जात आहेत. म्हणून, साम्राज्यवाद कशा प्रकारे युद्धांना जन्म देतो, हे समजून घेणे आजही गरजेचे आहे. तसे पाहता पहिल्या महायुद्धाबद्दल जवळपास सर्वांनीच वाचलेले आहे, ऐकलेले आहे. परंतु त्याची ऐतिहासिक कारणे काय होती याबाबत अनेक भ्रम दिसून येतात, किंवा अधिक स्पष्ट शब्दांत सांगावयाचे झाले तर, अनेक भ्रम पसरविले गेले आहेत. अनेक भाडोत्री इतिहासकार हे युद्ध काही शासकांच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि इच्छेमुळे घडले, असेच सांगत असतात. बहुतेक या युद्धाची एकूण ऐतिहासिक पृष्ठभूमी गायब करतात आणि ऑस्ट्रियाचा आर्कड्यूक फ्रांज फर्डिनांडची साराजेवोमध्ये हत्या झाल्यामुळे या युद्धाचा भडका उडाल्याचे सांगतात. शालेय पुस्तकांमध्येसुद्धा अशा प्रकारच्या तात्कालिक कारणांवरच जोर दिला जातो आणि त्याच्या मूळ कारणांकडे डोळेझाक केली जाते. जर ऑस्ट्रियाच्या राजकुमाराची हत्या झाली नसती तर पहिले महायुद्ध झालेच नसते का? हा प्रश्न विचारला जाऊ शकतो. कोणताही गंभीर वाचक अशा मूर्ख विश्लेषणावर विश्वास ठेवणार नाही. काही गोष्टी समजून घेण्यासाठी पहिले महायुद्ध समजून घेणे महत्त्वाचे आहे. पहिल्या महायुद्धात पहिल्यांदाच साम्राज्यवादाचे अंतर्विरोध आणि भांडवलशाहीचे नरभक्षक चारित्र्य पूर्णपणे नग्न रूपात अशा प्रकारे जगासमोर आले होते. याच काळात सर्वहारा आंदोलनातील गद्दारांनी आणि घरभेद्यांनी आपापले मुखवटे उतरवले आणि त्यांचा खरा चेहरा दिसून आला. दुसऱ्या इंटरनॅशनलचे तमाम नेते साम्राज्यवादी युद्धाला सर्वहारा क्रांतीची संधी बनविण्याऐवजी 'पितृभूमीच्या रक्षणा'ची घोषणा देत आक्रमक अंधराष्ट्रवादाच्या प्रवाहात सामील झाले. दुसरीकडे, लेनिनच्या नेतृत्त्वाखाली बोल्शेविक पार्टीने युद्धाला क्रांतीच्या संधीत रूपांतरित करण्याच्या क्रांतिकारी घोषणेची अंमलबजावणी केली. या युद्धातून युद्धातून निर्माण झालेल्या परिस्थितीने १९१७ च्या ऑक्टोबर क्रांतीला जन्म दिला व लेनिनवादाचा विजय झाला. हे महायुद्ध साम्राज्यवादाचे तीव्र होणारे अंतर्विरोध टोकाला जाण्याची अभिव्यक्ती होते. दोन्ही महायुद्धांची कारणे समजून घेण्यासाठी साम्राज्यवाद काय आहे व तो अटळपणे युद्धांना कसा जन्म दोतो ते समजून घेणे गरजेचे आहे. साम्राज्यवादाचा एक एक पैलू समजून घेणे येथे आपला उद्देश नाही. परंतु थोडक्यात साम्राज्यवादाचे मूलभूत बिंदू समजून घेण्याचा प्रयत्न आपण करू. भांडवलशाही कोणत्या टप्प्यांमधून प्रवास करीत साम्राज्यवादापर्यंत येऊन पोहोचली ते समजून घेणे गरजेचे आहे. साम्राज्यवादी युद्धाने निर्माण केलेल्या संधीचा ऐतिहासिक लाभ घेऊन रशियामध्ये क्रांती करणाऱ्या लेनिन यांनी साम्राज्यवादाचे सर्व पैलू विस्तारपूर्वक मांडलेले आहेत. त्यांनी साम्राज्यवादाची व्याख्या करताना म्हटले आहे — साम्राज्यवाद भांडवलशाहीची एक विशेष अवस्था आहे. त्याची विशिष्ट प्रकृती तीन रूपांमधून प्रकट होते ; १. साम्राज्यवाद एकाधिकारी भांडवलशाही आहे. २. साम्राज्यवाद ऱ्हासोन्मुख भांडवलशाही आहे. ३. साम्राज्यवाद मरणासन्न भांडवलशाही आहे. लेनिन यांनी साम्राज्यवादाची पाच मूलभूत वैशिष्ट्ये या प्रकारे सांगितली आहेत ; १. उत्पादन आणि भांडवलाच्या एकवटण्याचे परिणाम

इतके विकसित होतात की आर्थिक जीवनावर एकाधिकारी संघटनांचे अधिपत्य स्थापन होते. २. बँकिंग भांडवल आणि औद्योगिक भांडवल एकत्र येतात व या वित्तीय भांडवलावर एक वित्तीय अल्पतंत्राचा उदय होतो. ३. मालांच्या निर्यातीहून पूर्णपणे भिन्न अशा भांडवलाच्या निर्यातीला विशेष महत्त्व प्राप्त होते. ४. आंतरराष्ट्रीय एकाधिकार संघ निर्माण होतात. ५. सर्वाधिक शक्तीशाली भांडवली शक्तींमध्ये एकूण जगाचे क्षेत्रीय वाटप पूर्ण होते. ही मूलभूत वैशिष्ट्ये समजून घेऊनच आपण आधुनिक युद्धांची कारणे समजू शकतो. ही वैशिष्ट्ये थोडक्यात समजवण्याचा येथे प्रयत्न केलेला आहे.

## १. एकाधिकार ( मक्तेदार ) साम्राज्यवादाचा आर्थिक पाया आहे.

साम्राज्यवादाला एकाधिकारी भांडवलशाहीसुद्धा म्हटले जाते. भांडवलशाहीच्या पहिल्या टप्प्यात मुक्त स्पर्धा हे त्याचे वैशिष्ट्य होते. परंतु भांडवलशाही आपल्या अंतर्विरोधांतून मक्तेदारीला जन्म देते, हे तिचे वैशिट्य आहे. भांडवलशाहीचा हा सामान्य नियम आहे की मोठे भांडवल लहान भांडवलाला गिळून टाकते. एकाधिकारी भांडवलशाही किंवा साम्राज्यवादाचा जन्म तीन टप्प्यांतून जाऊन झाला. पहिल्या टप्प्यात एकोणिसाव्या शतकाच्या सातव्या आणि आठव्या दशकात मुक्त स्पर्धा उत्पादक शक्तींच्या विकासामुळे आपल्या अत्युच्च बिंदूवर पोहोचली. आंतरिक दहन इंजिन, विजेची मोटर इत्यादी शोध लावले गेले व त्यामुळे उत्पादक शक्तींचा अभूतपूर्व विकास झाला. यामुळे अवजड उद्योगांचा उत्पादनामधील सापेक्ष सहभाग वाढला. १८७३ च्या मंदीमुळे दुसऱ्या टप्प्यातील उद्योगांमध्ये स्पर्धा तीव्र होत गेली आणि त्यातच लहान व मध्यम उद्योग मोठ्या प्रमाणात बंद होऊ लागले. आता एकाधिकारी संघांच्या (कार्टेल, ट्रस्ट, सिंडिकेट इत्यादी) विकासाचा मार्ग मोकळा झाला. डिझेल इंजिन,वाफेचं टर्बायन इत्यादी आविष्कारांमुळे उत्पादन शक्तींचा आणखी मोठ्या प्रमाणावर विकास झाला. उत्पादनात मोठ्या उद्योगांचा वाटा सतत वाढत गेला. अशा प्रकारे एकाधिकाराच्या टप्प्यापर्यंतच्या संक्रमणाची परिस्थिती प्राथमिक स्तरावर पूर्ण झाली होती. परंतु त्यानंतर उत्पादक शक्तींचा विकास अवरुद्ध होऊ लागला. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस व विसाव्या शतकाच्या आरंभी तिसऱ्या टप्प्यात भांडवलाच्या संचयाची आणि एकवटण्याची गती अत्यंत वेगवान झाली होती. मोठ्या उद्योगांच्या हातात भांडवलाचे एकवटणे अधिकाधिक होत चालले. एकाधिकारी संघटना वेगाने विकसित होऊ लागल्या आणि समस्त आर्थिक जीवनाचा पाया बनून गेल्या. या वेळेपर्यंत एकाधिकारी संघटनांनी बहुतेक उत्पादनांच्या उत्पादनावर आणि वितरणावर मजबूत पकड मिळवलेली होती आणि भांडवलशाही देशांच्या नाड्या त्यांच्या हाती आलेल्या होत्या. या एकाधिकारी संघटना विक्रीच्या अटी, फेडीच्या तारखा इत्यादीसंबंधी समझोते करायच्या. त्या बाजारपेठा आपापसात वाटून घेत होत्या आणि किती माल पैदा केला जाईल व काय किंमत निश्चित केली जाईल हेसुद्धा ठरवू लागल्या. या संघटनांची संख्या सतत वाढत जात होती. १९८६ मध्ये जर्मनीमध्ये कार्टेलांची संख्या जवळपास २५० होती आणि १९०५ येईतो ती ३८५ वर पोहोचली. यांमध्ये जवळपास १२००० उद्योग सहभागी होते. संयुक्त राज्य अमेरिकेमध्ये १९०० मध्ये १८५ ट्रस्ट अस्तित्त्वात होते आणि १९०७ येईस्तोवर त्यांची संख्या २५० वर पोहोचली होती. या कार्टेल आणि ट्रस्ट उद्योगाच्या कोणत्याही शाखेचा ७० ते ८० टक्के हिस्सा आपल्या हातांमध्ये केंद्रित करीत होत्या. त्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांची संख्या एकूण कामागारांच्या ७० ते ७५ टक्के असायची, मात्र या उद्योगांची संख्या एकूण उद्यागांच्या एक चतुर्थांशच असायची. या संघटना उत्पादन कशा प्रकारे नियंत्रित करीत होत्या हे पाहिले जाऊ शकते. या मोठ्या एकाधिकारी संघटना लहान उद्योगांना सतत नष्ट करीत होत्या. अशा प्रकारे मुक्त स्पर्धेच्या गर्भातूनच एकाधिकाराचा जन्म झाला परंतु त्याने कधीच या स्पर्धेचा अंत केला नाही, उलट त्याने स्पर्धा अधिक तीव्र बनविली. भांडवली समाजात स्पर्धा कधीच संपत नाही. एकाधिकारी आणि गैर एकाधिकारी संघटनांमधील स्पर्धा सतत सुरूच राहते, एकाधिकारी संघटनांमध्ये कधी कच्च्या मालाच्या स्रोतांसाठी आणि बाजारपेठांसाठी स्पर्धा सुरू राहते. एकाच एकाधिकारी संघटनेच्या वेगवेगळ्या उद्योगांमध्येसुद्धा स्पर्धा सुरूच राहते.

## २. वित्तीय भांडवलाच्या पायावर एका वित्तीय अल्पतंत्राचा उदय

मुक्त स्पर्धेच्या काळात बँका समाजात निष्क्रिय पडलेले धन एकत्र करायच्या आणि मॅन्युफॅक्चरिंग करणाऱ्या व वाणिज्यिक भांडवलदारांना ते अल्पावधिक ऋणाच्या रूपात देऊन मध्यस्थाची भूमिका पार पाडायच्या. परंतु भांडवलशाही जसजशी मुक्त स्पर्धेतून एकाधिकाराच्या टप्प्यात पोहोचली, तशी बँकांनी आपली भूमिका बदलली. मध्यस्थाच्या भूमिकेपुढे जाऊन त्या सर्वशक्तीमान एकाधिकारी बनल्या. बँकिंग उद्योगात एकाधिकाराने बँकिंग आणि मॅन्युफॅक्चरिंग उद्योगाच्या नात्यात मूलभूत परिवर्तन घडवून आणले. तीव्र होणाऱ्या स्पर्धेने अशी परिस्थिती निर्माण केली जिच्यामुळे बँक भांडवल आणि औद्योगिक भांडवलाच्या विलिनीकरणाची स्थिती निर्माण झाली. बँकांनी आपले भांडवल औद्योगिक घराण्यांना व्याजावर देण्यास सुरुवात केली. सुरुवातीला त्यांची भूमिका साध्या साहाय्यकाची होती. परंतु लवकरच बँका अधिकाधिक नियंत्रणकारी बनू लागल्या. त्याचबरोबर, ही प्रक्रिया नेमकी तिच्या विरुद्धही घडत गेली. तमाम मोठमोठ्या औद्योगिक घराण्यांनी बँका किंवा त्यांचे शेअर विकत घेण्यास सुरुवात केली किंवा आपल्या बँका स्थापित करून बँकिंगच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात भांडवल संचय करण्यासाठी हस्तक्षेप सुरू केला. मॅन्युफॅक्चरिंग स्टॉक बँका मोठ्या प्रमाणात विकत घेऊ लागल्या, व त्याचबरोबर मॅन्युफॅक्चरिंग एकाधिकारी संघटनासुद्धा बँकांचे स्टॉक खरेदी करू लागल्या. अशा प्रकारे एकाधिकारी बँकिंग

भांडवल आणि एकाधिकारी मॅन्युफॅक्चरिंग भांडवल हळूहळू विलीन झाले आणि वित्तीय भांडवल अस्तित्त्वात आले आणि बेसुमार वित्तीय भांडवलाचे स्वामी वित्तीय सम्राट बनले. ही विराटकाय वित्तीय घराणी पुढच्या काळात राष्ट्रीय अर्थव्यवस्थांना अधिकाधिक नियंत्रित करू लागली, व साहजिकच लवकरच हे वित्तीय दैत्य प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे राजकीय संरचनेलासुद्धा नियंत्रित करू लागले.

## ३. माल निर्यातीहून वेगळ्या अशा भांडवलाच्या निर्यातीने असाधारण महत्त्व प्राप्त करणे

मुक्त स्पर्धेच्या काळात मालाची निर्यात हे भांडवलाचे वैशिष्ट्य होते परंतु साम्राज्यवाद येता येता भांडवलाच्या निर्यातीने असाधारण महत्त्व प्राप्त केले. साम्राज्यवादाच्या युगाच्या अगोदर मुक्त स्पर्धेच्या काळातही भांडवलाची निर्यात होत होती परंतु तिला व्यापक रूप प्राप्त झालेले नव्हते. १८६२ मध्ये इंग्लंडद्वारे गुंतविलेले भांडवल ३.६ अरब फ्रँक होते, १८९३ मध्ये ते ४२ अरब फ्रँक झाले आणि पहिले महायुद्ध येता येता ते ७५ ते १०० अरब फँकपर्यंत पोहोचले. हे पाहिले जाऊ शकते की साम्राज्यवादाच्या काळात भांडवलाच्या निर्यातीत अपार वृद्धी होते. भांडवलशाही देशांमध्ये नफा कमाविणाऱ्या सर्वच उद्योगांवर अगोदरच एकाधिकार कायम झाला होता. म्हणूनच आपल्या देशातील कष्टकऱ्यांचे रक्त शोषून कमावलेले भांडवल अशा देशांमध्ये गुंतविण्यात आले जेथे भांडवलाचा अभाव होता आणि श्रम व कच्चा माल स्वस्तात उपलब्ध होता. या देशांमध्ये मजुरीचा दर कमी होता, जमीन आणि कच्चा माल सहज आणि स्वस्तात मिळत होते. या देशांतील कामगारांचे निर्मम शोषण करण्यात आले आणि भांडवलाचे डोंगर उभे करण्यात आले. वित्तीय भांडवलाच्या काळात भांडवलाची निर्यात अगदी स्वाभाविक होती. देशी बाजारपेठा संतृप्ती बिंदूवर पोहोचण्याबरोबरच तसेच देशी अर्थव्यवस्थेत नफ्याचे दर विलक्षण कोसळण्याबरोबरच साम्राज्यवादी देशांच्या भांडवलदारांसाठी भांडवलाची निर्यात हे अधिक उपयुक्त धोरण होते. जागतिक पातळीवर चालू असलेल्या स्पर्धेमध्ये मालाच्या उत्पादनाचा खर्च कमीत कमी ठेवण्यासाठी साम्राज्यवादी देशांच्या भांडवलदार वर्गाला स्वस्तातला स्वस्त श्रम आणि स्वस्तातला स्वस्त कच्चा माल हवा होता. आणि हा त्यांना वसाहतींमध्ये मिळू शकत होता. त्याचबरोबर, आपल्या देशातील वाढत्या कामगार आंदोलनाच्या दबावापासून सुटका करून घेण्यासाठी व आपल्या देशातील कामगार वर्गाला काही सवलती देण्यासाठीसुद्धा ज्या गोष्टीजी गरज होती, ती गोष्ट होती भांडवल निर्यात. अगोदर उन्नत भांडवलदार देश आपल्या देशात उत्पादन करून त्याची विक्री वसाहतींमध्ये करीत होते आणि वसाहती कच्च्या मालाचा पुरवठा करीत होत्या. परंतु आता कच्चा माल साता समुद्रापार नेऊन उत्पादित माल पुन्हा वसाहतींमध्ये नेऊन विकण्याऐवजी भांडवलाची निर्यात करून वसाहतींमध्येच उत्पादन करणे आणि ते जगभरातील बाजारपेठांमध्ये विकणे अधिक सोयीचे होते. लवकरच ही भांडवलाची निर्यात प्रमुख प्रवृत्ती बनली आणि मालाची निर्यात दुय्यम ठरली.

## ४. आंतरराष्ट्रीय एकाधिकार संघांचे निर्माण आणि त्यांच्यामध्ये जगाचे वाटप

लेनीन यांनी अत्यंत अचूक शब्दांमध्ये ही परिघटना समजावली आहे. भांडवलदारांचे एकाधिकारी संघ, कार्टेल, सिण्डिकेट आणि ट्रस्ट सर्वप्रथम आपल्या देशांतील बाजारपेठांचे आपापसात वाटप करीत होत्या, त्या देशातील उद्योगांना जवळजवळ पूर्णपणे आपल्या कब्जात करून घेत होत्या. परंतु भांडवलशाहीमध्ये देशातील बाजारपेठा आनिवार्यपणे विदेशी बाजाराशी जोडलेल्या असतात. भांडवलशाहीने फार पूर्वीच जागतिक बाजारपेठ तयार केली होती. जसजशी भांडवलाची निर्यात वाढू लागली व मोठमोठ्या एकाधिकार संघांचे विदेशी तसेच वासाहतिक संबंध आणि प्रभावक्षेत्र सर्वच प्रकारे वाढत गेले, तसतशी स्वाभाविकपणे या संघांदरम्यान आंतरराष्ट्रीय समझोत्यांच्या दिशेने आणि आंतरराष्ट्रीय कार्टेलांचे निर्माणाच्या दिशेने परिस्थिती अग्रेसर होत गेली. हा भांडवल तसेच उत्पादनाच्या विश्वव्यापी एकवटण्याचा नवा टप्पा आहे जो अगोदरच्या सर्वच टप्प्यांपेक्षा अधिक उंच होता. या आंतरराष्ट्रीय कार्टेल लहानमोठ्या कंपन्यांना आपल्या अधीन करून घेत होत्या आणि जगाच्या आर्थिक वाटपासाठी आपापसात करार करीत होत्या. स्टँडर्ड ऑईल कंपनी, जनरल इलेक्ट्रिक कंपनी, जनरल मोटर कंपनी इत्यादी अशाच प्रकारचे आंतरराष्ट्रीय संघ तयार झाले होते. विभिन्न करारांच्या द्वारे जगाचे आर्थिक वाटप केल्यानंतरदेखील आंतरराष्ट्रीय संघांदरम्यानचा संघर्ष काही संपुष्टात येत नाही, उलट तो वाढत जातो. हे संघ म्हणजे साम्राज्यवादाची एक अभिलाक्षणिकता असल्या कारणाने व साम्राज्यवाद म्हणजे भांडवलशाहीचीच अत्युच्च अवस्था असल्यमुळे जोपर्यंत वर्गांचे अस्तित्व आहे तोवर या संघांदरम्यानच्या संघर्षाची प्रकृती आणि या संघर्षांची अंतर्वस्तू कधी बदलत नाही, बदलते ते केवळ त्याचे रूप. साम्राज्यवादाच्या काळात केंद्रीकरण ज्या टोकाला पोहोचले होते, त्या परिस्थितीत भांडवलदारांसमोर नफा कमाविण्यासाठी जगाचे वाटप करण्याऐवजी दुसरा मार्ग शिल्लक राहत नाही. हे वाटप भांडवलाचे प्रमाण आणि शक्तीचे प्रमाण यांच्यानुसार होते व त्यात बदल घडून येताच संघर्ष तीव्र होत जातो आणि राजकीय संघर्षाचे रूप धारण करतो. लेनिन यांच्या शब्दांत, भांडवलशाही संघांच्या दरम्यान असे संबंध निर्माण होतात जे जगाच्या आर्थिक वाटपावर आधारित असतात आणि त्याचबरोबर व त्याच संदर्भात राजकीय संघांच्या दरम्यान, राज्यांच्या दरम्यान काही असे संबंध निर्माण होतात ज्यांचा आधार असतो जगाचे क्षेत्रीय वाटप, वसाहतींसाठी संघर्ष आणि आर्थिक क्षेत्रांसाठी संघर्ष.

# ५. साम्राज्यवादी शक्तींच्या दरम्यान जगाचे क्षेत्रीय वाटप

साम्राज्यवादाच्या युगात साम्राज्यवादी भांडवलाचा संघर्ष आपल्या अत्युच्च बिंदूवर पोहोचला होता. जर्मनी आणि अन्य युरोपयी देश आणि संयुक्त राज्य अमेरिका ब्रिटिश अधिपत्याला आव्हान देऊ लागले होते. जसजसे या देशांच्या शक्तीचे प्रमाण वाढत गेले तसतसा हा संघर्ष अधिकाधिक तीव्र होऊ लागला. पहिले महायुद्ध येता येता उभ्या जगाचे वाटप युरोपीय साम्राज्यवादी देशांच्या दरम्यान पूर्ण झाले होते. आकडे काढून पाहिले तर हे स्पष्ट होते. १८७६ पर्यंत युरोपीय वासाहतिक शक्तींचे अधिपत्य आफ्रिकेच्या केवळ १०.८ टक्के क्षेत्रावर होते तेच १९०० येता येता ९०.४ टक्के क्षेत्रावर अधिपत्य कायम करण्यात आले होते.पोलिनेशियाच्या ५७ टक्के क्षेत्रावर १८७६ पर्यंत अधिपत्य कायम झाले होते ते १९०० पर्यंत ९९ टक्क्यांपर्यंत गेले होते. एशियाच्या ५७ टक्के क्षेत्रावर वासाहतिक शक्तींनी आपला कब्जा केलेला होता. ऑस्ट्रेलियाचे पूर्ण वासाहतिकरण अगोदरच झालेले होते. अशा प्रकारे एकूण जगाचे विभाजन साम्राज्यवादाच्या काळात पूर्ण झाले होते आणि आता केवळ त्याचे पुनर्विभाजनच शक्य होते. ही परिघटना लेनिन यांनी पुढील शब्दांत स्पष्ट केली आहे, ''भांडवलशाही देशांच्या वासाहतिक धोरणाने आपल्या पृथ्वीवर अनधिकृत प्रदेशांवर अधिपत्य स्थापित करण्याचे काम पूर्ण केले आहे. प्रथमच जग पूर्णपणे वाटले गेले आहे आणि म्हणूनच भविष्यात तिचे केवळ पुनर्विभाजनच शक्य आहे. म्हणजेच, आता हे शक्य नाही की असा कोणताही प्रदेश ज्याचा कोणी मालक नाही, कोण्या मालकाच्या ताब्यात जाऊ शकेल, उलट आता एकच होऊ शकते की एक मालक दुसऱ्या मालकाच्या हाती जाऊ शकतो. म्हणजेच एका साम्राज्यवादी युद्धासाठी पूर्वपिठिका तयार झालेली होती.''

अशा प्रकारे आपण पाहिले की साम्राज्यवादाचे अंतर्विरोध तीव्रतर होत जातात आणि शेवटी साम्राज्यवादी युद्धांना जन्म देतातच देतात. पहिले महायुद्ध हे साम्राज्यवादी युद्ध होते आणि साम्राज्यवादाचे तीव्र होणारे अंतर्विरोध टोकाला जाण्याची ती अभिव्यक्ती होती. हे कोणत्याही शासकांच्या षड्यंत्रामुळे किंवा एखाद्या राजकुमाराच्या हत्येमुळे झाले असे मानणे अनैतिहासिक ठरेल. फार पूर्वीपासूनच साम्राज्यवादी युद्धाची शक्यता निर्माण होऊ लागली होती. १९१० येता येता हे स्पष्ट झाले होते की जग ज्वालामुखीच्या तोंडावर आहे. जगाचे पुनर्विभाजन आता युद्धाद्वारेच होऊ शकत होते. १८७६ ते १९१४ दरम्यान फ्रान्स आणि जर्मनी मोठ्या भांडवलदार शक्तींच्या रूपात जगासमोर आल्या होत्या आणि जसजशी त्यांची शक्ती वाढत गेली तसतसा वसाहतींसाठी संघर्ष तीव्र होत गेला. अखेर वसाहती भांडवलशाही देशांसाठी इतक्या महत्त्वाच्या का होत्या हेदेखील समजून घेणे गरजेचे आहे. प्रथम, वसाहती साम्राज्यवादी देशांसाठी कच्च्या मालाचा सर्वाधिक महत्त्वपूर्ण स्रोत होत्या. मक्तेदारीने मोठ्या प्रमाणावर उत्पादनास जन्म दिल्यामुळे उत्पादनाचे प्रमाण वाढत जाण्याबरोबरच कच्च्या मालाची गरज अधिकाधिक वाढत गेली आणि त्यांच्या निरनिराळ्या स्रोतांवर कब्जा मिळविणे महत्त्वपूर्ण बनले. दुसरे, वसाहतींमध्ये एकाधिकारी संघटना साम्राज्यवादी देशांतील कामगारांचे निर्मम शोषण करू शकत होत्या. तिसरे, एकाधिकारी संघटनांसाठी वसाहती म्हणजे सर्वाधिक लाभदायक बाजारपेठा होत्या. चौथे, आपले जागतिक प्रभुत्व कायम करण्यासाठी साम्राज्यवादी वसाहतींना आपले आधारक्षेत्र मानत होते, युद्धासाठी वसाहतींतून सैनिक भरती केले जाऊ शकत होते, वसाहतींतील जनतेवर मोठ्या प्रमाणात कर लादून युद्धासाठी संसाधने गोळा केली जाऊ शकत होती. पाचवे, साम्राज्यवादी वसाहतींमध्ये भयंकर लूट करून आपल्या देशातील कामगार वर्गाचा क्रोध काही प्रमाणात शांत करू शकत होते. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस ब्रिटनचा एक वित्तीय सम्राट सेसील रोड्स याने एकीकडे साम्राज्यवादाचे समर्थन करताना म्हटले होते, ''युनायटेड किंगडमच्या ४ कोटी जनतेला रक्तपातपूर्ण गृहयुद्धापासून वाचविण्यासाठी आपल्याला – वासाहतिक राजनीतिज्ञांना – येथील अतिरिक्त जनतेच्या वसनासाठी व येथील कारखाने तसेच उत्पादनाच्या विक्रीसाठी नव्या बाजारपेठा पुरविण्याकरिता नवे प्रदेश मिळवावे लागतील. मी नेहमीच म्हटल्याप्रमाणे साम्राज्य म्हणजे पोटापाण्याचा प्रश्न आहे. जर तुम्ही गृहयुद्धापासून स्वत:ला वाचवू इच्छित असाल तर तुम्हांला साम्राज्यवादी व्हावेच लागेल.'' साम्राज्यवाद्यांसाठी वसाहती किती महत्त्वाच्या बनल्या होत्या ते या वक्तव्यावरून स्पष्टपणे पाहिले जाऊ शकते. साम्राज्यवादी शक्तींच्या विकासाबरोबरच साम्राज्यवादी युद्ध अपरिहार्य बनले होते. १८७६ ते १९१४ दरम्यान ब्रिटनच्या वसाहतींचे क्षेत्रफळ २२५ लाख वर्ग किलोमीटरवरून वाढून ३३५ लाख वर्गकिलोमीटर झाले होते. फ्रान्सच्या वसाहतींचे क्षेत्रफळ ६० लाख वर्गकिलोमीटरवरून वाढून १०६ वर्गकिलोमीटर झाले होते. जर्मनी, ज्याच्यापाशी अगोदर कोणत्याच वसाहती नव्हत्या त्याने १९१४ पर्यंत २९ लाख वर्गकिलोमीटर क्षेत्रफळावर कब्जा केलेला होता. संयुक्त राज्य अमेरिका आणि जपानसुद्धा सतत शक्तीशाली बनत होते. जपानने १९०४–०५ मध्ये रशियाला जोरदार मात दिलेली होती. ऑटोमन साम्राज्याचे विघटन होत होते आणि बाल्कन राज्यांकडे पाहून सारे साम्राज्यवादी जिभल्या चाटत होते. साम्राज्यवादी देशांसाठीसुद्धा हे स्पष्ट झालेले होते की युद्ध आता फार दूर नाही. सर्वच साम्राज्यवादी देश आपली सैन्यशक्ती १८९० पासूनच वाढवू लागले होते. ब्रिटनचा सैनिकी खर्च १८८७ मध्ये ३२ मिलियन पाउण्ड होता तो १८९४ साली ४४ मिलियन पाउण्ड झाला आणि १९१३ साली ७७ मिलियन पाउण्डपर्यंत जाऊन पोहोचला. जर्मनीचा सैनिकी खर्च १८९५ मध्ये ९० मिलियन मार्क होता तो १९१३ येता येता ४०० मिलियन मार्कवर गेला. शस्त्र उद्योगाचा ७० टक्क्यांहून ज्यादा हिस्सा एकाधिकारी संघटनांच्या हाती होता. युद्धाचे संकेत मिळालेले होते. जुलै ऑगस्ट १९१४ मध्ये साम्राज्यवादी अंतर्विरोध उघडपणे समोर आले आणि महायुद्धाला सुरुवात झाली. आपण आतापर्यंत हे पाहिलेलेच आहे की या युद्धाची ऐतिहासिक कारणे भांडवलशाहीच्या साम्राज्यवादातील संक्रमाणात निहित आहेत. दोन्ही साम्राज्यवादी गट कशा प्रकारच्या समझोत्यांद्वारे

अस्तित्वात आले, युद्धादरम्यान शक्ती संतुलन कशा प्रकारे बदलत राहिले आणि युद्धानंतर कशाकशा प्रकारे ''शांतता करार'' झाले हा एका वेगळ्या लेखाचा विषय होऊ शकतो. युद्धाचे वर्णन करणे हा येथे आपला उद्देश नसून आपल्याला युद्धाच्या ऐतिहासिक कारणापुरतेच लेखाला मर्यादित ठेवायचे आहे.

पहिल्या महायुद्धाच्या काळात साम्राज्यवादी गटांमधील संधीसाधू आणि संशोधनवाद्यांचे चारित्र्यदेखील उघडे पडले होते. त्यांचे नेतृत्त्व दुसऱ्या इंटरनॅशनलचा नेता काउत्स्की करीत होता. १९१२ मध्ये बैसेल (स्विट्झरलँड) मध्ये दुसऱ्या इंटरनॅशनलच्या एका काँग्रेसमध्ये एक घोषणापत्र प्रसिद्ध करण्यात आले होते. त्यामध्ये, साम्राज्यवादी युद्ध भडकले तर समाजवाद्यांनी युद्धजन्य आर्थिक आणि राजकीय संकटाचा लाभ घेऊन समाजवादी क्रांतीचा संघर्ष तीव्र केला पाहिजे, यावर जोर देण्यात आला होता. त्यावेळी दुसऱ्या इंटरनॅशनलच्या काउत्स्की, वानडरवेल्डे आदी नेत्यांनी काँग्रेसमध्ये या युद्धविरोधी घोषणापत्राचे समर्थन केले होते. परंतु साम्राज्यवादी युद्ध भडकताच या नेत्यांनी सर्वहारा वर्गाशी गद्दारी करून आपल्या देशाच्या भांडवलशहा सरकारांच्या साम्राज्यवादी धोरणाचे खुलेआम समर्थन केले आणि साम्राज्यवादी युद्धाला पितृभूमीच्या रक्षणार्थ लढले जाणारे युद्ध ठरविले. यामुळे लवकरच दुसऱ्या इंटरनॅशनलचे पतन झाले. रशियामध्ये बोल्शेविक पार्टीने लेनिन यांच्या नेतृत्त्वाखाली योग्य धोरण स्वीकारून युद्धजन्य संकटाचा लाभ घेऊन साम्राज्यवादी युद्धाला गृहयुद्धात बदलण्याची घोषणा केली आणि रशियाची महान ऑक्टोबर क्रांती संपन्न झाली. लेनिन यांनी हे सिद्ध केले की साम्राज्यवादी युद्ध क्रांतिकारी परिस्थितीसुद्धा निर्माण करते आणि जर सर्वहारा वर्गापाशी त्याचे नेतृत्व करणारी संघटित, तावून सुलाखून निघालेली आणि क्रांतीच्या विज्ञानाची सुसंगत जाण बाळगणारी एक पार्टी असेल तर क्रांतिकारी परिस्थितींचा लाभ घेऊन साम्राज्यवादाच्या संघटित शक्तींना पराजित करता येते.


भांडवलशाहीतून उत्पन्न झालेल्या संकटांपासून सुटका करून घेण्यासाठी आणि आपले जागतिक प्रभुत्व कायम करण्यासाठी साम्राज्यवादी नेहमीच कष्टकरी जनतेवर युद्ध लादत असतात. दुसरे महायुद्धसुद्धा केवळ हिटलरची इच्छा आणि यहुद्यांबद्दलच्या तिरस्कारातून जन्माला आले होते असे मानणे अनैतिहासिक ठरेल. दुसरे महायुद्धसुद्धा साम्राज्यवादातील अंतर्विरोध भडकण्याचा परिणाम होता. पहिल्या महायुद्धात जर्मनीचा पराभव झाला आणि त्याला कडक दंड ठोठावण्यात आले होते. त्यानंतरदेखील जर्मनीमध्ये औद्योगिक उत्पादनाने १९२७ येता येता पूर्वीसारखाच वेग पकडला होता. युद्धानंतर आलेल्या तेजीने भांडवलशाहीला मोकळा श्वास घेण्यास थोडी फुरसत दिली. परंतु भांडवलशाहीत संकट निर्माण होणे अटळ आहे आणि १९२०-३०ची महामंदी पुन्हा भांडवलशाहीचे दार ठोठावू लागली. ही मंदी इतिहासातील सर्वांत भयंकर मंदी ठरली. तिच्यातून सुटका करून घेण्यासाठी साम्राज्यवाद्यांना आणखी एका भीषण युद्धाची गरज होती. जपान आणि जर्मनीचा औद्योगिक विकास मोठ्या प्रमाणात झालेला होता. जपान पहिल्या महायुद्धातील विजयी गटासोबत होता परंतु त्याला विशेष काही प्राप्त झाले नव्हते. मंदीच्या काळात नफा आत्यंतिक संकुचित झाल्यामुळे आणि कामगार आंदोलन दाबून टाकण्यासाठी जर्मनीला हिटलरसारख्या राक्षसाचीच गरज होती. नफ्याची हाव पुन्हा एकदा जगाला विनाशाकडे घेऊन चालली होती. जर्मनी, इटाली, अमेरिका, जपान इत्यादींच्या शक्तीचे प्रमाण सतत वाढत चालले होते आणि जगाच्या पुनर्विभाजनाचा प्रश्न पुन्हा एकदा समोर उभा ठाकला होता. आर्थिक संकटातून सुटका करून घेण्यासाठी आणि जगावर प्रभुत्व स्थापित करण्यासाठी साम्राज्यवाद्यांमध्ये आणखी एक भीषण युद्ध अपरिहार्य होते आणि १९३९ साली ते भडकले.

लेनिन यांनी साम्राज्यवादाला मरणासन्न भांडवलशाही म्हटले होते. त्यांनी म्हटले होते की साम्राज्यवाद सर्वहारा क्रांतीची पूर्वसंध्या आहे. आज ज्या युगात आपण राहतो आहोत तेदेखील साम्राज्यवादाचेच युग आहे. आपल्या रूपातील तमाम बदलांनंतरही साम्राज्यवादाची अंतर्वस्तू आजही तीच आहे. सांप्रत काळात साम्राज्यवाद पूर्वीपेक्षाही अधिक अशक्त बनलेला आहे. गेल्या शतकातील साम्राज्यवादाने दोन महायुद्धांसह अनेक लहानमोठ्या युद्धांना जन्म दिला. दोन मोठ्या महायुद्धांत साम्राज्यवाद्यांनादेखील भयंकर नुकसान सोसावे लागले. आज साम्राज्यवादी देशांच्या अर्थव्यवस्था एकमेकांचा आधार घेऊन उभ्या आहेत व हे लक्षात घेता आज तिसऱ्या महायुद्धाची शक्यता अत्यल्प आहे. याची अनेक कारणे आहेत. एक कारण म्हणजे दुसऱ्या महायुद्धानंतर साम्राज्यवादाच्या कार्यशैलीमध्ये अनेक परिवर्तने आलेली आहेत. या परिवर्तनांतील सर्वाधिक महत्त्वाचे म्हणजे जगाचे अवासाहतिकरण. आता जग पुन्हा त्या दिशेने उलटे जाऊ शकत नाही जेव्हा आफ्रिका, एशिया आणि लॅटिन अमेरिकेचे तमाम देश साम्राज्यवादी शक्तींच्या पूर्ण वसाहती आणि गुलाम होते. आजसुद्धा साम्राज्यवादी लुटीचा दाब याच महाद्विपांच्या उत्तर वासाहतिक देशांवरच जास्त आहे परंतु हेदेखिल सत्य आहे की या उत्तर वासाहतिक देशांचा शासक भांडवलदार वर्ग आपली राजकीय स्वतंत्रता टिकवून ठेवीत असतो. हा वास्तविक साम्राज्यवादाचा कनिष्ठ भागीदार बनून त्याच्याशी सौदे आणि मोलभाव करीत असतो. त्याच्यापाशी एक विशालकाय बाजारपेठ, एक विशालकाय स्वस्त श्रमशक्ती आणि कच्च्या मालाचे भंडार आहे, तर दुसरीकडे त्याला स्पर्धेत टिकून राहण्यासाठी भांडवल आणि तंत्रज्ञानाची गरज आहे. त्याचबरोबर साम्राज्यवादी देशांतील संकटग्रस्त भांडवलदार वर्गाला नव्या बाजारपेठांची आणि भांडवलाच्या आधिक्यापासून सुटका करून घेण्यासाठी गुंतवणुकीच्या नव्या संधींची आवश्यकता आहे. या नव्या स्थितीने जागतिक भांडवलशाहीची आंतरिक समीकरणे बदललेली आहेत. आज महायुद्ध भडकण्याची शक्यता कमी आहे. तशा प्रकारे जगभरातील शक्तींचे धृवीकरण होणे फारच मुश्कील आहे. म्हणूनच लहान रूपातील क्षेत्रीय युद्धांच्या (रीजनल थिएटर्स ऑफ वॉर) मंचावर साम्राज्यवादी आपले अंतर्विरोध सोडविण्याचा प्रयत्न करीत आहेत. जी क्षेत्रे जागतिक भांडवलशाहीसाठी आर्थिक, राजकीय, सामरिक आणि राजकीय दृष्टीने विशेष महत्त्वाची आहेत त्याच क्षेत्रांमध्ये क्षेत्रीय युद्धे होणार हे सांगण्याची गरज नाही. म्हणूनच पश्चिम एशिया

आणि युक्रेन आज अशा दोन क्षेत्रीय युद्धांचे मंच बनले आहेत जेथे साम्राज्यवादी अंतर्विरोध गुरफटलेले आहेत. साम्राज्यवाद्यांमधील युद्धे अन्य रूपदेखील धारण करीत आहेत, उदाहरणार्थ, मुद्रा युद्ध. त्याचबरोबर आणखी एका कारणास्तव आज महायुद्ध भडकण्याची शक्यता कमी आहे आणि ते म्हणजे आण्विक डेटेरेंटचे अस्तित्त्व. निश्चितच असे कोणतेही सामरिक कारण स्वत:हून निर्धारक भूमिका पार पाडू शकत नाही. परंतु साम्राज्यवादाची एकूण संरचना आणि त्याच्या कार्यप्रणालीमध्ये आलेल्या बदलांच्या संदर्भात त्याचीसुद्धा एक भूमिका निश्चितच आहे. आजचे साम्राज्यवादी जग पूर्वीच्या तुलनेत कितीतरी अधिक तीव्र प्रतिस्पर्धेचे साक्षीदार बनते आहे. पैक्स ब्रिटानिकासारखा काळ पुन्हा कधी येऊ शकत नाही, ते साम्राज्यवादाच्या एका विशिष्ट टप्प्यातच शक्य होते. सोवियत संघाच्या विघटनानंतर काही काळ पॅक्स अमेरिकानासदृश परिस्थितीचा भ्रम निर्माण झाला होता, व कित्येक मार्क्सवादी त्याचे बळी ठरले होते. परंतु हा भ्रम २००० च्या पहिल्या दशकातच नष्ट झाला. आज आपण अमेरिकेच्या आर्थिक शक्तीच्या उताराचे साक्षीदर आहोत आणि अन्य साम्राज्यवादी शक्तींचा उदय आणि उभारसुद्धा पाहत आहोत, जे अमेरिकेच्या साम्राज्यवादी वर्चस्वाशी गरजेनुसार सौदे करतात आणि कधी त्या वर्चस्वाला आव्हानही देतात. अशा काळात तिसऱ्या महायुद्धाची शक्यता कमीच दिसते आहे.

परंतु याचा अर्थ असा बिलकुल नाही की साम्राज्यवादाच्या अस्तित्त्वासाठी युद्ध आवश्यक नाही. आजसुद्धा साम्राज्यवादाचा अर्थ युद्ध हाच आहे. अगोदर उल्लेख केल्याप्रमाणे, सध्या अरब जग साम्राज्यवादी युद्धांचा रंगमंच बनला आहे. युक्रेन विवादसुद्धा साम्राज्यवादी देशांमधील संघर्षाचीच अभिव्यक्ती आहे. अफगाणीस्तान आणि इराकवर यापूर्वीच साम्राज्यवादी युद्धे लादली गेली आहेत. आज साम्राज्यवाद १९३०नंतरच्या महामंदीनंतरच्या सर्वात मोठ्या मंदीशी झुंज देत आहे. स्वत:च्या आर्थिक आणि राजकीय संकटांतून सुटका करून घेण्यासाठी आजसुद्धा साम्राज्यवादी देश युद्धांचाच आश्रय घेत आहेत. आजचा साम्राज्यवाद सट्टेबाज भांडवलाचे अधिपत्य असलेल्या अस्थिर– अराजक जागतिक अर्थव्यवस्थेवर उभा आहे ज्याचा पाया पोकळ झालेला आहे आणि तो आपल्या जडत्वाच्या बळावरच टिकून आहे. जोपर्यंत त्याचा विनाश होत नाही तोपर्यंत तो मानवसमाजासाठी एक धोका म्हणून तसाच राहील आणि मानवतेवर युद्ध लादत राहील आणि त्याचबरोबर पर्यावरणाचासुद्धा भयंकर नाश करीत राहील. परंतु तो आपल्या गतीने आपोआप नष्ट होणार नाही. माओ यांनी म्हटल्याप्रमाणे, ''साम्राज्यवाद खतरनाक आहे असे आपण म्हणतो त्यावेळी आपला अर्थ हा असतो की त्याचे चारित्र्य कधीच बदलू शकत नाही. साम्राज्यवादी त्यांचा विनाश होईपर्यंत ना शस्त्र खाली ठेवणार आहेत, ना स्वत:हून बौद्ध बनणार आहेत.''

पहिल्या महायुद्धाच्या विभीषिकेला शंभर वर्ष पूर्ण होण्याच्या समयी पुन्हा एकवार स्वत:ला स्मरण करून देण्याची गरज आहे की भांडवलशाही नावाच्या नफेखोर आणि नासलेल्या नरभक्षी व्यवस्थेने नफ्यासाठी कित्येक लोकांचे नरबळी दिलेले आहेत आणि आजही सतत देत आहे. पॅलेस्टाइनपासून इराक, सिरिया, लेबेनॉन, युक्रेन, आफ्रिकेच्या तमाम देशांमध्ये हजारो निर्दोष नागरिकांचे बळी कशासाठी दिले जात आहेत? केवळ साम्राज्यवादी धनपशुंचा नफा टिकवून ठेवण्यासाठी. साम्राज्यवादी भांडवलशाहीचा एक एक दिवस आपल्यासाठी जड जात आहे. त्याला फार पूर्वीच इतिहासाच्या कचरापेटीत फेकून दिले पाहिजे होते. आजसुद्धा जर आपण हे समजून घेतले नाही आणि लुटारू निजामांना समूळ नष्ट करण्यासाठी एकजूट झालो नाही तर उद्या फार उशीर झालेला असेल.



आपल्यासमोर जे मार्ग आहे त्याचा बराचसा भाग मागे पडला आहे, काही आपल्यासमोर आहे आणि बराचसा पुढे जाणारा आहे. गेल्याकडून आपण मदत घेऊ शकतो, आत्मविश्वास प्राप्त करू शकतो, परंतु फिरून पुन्हा गेल्या गोष्टींकडे जाणे म्हणजे प्रगती नाही, प्रतिगती आहे, मागे जाणे आहे. आपण मागे जाऊ शकत नाही कारण निसर्गाने भूतकाळाला वर्तमान बनवणे आपल्या हाती दिलेले नाही. मग आज या क्षणी आपल्या समोर जो काही कर्मपथ आहे, जर आपण केवळ त्याला चिकटून राहिलो तर ती प्रतिगती नाही, परंतु ती प्रगतीसुद्धा नाही, ती असेल सहगती – कसेबसे चालणे, आणि ती काही जीवनाची खूण नाही. लाटांच्या थप्पडांमुळे वाहणाऱ्या सुक्या लाकडामध्ये जीवन आहे असे काही म्हणता येणार नाही. एक मनुष्य म्हणून, चैतन्यपूर्ण समाज म्हणून हे आपले कर्तव्य आहे की आपण सुक्या लाकडासारखे वाहत जाण्याचा विचार सोडून द्यावा आणि आपला भूतकाळ आणि वर्तमानकाळाकडे पाहून भविष्याचा मार्ग प्रशस्त करावा जेणेकरून आपल्या येणाऱ्या पिढ्यांचा मार्ग अधिक सुगम होईल व त्यांचे शाप नव्हेत तर त्यांचे आशिर्वाद आपल्या वाट्याला येतील.

**राहुल सांकृत्यायन ( ९ एप्रिल १८९३–१४ एप्रिल १९६३ )**

# शहीदे-आजम भगतसिंहांच्या संदेशाचे स्मरण करा
# सांप्रदायिक फासीवाद्यांचे जनतेत फूट पाडण्याचे प्रयत्न हाणून पाडा
# जनतेची झुंजार एकता निर्माण करा

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय जनतेला लुटणे सुलभ व्हावे या हेतूने, तसेच लोकांचा प्रतिरोध कमकुवत बनवण्यासाठी इंग्रजांनी मोठ्या प्रमाणात दंगे घडवून आणले, लोकांमध्ये सांप्रदायिक तत्त्वावर फूट पाडली, हिंदू तसेच मुसलमान कट्टरपंथी संघटनांना खतपाणी घातले. शहीद भगतसिंहांसारख्या अनेक क्रांतिकारकांनी इंग्रजांची ही चाल ओळखली होती, व म्हणूनच ते लोकांमध्ये वर्गएकता मजबूत बनविण्यासाठी कार्यरत होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हे सारे संपून जाईल अशी आशा लोकांना वाटत होती, कारण त्यांना ठाऊक नव्हते की नफाखोर व्यवस्थेत जनतेची लूट सुरू ठेवण्यासाठी शासक वर्गाच्या हातात जात, धर्म, क्षेत्र, भाषा इत्यादींच्या पायावर फोडणे हे सर्वात प्रभावी शस्त्र असते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर संघ परिवार व त्याच्या आनुषंगिक संघटनांनी हजारो लहानमोठे दंगे करवले, देशातील जनतेतील धार्मिक वैमनस्य पूर्वीपेक्षा कितीतरी जास्त वाढवले. निवडणुकांच्या रंगामध्ये रंगलेल्या पक्षांनी – प्रामुख्याने काँग्रेसने – संघाच्या दंग्यांना अप्रत्यक्ष प्रोत्साहनच दिले कारण त्यामुळे त्यांची वोट बँक बळकट होत होती. याशिवाय काँग्रेसनेसुद्धा १९८४ च्या शीख दंग्यांसारखे दंगे घडवून आणले. जेव्हा जेव्हा देशात महागाई, बेरोजगारी वाढते तेव्हा दंग्यांना ऊत येतो. अशा परिस्थितीत हा प्रश्न साहजिकच समोर येतो की देशातील जनतेसमोर हे नरसंहार संपविण्याचा कोणता मार्ग आहे. मार्ग एकच आहे, आणि तो म्हणजे लोकांनी जाती, धर्म, क्षेत्र यांच्याऐवजी वर्गीय पायावर एकजूट व्हावे.

हेच कार्य साध्य करण्यासाठी नौजवान भारत सभा, बिगुल मजदूर दस्ता, युनिव्हर्सिटी कम्युनिटी फॉर डेमोक्रेसी एण्ड इक्वालिटी, दिशा छात्र संगठन, स्त्री मुक्ती लीग मिळून देशभर सांप्रदायिक फासीवाद विरोधी व्यापक जनएकजूट अभियान चालवीत आहेत. या अभियानांतर्गत वितरित करण्यात येणाऱ्या पत्रकाचे महत्त्व ओळखून आम्ही तो जशाच्या तसा येथे प्रकाशित करीत आहोत. जर आपणसुद्धा या अभियानामध्ये सहभागी होऊ इच्छित असाल तर पत्रकाच्या शेवटी दिलेल्या क्रमांकांवर संपर्क साधून देशातीन जनतेमध्ये फूट पाडण्याचे शासकवर्गाचे प्रयत्न हाणून पाडण्यात आपले योगदान देऊ शकता.

**संपादक**

मित्रहो,

देशात पुन्हा एकदा जनतेमध्ये धर्माच्या नावाखाली फूट पाडण्याचे कारस्थान रचले जात आहे. देशभरात धार्मिक कट्टरतेच्या आगीला हवा दिली जात आहे. लोक महागाई, बेरोजगारी आणि गरीबीने ग्रासलेले असताना त्यांना 'रामजादे' आणि 'हरामजादे' यांच्यामध्ये विभागण्यात येते आहे. **जेव्हा जनता दरवाढ, बेकारी आणि दारिद्र्याने हैराण असते त्याच वेळी अचानक 'लव जिहाद', 'घरवापसी' आणि 'हिंदू राष्ट्र निर्माणा'चे पिल्लू कां सोडले जाते, यावर आपण कधी विचार केला आहे? निवडणुका जवळ येतात त्याच वेळी दंगे कां भडकतात? जनता महागाई आणि भ्रष्टाचारामुळे हैराण झालेली असते त्याच वेळी सांप्रदायिक तणाव कां भडकतो? हा केवळ योगायोग आहे का? ज्यामध्ये तोगडिया, ओवेसी, सिंघल किंवा योगी आदित्यनाथ यांच्यासारखे लोक मारले गेले आहेत, असा स्वातंत्र्यानंतरच्या काळातील एक तरी दंगा आपल्याला आठवतो का? दंग्यांमध्ये कधी कुठल्या कट्टर नेत्याचे घर जळाले आहे का?** नाही! दंग्यांमध्ये नेहमीच तुमच्या–आमच्यासारखे लोकच मारले जातात, बेघर होतात, अनाथ होतात. होय! आपल्यासारखेच लोक जे आपल्या मुलाबाळांना एक चांगले जीवन देण्यासाठी काबाडकष्ट करीत असतात. ज्यांच्या ताटांमधून एक एक करून भाजी, डाळ गायब होते आहे. ज्यांची तरुण मुले रस्त्यांवर बेरोजगार फिरत आहेत. ज्यांचे भविष्य अधिकाधिक अनिश्चित होते आहे, जे सतत बरबादीच्या दरीत कोसळत आहेत. जेव्हा आपला संयम तुटायची वेळ येते त्याच वेळी मंदिर आणि मशिदीचा मुद्दा उचलला जातो. देशातील धनिकांच्या, अमीरजाद्यांच्या आणि दैत्याकार कंपन्यांच्या पैशांवर चालणारे तमाम राजकीय पक्ष त्याच वेळी धार्मिक कट्टरता भडकवतात. हिंदूंना मुसलमानांचे आणि मुसलमानांना हिंदूंचे शत्रू बनवले जाते आणि आपापसात लढविले जाते. आणि आपण लढतो, हा आपला मूर्खपणा आहे. दंगे होतात, सामान्य माणसं मरतात, आणि सामान्य लोकांच्या चितांवर देशातील अमीरजादे व त्यांचे पक्ष आपल्या पोळ्या भाजून घेतात.




## कोणाचे ''अच्छे दिन'' आणि कोणाचा ''विकास''?

नरेंद्र मोदींच्या नेतृत्त्वाखाली भाजपचे एनडीए सरकार सत्तेत येण्याअगोदर देशातील जनतेला तऱ्हेतऱ्हेची स्वप्ने दाखविण्यात आली. महागाई आणि बेरोजगारी संपविली जाईल, पेट्रोल डिझेलपासून घरगुती गॅसचे दर कमी केले जातील, रेल्वेचे भाडे वाढविले जाणार नाही, भ्रष्टाचाराला पायबंद घातला जाईल आणि स्विस बँकेमधून काळा पैसा आणला जाईल म्हणून दावा करण्यात आला. ''अच्छे दिन'' आयेंगे! **परंतु सरकार बनल्यानंतर सात महिन्यांच्या आत सामान्य कष्टकरी जनतेला कळून चुकले आहे की ''चांगले दिवस'' कुणाचे आले आहेत!** घरगुती गॅसचे दर वाढवण्यात आले, रेल्वेचे भाडे वाढवण्यात आले, श्रमकायद्यांद्वारे कामगारांना मिळणारी सुरक्षा काढून घेण्यात आली, पब्लिक सेक्टरमधील नफा कमविणाऱ्या तमाम कंपन्यांचे खाजगीकरण केले जाते आहे. याचाच अर्थ सरकारी कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात कपात. ठेका पद्धतीला 'अप्रेंटिस'सारख्या गोंडस नावांखाली उत्तेजन दिले जाते आहे, नवीन भरती कुठेच होत नाहीये, आणि जर कुठे होत असेल तर स्थायी कर्मचारी म्हणून नाही तर ठेक्यावर. पेट्रोलियम उत्पादनांचे आंतरराष्ट्रीय दर इतके घसरले आहेत की सरकार पेट्रोल ४० रुपये लिटर दराने विकू शकते, परंतु मोदी सरकारने वेगवेगळे कर आणि शुल्क वाढविले आहे आणि त्यामुळे दरांमध्ये विशेष फरक पडलेला नाही. स्विस बँकेमध्ये काळा पैसा बाळगणाऱ्या भ्रष्टाचाऱ्यांची नावे वेगवेगळी कारणे देऊन गुप्त ठेवली जात आहेत. महागाई कमी होणे तर दूरच राहिले, उलट किरकोळ विक्रीच्या पातळीवर खाण्यापिण्याच्या जिन्नसांबरोबरच प्रत्येक आवश्यक वस्तू पूर्वीपेक्षा महाग झाली आहे. रुपयाला मजबूत करणे दूरच राहिले, उलट रुपयाच्या मूल्यामध्ये विक्रमी घसरण केली जात आहे ज्यामुळे महागाई आणखी वाढते आहे. केंद्रात सत्तेत येताच मोदी सरकारच्या मंत्र्यांनी भ्रष्टाचार आणि गुंडगिरीचे पूर्वीचे रेकॉर्ड तोडायला सुरुवात केली आहे. बलात्काराचे आरोप असलेले नेता-मंत्री मोदी सरकारमध्ये बसलेले आहेत.

> **''आपल्या देशात काही ठरावीक लोक आपल्या स्वार्थासाठी लोकांना धर्माच्या नावाखाली एकमेकांशी लढवतात. धर्म आणि ईमानाच्या नावाखाली होणारे हे भीषण धंदे रोखण्यासाठी साहस आणि दृढतेनिशी झटले पाहिजे!''**
>
> **गणेश शंकर विद्यार्थी ( सांप्रदायिक उन्मादाविरोधातील लढ्यात हौतात्म्य पत्करलेले क्रांतिकारक )**

**दुसरीकडे, अंबानी, अदानी, बिर्ला, टाटा यांच्यासारख्या देशातील सर्वांत मोठ्या धनिकांवर मोदी सरकार जणू बक्षिसांची खैरात करीत आहे.** त्यांना वेगवेगळ्या करांतून सूट दिली जाते आहे, जवळजवळ मोफत वीज, पाणी, जमीन दिली जाते आहे, व्याजरहित कर्ज दिले जाते आहे, श्रमकायद्यांतून सूट दिली जाते आहे, देशाची नैसर्गिक संपदा नाममात्र किंमतीत त्यांना सोपविली जाते आहे. ही संपदा खरे पाहता देशातील जनतेची सामूहिक संपत्ती आहे! खाजगीकरण करून तुमच्या आमच्या पैशांतून उभारलेले सार्वजनिक उपक्रम कवडीमोल किंमतीत या नफेखोरांना विकले जात आहेत. 'स्वदेशी', 'देशभक्ती', 'राष्ट्रभक्ती'चा ढोल बडवत सत्तेत आलेल्या मोदींनी सरकार बनताच विमा, संरक्षण यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांसह तमाम क्षेत्रांमध्ये थेट परकीय गुंतवणुकीला परवानगी दिली आहे. हेच भाजपवाले मनमोहनसिंह सरकारद्वारे करण्यात येणाऱ्या थेट परकीय गुंतवणुकीला विरोध करीत होते, हे तुम्हांला आठवतं का? मोदी सरकार बनल्यापासून गुजरातसह देशाच्या विविध भागांमध्ये गुंतवणूक संमेलनांमध्ये मोदी आणि भाजपच्या अन्य नेत्यांनी देशातील निसर्गाला आणि जनतेला लुटण्यासाठी देशी विदेशी कंपन्यांना खुली सूट दिली आणि त्याला 'मेक इन इंडिया' अभियानाचे नाव दिले आहे! याचा अर्थ आहे, ''या, जगभरातील मालकांनो, भांडवलदारांनो आणि व्यापाऱ्यांनो, या! आमच्या देशातील स्वस्त श्रम आणि नैसर्गिक संसाधने मनमुराद लुटा!'' अमेरिकेत जाऊन नरेंद्र मोदींनी तेथील औषध कंपन्यांसोबत एक करार केला ज्याच्यामुळे कित्येक जीवनरक्षक औषधे कित्येक पट महाग झाली आहेत व सामान्य माणसाच्या आवाक्याच्या बाहेर गेली आहेत. तमाम कंपन्यांना आता पूर्ण सूट देण्यात आली आहे की ते कामगार व कर्मचाऱ्यांकडून हवा तसा

**इस बार**
**दंगा बहुत बडा था**
**खूब हुई थी**
**खून की बारिश**
**अगले साल अच्छी होगी**
**फसल मतदान की!**
**-गोरख पाण्डेय**

ओव्हरटाईम करून घेऊ शकतात. देशातील वरच्या १५ टक्के श्रीमंतांना सगळ्या सुविधा दिल्या जात आहेत, टॅक्समध्ये सूट आणि सवलती दिल्या जात आहेत. त्यांच्यासाठी चकचकीत शॉपिंग मॉल, मल्टीप्लेक्स, अम्युजमेंट पार्क! आणि देशातील ८५ टक्के सामान्य माणसाला सांगितले जात आहे की त्यांना ''विकासा''साठी फॅक्टरी, दुकाने, हॉटेल आणि कचेऱ्यांमध्ये झिजावे लागेल. **आता देशातील श्रीमंतांच्या विकासासाठी कष्टकरी जनतेलाच किंमत मोजावी लागेल. त्यांनाच पोटाला चिमटा देऊन ''हिंदू राष्ट्र'' निर्माण करावे लागेल. आणि जर कोणी अमीरजाद्यांच्या ''चांगल्या दिवसां''बद्दल प्रश्न उपस्थित करील तर त्याला राष्ट्रद्रोही आणि देशद्रोही ठरवले जाईल!**

## सांप्रदायिक तणावामुळे कोणाला लाभ होतो?

श्रीमंतांच्या ''चांगल्या दिवसां''ची किंमत सामान्य लोकांच्या खिशातूनच वसूल केली जाते आहे हे उघड आहे. परंतु सामान्य लोक ''अच्छे दिन''चे वास्तव समजू लागले आहेत आणि त्यांच्यामध्ये नाराजी आणि चीड वाढते आहे. **म्हणूनच मोदी सरकार आपल्या लोकविरोधी पाउलांबरोबरच आणखी दोन चाली खेळते आहे.** एकीकडे 'स्वच्छता अभियान', तिर्थस्थळांसाठी रेल्वेगाड्या यांसारख्या योजना राबविल्या जात आहेत जेणेकरून लोकांचे लक्ष खऱ्या मुद्द्यांपासून विचलित करून स्वस्तातली लोकप्रियता मिळवली जाऊ शकते. त्याचवेळी दुसरीकडे देशभरात सांप्रदायिक तणाव भडकवला जात आहे. अगोदर '**लव जिहाद**'चा गोंधळ घालण्यात आला, जो खोटा सिद्ध झाला, त्यानंतर '**घरवापसी**'च्या नावावर तणाव निर्माण केला जात आहे, '**रामजादे हरामजादे**'सारखी वक्तव्ये केली जात आहेत. भगवे ब्रिगेड मोदी सरकार म्हणजे ८०० वर्षांनंतरचे 'हिंदू राज्य' असल्याचे सांगत आहे, काही वर्षांतच उभा भारत देश हिंदू बनविण्याच्या घोषणा केल्या जात आहेत, हिंदू महिलांना चार चार मुले जन्माला घालण्यास सांगितले जात आहे. **भगव्या ब्रिगेडच्या हिंदुत्त्ववादी सांप्रदायिकतेबरोबरच ओवेसीसारखे इस्लामी कट्टरपंथी नेतेसुद्धा सांप्रदायिक उन्माद भडकवित आहेत. सांप्रदायिक वातावरणाचा आणि दंग्यांचा लाभ निवडणुकांमध्ये हिंदुत्त्ववादी कट्टरपंथियांना मिळणार आहे, आणि ओवेसीसारख्या इस्लामी कट्टरपंथियांनासुद्धा मिळणार आहे.** त्याचप्रमाणे कॉंग्रेस, सीपीआई, सीपीएम, सपा, बसपा, आप, राजद, जद (यु) यांसारख्या तथाकथित सेक्युलर पक्षांनासुद्धा मतांच्या धृवीकरणाचा लाभ मिळणार आहे. आणि या तणावाच्या वातावरणात कोणाच्या जिविताची आणि मालमत्तेची हानी होणार आहे? सामान्य कष्टकरी जनतेच्या, मग ते हिंदू असोत वा मुसलमान.

**''लोकांना आपापसात लढण्यापासून रोखण्यासाठी वर्गचेतनेची आवश्यकता आहे. गरीब कष्टकरी आणि शेतकऱ्यांना समजावून सांगितले पाहिजे की तुमचे खरे शत्रू भांडवलदार आहेत, म्हणूनच तुम्ही त्यांच्या डावपेचांपासून सावध राहिले पाहिजे, व त्यांच्या नादी लागून काहीबाही करता कामा नये. जगातील सर्व गोरगरिबांचे, मग ते कोणत्याही जातीचे, वर्णाचे, धर्माचे वा राष्ट्राचे असोत, अधिकार सारखे आहेत. धर्म, वर्ण, वंश आणि राष्ट्रियतेचे भेदभाव संपवून तुम्ही एकजूट व्हावे आणि सरकारची शक्ती आपल्या हाती घेण्यासाठी प्रयत्न करावेत, यातच तुमचे भले आहे.''**

**शहीदे आजम भगत सिंह ('सांप्रदायिक दंगे और उनका इलाज' या लेखामधून)**

**मित्रांनो, जरा विचार करा!** ६७ वर्षांच्या स्वातंत्र्याच्या इतिहासात ज्यावेळी देशात आर्थिक संकट, महागाई, बेरोजगारी, भूकबळी आणि गरीबी वाढली त्याच वेळी दंगे कां भडकले? सांप्रदायिक शक्ती नेहमी तेव्हाच कां सक्रिय होतात ज्यावेळी देशातील जनतेमध्ये व्यवस्थेच्या विरोधात चीड निर्माण होते? नेहमी मंदिर आणि मशिदीचा आणि धर्मांतरणाचा मुद्दा तेव्हाच कां वर काढला जातो ज्यावेळी देशात एक राजकीय संकट निर्माण होते आणि व्यवस्था धोक्यात येते? **मित्रांनो, जरा विचार करा!** ६७ वर्षांमध्ये झालेल्या दंग्यांतून कधी आपल्याला काही मिळाले आहे का? गरीब कष्टकरी जनतेसाठी मंदिर मशिद बनणे वा न बनणे हा खरा मुद्दा आहे की महागाई, गरीबी आणि बेरोजगारीचा मुद्दा महत्त्वाचा आहे? **मित्रांनो, आपण किती काळ या निवडणुकांतील मदाऱ्यांना आपल्याला धर्म आणि जातीच्या नावाने गंडवण्याची संधी देत राहणार?**

सत्य हे आहे की ना हिंदू कट्टरपंथियांना सामान्य गरीब कष्टकरी हिंदूंच्या भल्याशी काही देणेघेणे आहे, ना मुसलमान कट्टरपंथियांना सामान्य गरीब कष्टकरी मुसलमानांच्या भल्याशी काही देणेघेणे आहे. हर तऱ्हेचे धार्मिक कट्टरपंथी वास्तविक टाटा, बिर्ला, अंबानी, अदानी, बिर्ला सारख्यांच्या तुकड्यांवर जगताहेत आणि त्यांचीच सेवा करीत आहेत! **हे सगळे भांडवलदार एकीकडे भाजपाला कोट्यावधी रुपयांची देणगी निवडणुकीसाठी देतात आणि दुसरीकडे कॉंग्रेस व**



**इतर पक्षांनासुद्धा कोट्यावधी रुपयांची देणगी देतात, हा केवळ योगायोग आहे का? म्हणच आहे, ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी!** निवडणुकांचे राजकारण करणाऱ्या या पक्षांकडून कोणतीही अपेक्षा करणे फोल आहे. जगभरातील सत्ताधारी वर्ग आज जनतेमध्ये धार्मिक उन्माद पसरविण्याचा भयंकर खेळ खेळत आहे कारण ते संकटात सापडले आहेत आणि जनतेला बेरोजगारी, गरिबी, दारिद्र्य याशिवाय आणखी काहीही देऊ शकत नाहीत. म्हणूनच, सामान्य जनता त्यांच्याविरोधात विद्रोहाचा बिगुल फुंकेल अशी त्यांना भीती वाटते, म्हणूनच ते जनतेमध्ये धार्मिक कट्टरता पसरवून तिला तुकड्यातुकड्यांमध्ये विभागण्याचे काम करतात. जनतेला याचे किती भयंकर मोल चुकवावे लागते हे अलीकडेच आपण पेशावरमध्ये झालेल्या निरागस शाळकरी मुलांच्या हत्याकांडाच्या घटनेवरून पाहिले, त्याअगोदर २००२चे गुजरात दंगे आणि १९८४ च्या सिखविरोधी दंग्यांमध्ये पाहिले, १९९२-९३ च्या देशव्यापी दंग्यांमध्ये पाहिले. **इतक्या वेळा फसवणुकीला बळी पडल्यानंतर आपण पुन्हा एकदा धार्मिक कट्टरपंथियांना आपल्याला मूर्ख बनविण्याची संधी द्यायची का? आपण त्यांना पुन्हा एकदा देशाला धार्मिक दंग्यांच्या आगीत लोटण्याची परवानगी द्यायची का? हा प्रश्न आज देशातील तमाम न्यायप्रिय, समजदार तरुण, नागरिक आणि कष्टकऱ्यांच्या समोर उभा आहे.**

**शहीदे आजम भगतसिंहांचा संदेश : झुंजार जनएकजूट निर्माण करा! खऱ्या स्वातंत्र्याच्या लढ्याची तयारी करा!**

**महान क्रांतिकारी शहिदे आजम भगतसिंह यांनी म्हटले होते की सामान्य गरीब कष्टकरी जनतेचा एकच धर्म असतो - वर्गीय एकजूट!** आपल्याला सर्व प्रकारच्या धार्मिक कट्टरपंथियांना नाकारावे लागेल आणि त्यांच्या विरोधात लढावे लागेल. आपल्याला शपथ घ्यावी लागेल की आपण आपल्या गल्लीबोळात, मोहल्ल्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या धार्मिक कट्टरपंथियांना सांप्रदायिक उन्माद भडकवू देणार नाही आणि त्यांना पिटाळून लावू! आपल्याला मागणी करावी लागेल की केंद्र सरकार आणि सर्व राज्य सरकारांनी धर्माला राजकारण आणि सामाजिक जीवनापासून वेगळे करण्यासाठी कडक कायदा बनवावा. **धर्म भारतीयांची खाजगी बाब असली पाहिजे** व कोणत्याही पक्ष, दल, संघटना किंवा नेत्याला धर्म किंवा धार्मिक संप्रदायाच्या नावाखाली राजकारण केल्यास, वक्तव्ये केल्यास व उन्माद भडकविण्याचा प्रयत्न केल्यास कडक शिक्षा दिली गेली पाहिजे व त्यांच्यावर प्रतिबंध घालण्यात आला पाहिजे. आपण अशी व्यवस्था निर्माण करण्यासाठी संघर्ष केला पाहिजे जिची कल्पना भगतसिंह आणि त्यांच्या क्रांतिकारी साथीदारांनी केली होती : **एक अशी व्यवस्था जिच्यामध्ये उत्पादन, सत्ता आणि सामाजाच्या संरचनेवर उत्पादन करणाऱ्या वर्गाचा हक्क असेल आणि निर्णय घेण्याचा अधिकार त्यांच्याच हाती असेल. तेथे जात वा धर्माच्या नावाखाली विभाजन असणार नाही. तिथे माणसाकडून माणसाची लूट अशक्य असेल. तिथे सारे उत्पादन समाजातील लोकांच्या आवश्यकतेसाठी असेल, मूठभर लुटारूंच्या नफ्यासाठी नाही.** अशी व्यवस्थाच आपल्याला एकीकडे भूक, गरिबी, बेरोजगारी, महागाई, भूकबळी यांच्यापासून मुक्ती देऊ शकते आणि दुसरीकडे धार्मिक उन्माद, सांप्रदायिकता आणि दंग्यांपासूनही मुक्ती देऊ शकते. एका अशा व्यवस्थेतच आपण निश्चिंतता आणि स्वाभिमानाचे जीवन जगू शकतो. **जर आपण याच वेळी ही बाब समजून घेतली नाही तर येत्या काळात देश तुकड्या तुकड्यांमध्ये फुटून जाईल व दंग्यांच्या व जातियतेच्या आगीत होरपळून जाईल.**

# जाति धर्माचे झगडे सोडा, खऱ्या लढ्याशी नाते जोडा!

# सांप्रदायिक फासीवादाला प्रत्युत्तर - 'इंकलाब जिंदाबाद'!

## ● नौजवान भारत सभा

## ● यूनीव्हर्सिटी कम्युनिटी फॉर डेमॉक्रेसी एण्ड इक्वॉलिटी

## ● बिगुल मजदूर दस्ता

संपर्क : विराट ९६१९०३९७९३, नारायण ९७६९९०३५८९ ई-मेल : ucde.mu@gmail.com
फेसबुक पेज : www.facebook.com/naujavanbharatsabha
or www.facebook.com/ucdemu

## सिनेमा

# ‘गांधी’कार रिचर्ड अँटनबरो यांना खुले पत्र

• अभिजीत

**आदरणीय महाशय,**

आपल्या मृत्यूनंतर जगभरातून आपल्याला श्रद्धांजली वाहण्यात आली. ज्या भारत देशात आपण आपला महाकाव्यात्मक ‘गांधी’ चित्रपट बनविला त्या भारततही सिनेरसिकांनीच नव्हे तर लेखक, कलावंत, राजकारणी, समाजकारणी तसेच जनसामान्यांनीदेखील आपल्याला श्रद्धांजली वाहिली. आपल्याबद्दल आणि आपल्या जगप्रसिद्ध गांधी चित्रपटाबद्दल येथील वर्तमानपत्रांमधून भरभरून लिहिले गेले. ‘‘८० नंतरच्या पिढीला महात्मा गांधी समजावण्याचे ऐतिहासिक कार्य कोणी केले असेल तर ते तुमच्या गांधी या चित्रपटाने’’, हे या लिखाणातूनच समजले. त्यामुळे आपला गांधी पुन्हा एकदा पाहावा, समजून घ्यावा असे वाटणे साहजिकच होते, आणि तसा तो पाहताना, चित्रपटाच्या ‘‘भव्यते’’ने, त्यात सहभागी मोठमोठ्या कलावंतांची नावे पाहून दबून जाताना अवचित काही प्रश्न मनात आले. ते या पत्राद्वारे आपल्याला विचारावे, म्हणून हा पत्रप्रपंच. या प्रश्नांची उत्तरे आता आपण कधीच देऊ शकणार नाही हे खरेच, परंतु निरपेक्ष भावनेने प्रश्न विचारणे हेदेखील गांधीवादाला धरूनच असल्यामुळे, तसे करीत आहे.

गांधी हे आधुनिक भारतातील एक निर्विवाद महानायक. वेगवेगळ्या प्रसंगी त्यांनी घेतलेल्या निर्णयांबद्दल तसेच एकंदर गांधीवादाबद्दल कितीही मतभेद बाळगणाऱ्या माणसालादेखील गांधी हे महानायक होते हे अमान्य करता येणार नाही. आणि त्यामुळे गांधींसारख्या ऐतिहासिक महानायकाच्या जीवनावर आधारित चित्रपटाला ‘एपिक फिल्म’ (महाकाव्यात्मक चित्रपट) म्हणणेदेखील योग्यच. परंतु नायकत्व हे विशिष्ट सामाजिक राजकीय संदर्भात सिद्ध होते. कोणतीही व्यक्ती नायकत्वास प्राप्त होते ती विशिष्ट काळातील सामाजिक-राजकीय-आर्थिक संदर्भांत. हे संदर्भ वेगळे केले तर मग महात्मा गांधी काय किंवा राहुल गांधी काय, फारसा काही फरक राहत नाही. महाकाव्याचेही तसेच. व्यक्तीची कविता होऊ शकेल, महाकाव्य समाजाचे असते. समग्र समाजाची स्पंदनं एकवटून महाकाव्याचा जन्म होतो. म्हणूनच गांधींच्या जीवनावरील महाकाव्यात्मक चित्रपट म्हणजे अर्थातच आधुनिक भारतीय समाजाचे महाकाव्य असावयास हवे, येथील समाजाच्या क्रियाप्रक्रिया निर्धारित करणाऱ्या घटकांचे, जाणीवांचे ते प्रातिनिधिक चित्र असावयास हवे, असे मानणे वावगे ठरणार नाही. आपल्या चित्रपटाला महाकाव्याचा दर्जा अनेक थोरामोठ्यांनी बहाल केलेला आहे, त्यामुळे उपरोक्त बाबी गांधी चित्रपटात नक्कीच असतील या अपेक्षेने चित्रपट पाहावयास बसलो.

आपल्या चित्रपटात आपण १८९३ ते १९४८ पर्यंतचा प्रवास आहे, महात्मा गांधींचा, आणि ज्या भारताच्या संदर्भात मोहनदास करमचंद गांधी महात्मा गांधी या महानायकपदापर्यंत पोहोचले त्या भारताचा. या काळात भारतात विलक्षण घडामोडी घडत होत्या, खरोखरच या काळामध्ये महाकाव्याच्या निर्मितीसाठी आवश्यक असे भरपूर काही आहे. परंतु आपल्या चित्रपटात त्यापैकी किती गोष्टी आल्या आहेत? येथील जातिव्यवस्था हा या समाजाचा आणि आपल्या चित्रपटातील काळातील समाजाचा एक अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. या जातिव्यवस्थेच्या संदर्भातच आणखी एक महानायक येथे निर्माण झाला — डॉ. बाबासाहेब आंबेडकर. डॉ. आंबेडकरांशी महात्मा गांधींचे असलेले मतभेद हा भारतीय राजकारणाचा एक अत्यंत महत्त्वाचा अध्याय आहे आणि त्याची भारतीय राजकारणाला विशिष्ट दिशा देण्यात महत्त्वाची भूमिका आहे. परंतु असे असूनही या चित्रपटात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा नामोल्लेखदेखील येऊ नये, याला काय म्हणावे? ज्या गोलमेज परिषदेत डॉ. आंबेडकरांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघांची मागणी केली त्या गोलमेज परिषदेचा उल्लेख आपल्या चित्रपटात येतो, त्या परिषदेला गेले असता महात्मा गांधी राजघराण्यातील कोणाकोणाला भेटले हेदेखील आपण वॉइसओव्हरमधून सांगता, परंतु डॉ. आंबेडकरांचा उल्लेखसुद्धा आपण करीत नाही! आपण गांधींनी वेगवेगळ्या प्रसंगी केलेली उपोषणे दाखविली आहेत. असेच एक उपोषण महात्मा गांधींनी डॉ. आंबेडकरांनी केलेल्या स्वतंत्र मतदारसंघाच्या मागणीच्या विरोधात केले होते, आणि शेवटी डॉ. आंबेडकरांना नाईलाजाने आपली मागणी मागे घ्यावी लागली, हा सर्वज्ञात इतिहास आहे. परंतु महात्मा गांधींचे नेमके हेच उपोषणसुद्धा आपल्या चित्रपटात ‘‘राहून गेले’’ आहे. त्याचप्रमाणे महात्मा गांधींच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानाला विरोधी असे एक सशस्त्र क्रांतीचे तत्त्वज्ञानही भारतात अस्तित्वात होते. महात्मा गांधींचा सत्याग्रहाचा मार्ग आणि क्रांतिकारकांचा सशस्त्र क्रांतीचा मार्ग यांमधील संघर्ष हादेखील भारतीय समाजाच्या इतिहासाचा एक अविभाज्य भाग आहे. १९३१ साली भगतसिंह, राजगुरू आणि सुखदेव फाशी गेले त्यावेळी महात्मा गांधींच्या भूमिकेला देशभरात मोठ्या प्रमाणात विरोध होत होता आणि या क्रांतिकारकांचे हौतात्म्य काही साधीसुधी घटना नाही, तर तिच्या राजकीय संदर्भांमुळे ती नितांत महत्त्वाची ऐतिहासिक घटना आहे. असे असूनही भगतसिंहांसारख्या क्रांतिकारकाचा व त्यांच्या हौतात्म्याचा आपल्या चित्रपटात नामोल्लेखदेखील नाही, याला काय म्हणावे? जातिव्यवस्थेच्या प्रश्नावर आपण महात्मा गांधींच्या बाजूचे आहात की आंबेडकरांच्या, आपण सत्याग्रहाचा मार्ग योग्य समजता की सशस्त्र कांतीचा हा प्रत्येकाचा व्यक्तिगत निर्णय आहे, परंतु जातिव्यवस्था आणि तिच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगतसिहांसारख्या क्रांतिकारकांचा

सशस्त्र लढा यांना वगळून आधुनिक भारताचे महाकाव्य लिहिले जाऊ शकत नाही, हे निश्चित. कुठल्याही कलावंताला एखादी कलाकृती निर्माण करताना — विशेषत: सत्य घटना आणि व्यक्तींवर आधारित कलाकृती निर्माण करताना– सर्वच्या सर्व तपशील त्यात कोंबता येत नाही, निवडक तपशील घ्यावा लागतो हे खरे, पण आपण केवळ तपशीलच गाळलेला नाही, आपण गाळलेत संदर्भ, अत्यंत महत्त्वाचे असे संदर्भ. ज्यांच्यावाचून मोहनदास करमचंद गांधी यांच्या महानायकत्वाचा विचार होऊच शकत नाही, आणि ज्यांच्यावाचून भारताचे महाकाव्य लिहिले जाऊच शकत नाही, असे संदर्भ आपण सपशेल गाळलेले आहेत. कोणी नथुराम गोडसे नामक व्यक्ती मोहनदास गांधी नामक एका ७८ वर्षाच्या वृद्धावर गोळ्या झाडते ती घटना दररोज कुठे ना कुठे होणाऱ्या खुनापेक्षा वेगळी, एक ऐतिहासिक राजकीय हत्या ठरते कारण गोळी झाडणाऱ्या नथुराम गोडसेशी काही राजकीय सामाजिक संदर्भ जोडलेले असतात, आणि मोहनदास गांधी यांच्याशीदेखील काही राष्ट्रीय संदर्भ जोडलेले असतात. खरे तर आपल्या चित्रपटात ही गांधीहत्यासुद्धा एका आकस्मिक घटनेहून अधिक काहीच वाटत नाही कारण आपल्या चित्रपटात देशातील हिंदुत्त्ववादी राजकारणाचे संदर्भ आलेले नाहीत, अपवाद एका दृश्याचा जेव्हा पार्श्वभागी खाकी हाफ चड्डीतली काही माणसे दिसत आहेत.

आपल्या चित्रपटात जाणवलेली आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे चित्रपटातील ब्रिटिश सत्तेचे चित्रण. महात्मा गांधींवर चित्रपट करायचा तर डॉ. आंबेडकर, हुतात्मा भगत सिंह यांना वगळून करता येऊ शकेल, परंतु ब्रिटिशांना वगळून चित्रपटच होऊ शकणार नाही. त्यामुळे आपल्या चित्रपटातून ब्रिटिशांना वगळण्याचा विचारही केला जाऊ शकत नाही. परंतु ब्रिटिशांचे चित्रण कसे करावयाचे याचा निर्णय मात्र कलाकृती बनविताना कलावंताला घेता येतो. आपल्या गांधी चित्रपटात चित्रपटात साहजिकच वारंवार ब्रिटिश येतात, परंतु ते साम्राज्यवादी ब्रिटिश सत्तेच्या संदर्भांसह येतात का? असा प्रश्न पडतो. हे थोडेसे उदाहरणासह स्पष्ट करून सांगावे लागेल. जालियनवाला बाग हत्याकांडाच्या दृश्यात जनरल डायरसह हातात बंदुका घेऊन भारतीय सैनिकांची फौज दिसते, जी निःशस्त्र भारतीयांवर बेछूट गोळीबर करून शेकडो लोकांचे प्राण घेते. आता येथे वरवर पाहिले तर काही भारतीयांनी गोळ्या घालून काही भारतीयांचे प्राण घेतले असे म्हणावे लागेल. परंतु गोळ्या घालणाऱ्या भारतीय सैनिकांच्या बंदुकांमागे केवळ डायर नावाची एक व्यक्ती नसते तर साम्राज्यवादी ब्रिटिश सत्ता असते. हा सत्तासंदर्भ जर पातळ केला तर अर्थाचा अनर्थ होऊ शकतो. आपल्या चित्रपटात या जालियनवाला बाग हत्याकांडाच्या दृश्यानंतर येणाऱ्या दृश्यात जनरल डायर याची न्यायाधिशांसमोर ट्रायल सुरू असल्याचे दाखविले आहे. दृश्यामध्ये सर्वच न्यायाधीश या भीषण हत्याकांडामुळे सुन्न झालेले दिसतात. त्यांच्यासमोर मग्रूर डायर उभा आहे. डायरने गोळीबार करण्याचा हुकूम कां दिला, हुकूम देण्याआधी त्याने चेतावनी कां दिली नाही, घायाळ लोकांना मदत कां केली नाही अशा प्रकारचे प्रश्न न्यायाधीश विचारतात. मदत मागितली असती तर केली असती असे मुजोरपणाचे उत्तर डायर यावेळी देतो. त्यावर तीन वर्षाचे घायाळ मूल मदत कशी मागणार असा सवाल, हेलावून गेलेले न्यायाधीश करतात. डायर त्यावर काहीच उत्तर देत नाही. येथे दृश्य संपते. न्यायाधीश पुढे काय निवाडा करतात ते दाखविलेले नाही! खरे तर येथे आपण एक चलाखी केलेली आहे, असे म्हणावयास पुरेसा वाव आहे. कारण सारेच न्यायाधीश अगदी सुन्न झालेले दिसून येतात आणि डायरचे कृत्य त्यांना अजिबात पटलेले नाही असे दिसून येते. वास्तवात, डायरवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नव्हती, उलट त्याला बक्षिसी देण्यात आली, असे इतिहास सांगतो. आपण निवाडा होण्याअगोदरच दृश्य संपविले. आपण असत्य दाखविले नाही. पण आपण दृश्य विशिष्ट क्षणी संपवून एक महत्त्वाचे सत्य सांगायचे टाळले, एवढेच नाही तर विशिष्ट पद्धतीने दृश्य संपवून असे काहीतरी सूचित केले जे वास्तवाचा विपार्यास करणारे आहे. आपल्या एकूणच चित्रपटात वारंवार असे होताना दिसून येते आणि मग सगळाच खेळ सद्गुण आणि दुर्गण, चांगला माणूस आणि वाईट माणूस अशा संदर्भशून्य पातळीवर येऊन पोहोचतो. ब्रिटिशांची साम्राज्यवादी सत्ता भारतावर राज्य करीत होती, भारत ही ब्रिटिशांची वसाहत होती याचे आर्थिक, सामाजिक, राजकीय संदर्भ सुस्पष्टपणे दिसून न येता, किंबहुना ते दडपले जाऊन, ब्रिटिश भारतावर राज्य करीत होते, त्यांपैकी काही चांगले होते आणि काही वाईट होते, त्या वाईट ब्रिटिशांविरोधात महात्मा गांधींनी सत्याग्रहाच्या मार्गाने लढा दिला आणि शेवटी चांगल्या ब्रिटिशांना महात्मा गांधींची सत्यावर आधारलेली मागणी मान्य करावी लागली आणि त्यांनी भारतावरची सत्ता सोडून दिली, अशा प्रकारचे काहीसे चित्र निर्माण होते!

मोहनदास करमचंद गांधी यांचा महत्मा गांधी होण्यापर्यंतच्या प्रवासाबद्दल आपण भरपूर अभ्यास केला, त्यांच्या आयुष्यातील अनेक घटना योग्य कालक्रमानुसार आपण लोकांसमोर ठेवल्यात याबद्दल आपण खचितच अभिनंदनास पात्र आहात. परंतु घटनाक्रमाची कालक्रमानुसार मांडणी म्हणजे श्रेष्ठ कला असे म्हणावयाचे झाल्यास माध्यमिक शाळेतील इतिहासाचे पुस्तक, छपाईच्या चुका वगळता, बऱ्यापैकी ''कलात्मक'' असते, असे म्हणावे लागेल. कलाकृतीचा आस्वाद घेताना आपल्याला जे हवे आहे ते त्या कलाकृतीत शोधण्यापैक्षा, तिच्यात काय आहे ते पाहावे, हे मान्य. मात्र समीक्षा करताना ती कलाकृती व्यापक सत्याच्या कितीशी जवळ गेलेली आहे, हे पाहावेच लागेल. त्या अर्थाने आपला चित्रपट फारच एकांगी आणि अतिसुलभीकृत वाटतो. एखाद्या महान व्यक्तीचे मोठेपण दाखवून देणाऱ्या विविध घटनांच्या एकरेषीय मांडणीतून त्याच्या महानायकत्वाचे दर्शन घडत नाही, तसेच विशिष्ट काळातील वेगवेगळ्या घडामोडींच्या संदर्भहीन चित्रणातून महाकाव्य अवतरत नाही. महाकाव्याचे महाकाव्यपण त्यातील ओळींच्या संख्येत नसते तसेच चित्रपटाचे

**( पान १९ वर )**

## जगाच्या पाठीवर

# ‘फॉक्सकॉन’च्या कामगारांचे नारकीय जीवन

• सनी

चीनची फॉक्सकॉन कंपनी ॲप्पलसारख्या कंपन्यांसाठी महाग इलेक्ट्रॉनिक आणि संगणकाचे भाग बनवते. तिच्या कित्येक कारखान्यांमध्ये सुमारे १२ लाख कामगार काम करतात. या कारखान्यांमध्ये ज्या पद्धतीने कामगारांकडून काम करून घेतले जाते, त्यामुळे २०१० ते २०१४ पर्यंत आत्महत्येची २२ प्रकरणे समोर आली आहेत आणि अशा कित्येक घटना दाबून टाकण्यात आल्या आहेत. जगभरात कम्युनिस्ट देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चीनची भांडवलशाही याच्याहून नग्न रूपात स्वत:चे दर्शन घडवू शकत नाही. चीन जगातील सर्वांत मोठा निर्यातदार देश आहे. परंतु बाजारात स्वस्त दरात उपलब्ध असलेला चीनी माल चीनच्या कामगारांचे वास्तव सांगत नाही. परंतु फॉक्सकॉनच्या घटना एकूण चीनची दुर्दशा व्यक्त करीत आहेत. फॉक्सकॉन चीनचा सर्वांत मोठा निर्यातदार आहे. तो आईफोन, आईपॅड, एक्स बॉक्स, प्ले स्टेशन यांसारख्या महागड्या वस्तू बनवतो. दिवसभर कामगारांना एका जागी बसून मोबाईल आणि लॅपटॉपच्या महत्त्वाच्या भागांना असेंबली लाईनवर बारा-बारा तास बनविण्याचे काम करावे लागते. ॲप्पल कंपनी जेव्हा एखादा नवीन आईफोन बाजारात आणते तेव्हा त्याच्या मागणीच्या पूर्ततेसाठी कामगारांकडून आठवडाभरात १२० तासांपेक्षा जास्त काम करून घेतले जाते. हेच काम २४ तास आणि आठवड्याचे सात दिवस चालते. फॅक्टरीमध्ये मॅनेजर, इन्स्ट्रक्टर आणि गार्ड गुंडासारखे वागतात. कामात चूक झाल्यास कामगारांना सर्वांसमोर अपमानित केले जाते. दररोज काम सुरू होण्याअगोदर उत्पादन वाढविण्यासाठी जोरदार भाषणे ठोकली जातात आणि कामाच्या वेळीसुद्धा उत्पादन वाढविण्याचे आवाहन केले जाते. अनुशासन टिकवून ठेवण्याबद्दलचे पोस्टर सर्वत्र दिसून येतात. कामगारांना राहण्यासाठी कंपनीच्या कॅंपसमध्येच जागा दिली जाते. त्यांना तुरुंग म्हटल्यास वावगे ठरू नये. एका खोलीत कित्येक कामगारांना कोंबले जाते. त्यांच्या प्रत्येक कृतीवर सेक्युरिटी कॅमेऱ्याची नजर असते. फॉक्सकॉनच्या तुरुंगवजा वसतिगृहांमध्ये धर्मगुरू, समुपदेशक आणि डॉक्टर यांचा वावर असतो जे कामगारांना हे जीवन जगण्याबद्दल उपदेशामृत पाजण्याचे काम करतात, आणि प्रकरण हाताबाहेर जात असल्याचे जाणवल्यास कामगारांची रवानगी थेट वेड्यांच्या इस्पितळात केली जाते. २०१० मध्ये झालेल्या कामगारांच्या १४ आत्महत्यांमुळे फॉक्सकॉनवर जगभरातून टीका होताच फॉक्सकॉनने कामगारांच्या कामाची परिस्थिती सुधारण्याऐवजी अशी व्यवस्था निर्माण केली की कामगार आत्महत्या करू शकणार नाहीत. स्टीलच्या जाळीने कामगारांचे वसतिगृह घेरण्यात आले आणि खिडक्यांवरसुद्धा स्टीलचे गज बसवण्यात आले आहेत, जेणेकरून कामगार बाहेर उडी घेऊन आत्महत्या करू शकणार नाहीत! कामावर नियुक्त करतानाच कामगारांकडून लेखी करार करून घेतला जातो की ते आत्महत्या करणार नाहीत आणि जर त्यांनी आत्महत्या केली तर त्यासाठी फॉक्सकॉन जबाबदार असणार नाही. २०१४ मध्ये आत्महत्या करणारा फॉक्सकॉनचा कामगार लिझी याने आपले तुटलेपण शब्दांत मांडताना म्हटले होते की ते आपल्या तरुण कब्रस्तानाचा पहारा करीत आहेत. आज प्रत्येक कामगार हेच करीत आहे, परंतु त्याचबरोबर विद्रोहाची भावनादेखील खदखदते आहे आणि आता ती व्यक्तही होऊ लागली आहे. ऑक्टोबर महिन्यात १००० कामगार वेतनवाढ आणि कामाच्या ठिकाणी चांगल्या सुविधांच्या मागणीसाठी संपावर गेले होते. गेल्या काही वर्षांमध्ये फॉक्सकॉनच नाही तर चीनभरात कामगारांच्या संघर्षांना वेग आला आहे. जोपर्यंत तरुण ही नफेखोर व्यवस्थाच थडग्यात गाडून टाकत नाहीत, तोपर्यंत हे संघर्ष सुरूच राहतील.

●

**मजदूरों का इन्क़लाबी मासिक अख़बार**

**मज़दूर बिगुल**

**एक प्रति : 5 रुपये**
**वार्षिक : 70 रुपये**

**महाराष्ट में प्राप्त करने के लिए सम्पर्क करें:**
**नारायण : 9769903589, विराट : 9619039793**

**ईमेल :** bigulakhbar@gmail.com
**वेबसाइट :** http://mazdoorbigul.net
**फेसबुक पेज :** https://facebook.com/mazdoorbigul

साहित्य

# एका कामगाराच्या कविता

या कविता चीनमधील फॉक्सकॉन कंपनीमध्ये काम करणाऱ्या एका स्थलांतरित कामगार जू लिझीने लिहिल्या आहेत. लिझीने ३० सप्टेंबर २०१४ रोजी आत्महत्या केली. परंतु लिझीचा मृत्यू म्हणजे आत्महत्या नव्हती तर एका तरुणापासून त्याची स्वप्ने आणि इच्छाशक्ती हिसकावून या नफेखोर व्यवस्थेने त्याचा जीव घेतला. लिझीच्या कवितेतील एक एक शब्द टाहो फोडून याचा पुरावा देत आहे. ही नफेखोर व्यवस्था माणसावर लादत असलेल्या आणि माणसाला आतून उद्ध्वस्त करून टाकणाऱ्या नारकीय जीवनाचे चित्र लिझीच्या कवितांमधील प्रतिमा उभे करतात.




## १. मी लोखंडाचा चंद्र गिळला आहे,

मी लोखंडाचा चंद्र गिळला आहे,
ते त्याला खिळा म्हणतात
मी हा औद्योगिक कचरा,
बेरोजगारीचे दस्तैवज गिळले आहेत,
यंत्रांवर झुकलेले युवा जीवन वेळेआधीच मान टाकते,
मी गर्दी, कोलाहल आणि लाचारी गिळली आहे.
मी गिळले आहेत पायी चालणारे पूल,
गंजलेले आयुष्य,
आता आणखी गिळता येत नाही.
मी जे काही गिळले आहे
ते आता माझ्या गळ्याखाली उतरून
माझ्या पूर्वजांच्या भूमीवर पसरते आहे
एका अपमानजनक कवितेच्या रूपात.

## २. एक स्क्रू पडतो जमिनीवर

एक स्क्रू पडतो जमिनीवर
ओव्हरटाईमच्या या रात्रीत,
सरळ जमिनीच्या दिशेने, उजेड सांडीत
तो कोणाचेही लक्ष वेधून घेणार नाही,
अगदी मागच्या वेळेसारखा,
जेव्हा अशाच एका रात्री,
एक माणूस कोसळला होता जमिनीवर.

## जगप्रसिद्ध साहित्यिक मॅक्सिम गोर्की यांच्या जन्मदिनानिमित्त (२८ मार्च)



**क्रांतिकारी सर्वहाराचा मानवतावाद साधासरळ आहे. तो मानवतेबद्दलच्या प्रेमाचे सुंदर शब्दांमध्ये शाब्दिक जाळे विणत नाही. त्याचे लक्ष्य आहे जगभरातील सर्वहाराला भांडवलशाहीच्या लज्जास्पद, रक्तबंबाळ, वेडसर जोखडातून मुक्त करणे आणि मनुष्याला हे शिकवणे की त्यांनी स्वत:ला विकत घेतला जाणारा आणि विकला जणारा माल किंवा विषयासक्त लोकांच्या ऐयाशीसाठीचा कच्चा माल समजू नये. एखाद्या जख्ख म्हाताऱ्याने एखाद्या तरुण, आरोग्यवान स्त्रीवर अत्याचार करावा आणि गर्भाधान नव्हे तर म्हातारपणातील आजार तिला द्यावा, अगदी तसाच अत्याचार भांडवलशाही जगावर करीत असते. सर्वहारा मानवतावाद प्रेमाच्या विलक्षण घोषणांची मागणी करीत नाही, तो प्रत्येक कामगाराकडून आपल्या ऐतिहासिक कर्तव्याप्रति चेतनेची व सत्तेवर त्याच्या अधिकाराची अपेक्षा करतो... विषयलोलुप, परजीवी, फासिस्ट, खूनी, सर्वहारा वर्गाचे गद्दार यांच्याबद्दल तीव्र घृणेची अपेक्षा तो करतो. तो अशा लोकांबद्दल तिरस्काराची अपेक्षा करतो जे दु:खाला कारणीभूत आहेत आणि हजारो-लाखो लोकांच्या दु:खावर जे जगत आहेत.**

मॅक्सिम गोर्की, कल्चर एण्ड द पिपल

साहित्य

# किचाट

• **सुदेश जाधव**

शमीची आज लवकर सकाळ झाली, पण खूपच उशीर झाला असावा इतक्या घाईत ती सगळं आटपत होती. जिथे वर्दळ जास्त होती तो रस्ता तिला उजेड व्हायच्या आत स्वच्छ करायचा होता, जेणेकरून येणाऱ्या जाणाऱ्यांच्या अंगावर धूळ उडू नये. कारण जितके कपडे स्वच्छ, तितकी माणसं डाग लागण्याला घाबरून असतात. बाकीच्या गावातल्या गल्ल्या आणि सार्वजनिक उकीरडे ती दिवसभरात स्वच्छ करणार होती. आपल्या गावात मुख्यमंत्री आणि सुप्रसिद्ध नटी येणार या धुंदीतच ती सैल झालेल्या झाडवा करकचून बांधू लागली. काल झालेल्या ग्रामपंचायतीच्या सभेत एकही माणूस स्वच्छता करावी म्हणून उभा राहिला नाही. शमीने मोठ्या धिराने ते काम स्वत:कडे घेतलं. अख्ख्या गावाच्या नाकावर टिच्चून. सभा झाल्यानंतर खटारा रिक्षातून केवढ्या मोठ्यामोठ्याने घोषणा! स्वच्छता अभियान गाजत होतं. त्याहीपेक्षा मुख्यमंत्री आणि नटी येणार याचाच गाजावाजा होत होता. जणू मुख्यमंत्री फडच घेऊन गावात उतरणार आहे. या सगळ्याची नवलाई तिच्या चेहऱ्यावर दाटली होती. सगळी जबाबदारी आपल्या स्वत:ची असंच तिला वाटायला लागलं. निदान आपण मुख्यमंत्र्याच्या आणि झालंच तर नटीच्या नजरेतसुद्धा येऊ. हे सगळं चित्र तिच्या खंगत गेलेल्या शरीरात एक वेगळीच ऊर्जा निर्माण करत होतं. नेहमीपेक्षा आज तिचा चेहरा हसरा वाटत होता. जणू काही बऱ्याच वर्षांनी आपल्याला हवं असलेलं काम मिळालं होतं. शमीची मुलगी सोना सहा वर्षांची. मळकट फ्रॉक. दोन दिवसांपूर्वी लाल रिबीनीने बांधलेल्या केसांच्या दोन वेण्या. काळीसावळी. एकंदरित चटकन कुणाचंही लक्ष न जाणारी. पण शमीचं लक्ष गेलं. ठिगळं पडलेली गोधडी सोनानं अंगावर घेतली होती. उशीरापर्यंत सोना झोपलेली शमीला आज चालणारं नव्हतं. तिच्या मदतीने गाव स्वच्छ करायचा होता. म्हणून शमी सोनावर खेकसली.

सोने, ए सोने, उठ लवकर. बापासारखी पसरून झोपू नकोस. उठ.

सोनाच्या अंगावरची गोधडी शमीने ओढली. तशी सोना जागी झाली. आणि जागच्या जागी डोळे पेंगवत शमीची बडबड ऐकत राहिली. शमीने सोनाच्या हाताला धरलं, बाहेर नेलं आणि गारठलेलं पाणी सोनाच्या तोंडाला लावलं. सोनाची झोप चांगलीच उडाली. शमीने आपल्या पदराने सोनाचं तोंड पुसलं. सोना मग चुलीजवळ येऊन हाताचे तळवे गरम करून तोंडाला शेक देऊ लागली. तिला बरं वाटायला लागलं होतं. कोंबडे गारठलेल्या बसक्या आवाजाने ओरडायला लागले होते. सोनाच्या हातात एक झाडू देऊन शमी पुढे, आणि सोना तिच्या मागे पाय घासत चालू लागली. शमी वैतागली.

''चल ग पटापट. जडावू नकोस. अन्नांच्या गौंडाकडनं पातेरा उडवत ये.''

सोना भराभर त्या अंधारातनं चालू लागली. जणू कैक वर्ष हा रस्ता तिच्या पावलांनी मळलेला असावा. उजेड व्हायच्या आत दोघींनी जास्त कचरा असलेल्या जागा स्वच्छ करून घेतल्या. जवळजवळ निम्मा गाव स्वच्छ केल्यावर सोनाच्या पोटात कावळे ओरडायला लागले. शमीने शिव्या हासडत हासडत शेवटी पाच वाजेपर्यंत सगळा पसारा आवरला. तोपर्यंत सोनाच्या भूकेची माती झाली होती. अख्खा गाव स्वच्छ करून सोना, शमी घरी चालल्या. अगदी काळोख व्हायला आला, आणि अशा दिवेलागणीच्या वेळी शमीचं घर सोडता सगळ्या घरांत दिवे मिणमिणत होते. शमी घराजवळ आली. तंगड्या पसरून झोपलेल्या सदाकडे पाह्यलं, थुंकली आणि आत गेली. तिच्या पाठोपाठ सोनाही गेली. नेहमी ठरल्याप्रमाणे सदाची उजळणी घ्यायला शमीने सुरुवात केली.

''भाड्याला दुसरं काम काय हाय, हा... दिवसभर ढोसायची अन् आंड लोळवत बसायचं. घरात काळोख पडला तरी मेल्याला कसली सुध्या नाय. पासली पड म्हणू मेल्या.''

बापाचा उद्धार ऐकता ऐकता सोना झोपून गेली. तिला न जेवताच झोपलेली पाहून शमी अजून चवताळली.

''तीनसांझची झोपू नको, खा आणि मग झोप.''

भात आणि सुकटीचं कालवण शमीनं चुलीवरून उतरलं. ताटं लावायला घेतली.

''सोने, हे ठेव जा बापसाच्या फुड्यात. गिळ म्हणावं. दमला असंल दिवसभर बुड गरम करून.''

सोनानं मुकाट बोलानं सदाच्या फुड्यात ताट ठेवलं. सदानं गुपचुप चॉकलेट काढून सोनाच्या हातावर टेकवलं. सोनानं ते फ्रॉकच्या खिशात चटकन ठेवलं आणि जेवायला येऊन बसली. सोनाचं जेऊन झालं. बापाच्या पुढ्यातलं रिकामं ताट आणून ठेवलं. अंगावर घेऊन झोपून गेली. शमी कालवण भाताच्या टोपातच ओतून खायला लागली. सोनाकडे पाहात एकेक घास तोंडात टाकू लागली. तिची नजर सोनाकडे होती, पण पाहात होती तो उद्याचा दिवस... मुख्यमंत्र्यासमोर माझं आणि सोनाचं नाव... सोनाला शाबासकी. अख्ख्या गावासमोर आपलं नाव घेतील. हिरोईनपण आपल्याला ओळख दाखवील. पेप्रात फोटू येईल काय? अजून काय काय घडंल उद्या? अजून बरंच काही रंगवता रंगवता पुढ्यातलं जेवण कधी संपलं तिचं तिलाच कळलं नाही. सगळं आटपून सोनाच्या बाजूला येऊन पडली. डोळा लागायच्या आत नेहमीप्रमाणे

अंगणाकडचा दरवाजा उघडून सदाकडे पाह्यलं. कसलीच चिंता नाही, अशा अवस्थेत झोपलेला पाहून दरवाजा लावला आणि सोनाच्या बाजूला येऊन पडली. आज थकलेली असूनसुद्धा तिचा डोळा लागत नव्हता. फाटक्या छपराच्या छिद्रातून बराच वेळ उद्याचा दिवस बघत होती. हळूहळू दिवसभराचा थकवा डोळ्यांवर जाणवू लागला. उद्याच्या दिवसाची रंगत भरता भरता ती झोपी गेली.

शमीला जेव्हा सकाळी जाग आली, तेव्हा कोंबड्यांचं ओरडणं थांबलं होतं. ठिगळं पडलेल्या छपरातून उन्ह घरभर पसरलं होतं. पण सोनाला त्याचा काहीएक फरक पडत नव्हता. ती साखरझोपेत होती. शमीने भराभरा आटपायला घेतलं. सोनाला शिव्या हासडत नेहमीप्रमाणे उठवलं. दोघींचं जेमेतेम आटपत आलं होतं. सोना आज किरमीर करत नव्हती. आजचा दिवस रंगवता रंगवता शमी खूष होती. तिच्या डोळ्यांत आज वेगळीच चमक दिसत होती. मोजक्याच दिवशी घालायचा, सोनासाठी अजून नवीन असणारा जुना फ्रॉक, मळक्या साडीच्या बोचक्यातून शमीने काढला. मागच्या शिमग्यात धुवून ठेवलेली तीन वर्षांपूर्वीची साडी स्वत:साठी काढली. ग्रामपंचायतीत आज चार वाजताच देवाच्या उत्सवाची गाणी सुरू झाली होती. कार्यकर्त्यांनी पताके लावायला रात्रीपासूनच सुरुवात केली होती. ग्रामपंचायतीपासूनचा अर्ध्या गावाचा परिसर पताक्यांनी फडकत होता. कार्यकर्त्यांनी मुद्दामहून जास्त करून भगव्या रंगाचे पताके लावलेले. सकाळी आठ वाजता बँजो पार्टीवाले, खालूबाजेवाले आणि घोषणा ठोकणारे मस्तीतच आले होते. गावात जत्राच भरल्यासारखी वाटत होती. मुख्यमंत्री येणार, हिरोईन येणार म्हणून.

सदा घराच्या बाहेरच झोपल्याने त्याला हा सगळा गोंगाट झोंबू लागला. ''रांडेच्या आणि दलालाच्या लग्नाची तयारी करतायत. गावकऱ्यांच्या हातात केळं देऊन जातील बघा. मग बसा सोलवत'', असं म्हणून परत झोपी जायचा. पण झोप येईना. शेवटी तोही आता उठून बसला. रात्री अर्धवट पिऊन ठेवलेली बिडी परत पेटवून सगळा वर्दळीचा किचाट पाहू लागला. आतमध्ये शमी आणि सोना तयार होत्या. बऱ्याच दिवसांनी लोकांच्यात मिसळण्याचा योग आला होता. घराबाहेर पडताना शमीने सदाकडे न पाहता त्याच्या उशीजवळ चहाचा कप ठेवला आणि सोनाला म्हणाली, ''जेवण करून ठेवलंय, जेवून घे म्हणावं''. त्यांचा नट्टापट्टा पाहून सदा हसला. सोनाला जवळ बोलावून दोन रुपये हातावर ठेवले. सोना शमीच्या मागोमाग चालू लागली. त्या दिसेनाश्या होईपर्यंत सदा त्यांच्याकडे पाहात राह्यला. स्वत:शीच हसून चहाचा कप तोंडाला लावला. शमी आणि सोना ग्रामपंचायतीजवळ आली. पाहते तर अफाट गर्दी. मासिक सभेपेक्षा दहा पटीने लोक अगदी झाडून आलेले होते. कधी नव्हे त्या मुलांचं कारण सांगून प्रत्येक कामातून अंग काढून घेणाऱ्या बाया आज पोरांना कमरेवर घेऊन उभ्या होत्या. काठीच्या आधारावर खेळणाऱ्या म्हाताऱ्या आज पहिल्यांदाच ग्रामपंचायतीजवळ पानसुपारीच्या पिशव्या काढून गप्पा रंगवत होत्या. शाळेत जाणारी पोरं. नुकत्याच तारुण्यात पदार्पण केलेल्या पोरी कोणीही पाहात नसताना कोणीतरी पाहातंय असा आव आणत लाजत मुरडत एकमेकींच्या नव्या ड्रेसची पाहाणी करत उभ्या होत्या. मुख्यमंत्र्याच्या पक्षातले कार्यकर्ते लाल टिक्का लावून – काही दाढी वाढवलेले, काही सफेद कपडे घातलेले – माज दाखवत फोड येईस्तोवर घोषणा देत होते. पक्षात नसणारे शेपूट घातल्यावाणी शांत पण सहभागी असल्यासारखे उभे होते. स्पीकरवाल्याने ''जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो रे इश्वर गाणं'' फुटलेल्या खरखरत्या कर्ण्यावर जोरात लावलं होतं. एकीकडे बँजो पार्टी, तुताऱ्या, खालुबाजे, सनई. नुसता उत्सव नव्हे, जत्रा भरली होती, मुख्यमंत्र्याच्या आणि नटीच्या स्वागतासाठी. एवढ्या सगळ्या वर्दळीतून शमी सोनाचा हात धरून एकेकाला कोपराने मागे सारत ग्रामपंचायतीच्या मंचाजवळ पोचली. पण मंचापासून जरा लांबच उभी राहिली. मंचाच्या तोंडाजवळ तोंडाला पावडर थापून आलेल्या बाया स्वागतासाठी आरतीची ताटं धरून उभ्या होत्या. ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डवर स्वच्छता अभियानाची कार्यक्रम पत्रिका आणि इंग्लिशमधून चुकीचं 'वेलकम' लिहिल होतं. शोभा यावी म्हणून शाळेतल्या पोरानं काढलेलं न ओळखता येणारं फूल.

नऊ वाजल्यापासून लोकांची वर्दळ जास्तीच वाढली होती. कार्यकर्त्यांना चांगलाच घाम फुटला होता. घामामुळे कपाळावरच्या टिक्क्यांचा वरघळ अगदी तोंडापर्यंत आला होता. बायांच्या मेणबत्त्या दुसऱ्यांदा संपल्या. त्या पेटवण्याचा तिसरा राउंड होता. गजरे सुकत चालले होते. तोंडावरची पावडर केव्हाच उडाली होती. मुख्यमंत्री साहेब आणि नटी केव्हाही येऊ शकतात या आदरापोटी बिचाऱ्या झक मारून प्रतिष्ठित नवऱ्यांच्या मानासाठी उभ्या होत्या. शमी एवढ्या गर्दीत असून नसल्यासारखीच उभी होती. जितकं पुढे सरकता येईल, तितकं पुढे सरकत होती. सोना कंटाळली होती. पण जाणवू देत नव्हती. गावचा पोलिस पाटील, सरपंच आणि स्वत:ला उद्योगपती समजणारे, स्वत: मोठे असल्याचा आव आणणारे लोक, आरतीचं ताट धरून उभ्या असलेल्या बायकांचा कोमेजून गेलेला थाट नव्या जोमाने पाहात होते. काही लोकांनी शमीला चेहऱ्यावर नुसतं पाणचट हसू आणून ओळख दाखवण्याचा प्रयत्न केला. बाकी जणं आपापल्या नादात होते. शमी त्या घोळक्यात 'सूट' होत नव्हती. पण तिला तसं बोलणारं आणि तिथून बाहेर काढणारं असं कोणीच नव्हतं.

दहाबारा गाड्या धुरळा उडवत आल्या. एका मागोमाग एक. फांदी पडायची वाट पाहणारे बँजोवाले, तुताऱ्यांवाले, खालूबाजे, सनईवाले, रक्त उसळल्यागत तुटून पडले. स्पीकरवाल्याने तर डेसिबल नावाचा प्रकारच मोडला. फटाक्यांची फॅक्टरी फुटल्यासारखीच वाटायला लागली. घाम फुटलेल्या बायांनी, कोणी रुमालाने तर कोणी पदरानेच तोंडावरचा घाम पुसला. पदर डोक्यावर धरून ओवाळणीसाठी पुन्हा नव्याने आपापल्या नवऱ्यांच्या चेहऱ्याचं दर्शन घेऊन उभ्या राहिल्या. शमी अगदी टक लावून पाहात होती. मुख्यमंत्री आणि नटीसोबत हातात बंदुका आणि काही दांडके घेऊन चालत येणारा घोळका पाहात होती. पण जमावाचा सगळा कटाक्ष हिरोईनीला

झेलावा लागत होता. मेकअप लावून गोरीपान, अर्धी उघडी छाती, चकचकणाऱ्या अर्ध्या उघड्या मांड्या... पण लोक मात्र डोळे फाडून तिच्या पूर्ण शरीराचं काल्पनिक चित्र रंगवत लाळ आतल्या आत गिळत उभे होते. मुख्यमंत्री आणि हिरोईन मंचाच्या तोंडाजवळ आरतीचं ताट धरून उभ्या असलेल्या बायांपर्यंत पोचले. बायांची एकच धांदल. कोण ओवाळणार पहिलं! शेवटी निर्णय झाला आणि सरपंचाच्या बायकोनं मान पटकावला. बघता बघता मुख्यमंत्र्याचं कपाळ लाल झालं. हिरोईनला एलर्जी असल्याचं सांगितल्यामुळे नुसतं तोंडासमोरून ताट फिरवण्यात आलं. शमी हे सगळं पाहात होती. टिव्हीवर पाहिलेल्या नटीला प्रत्यक्षात बघून आपण जगातली सगळ्यात सुंदर गोष्ट पाहात असल्याचं समाधान सोनाच्या चेहऱ्यावर दिसत होतं. सगळा गोतावळा आता नियोजनाप्रमाणे मंचाकडे गेला. मंचावर खुर्च्यांपेक्षा माणसं जास्त झाली. बाकीचे मंचावर कोपऱ्याकोपऱ्यात मुख्यमंत्र्याचे नातलगच असल्यासारखे उभे होते. मुख्यमंत्र्याने हात वर करताच कुत्री शांत बसावी तसा गोंधळ शांत होत जिथल्या तिथे आपली जागा घेऊन बसला. सरपंचाने प्रास्ताविकाला सुरुवात केली. प्रास्ताविक म्हणजे आपण केलेली गावातली कामं – रम्याला दारुतून कसं सोडवलं, रुक्मिणीच्या नवऱ्याला रातोरात डॉक्टरकडे कसं नेलं, जरी तो जगला नाही तरी रुक्मिणीला दिलेला आसरा, कंपनीला गावात येण्यास आपण बंदी घातली, मुख्यमंत्र्यांना मतं मिळावी म्हणून आपण कशा चपला झिजवल्या! हे कैकदा ऐकलेलं भाषण ग्रामस्थ आज नव्याने मुख्यमंत्र्यासोबत ऐकत असल्यामुळे एकदोनदा टाळ्या वाजल्या. एवढं सगळं सांगता सांगता सरपंचाला ठसका लागला. मुख्यमंत्र्याने जवळचीच मिनरल वॉटरची बॉटल सरपंचाच्या समोर केली. सरपंचाने दोन घोट पित असतानाच सूत्रसंचालकाने भाषण संपलं असं घोषित केलं. सरपंचाच्या ठसक्यामुळे त्याच्या धुमसणाऱ्या गोष्टी तशाच आतल्या आत गोठून गेल्या, हे चेहऱ्यावर किंचित दिसलं. प्रत्येक जण येऊन भरभरून बोलत होता. पण स्वच्छता अभियानासंबंधी कोणीही चकार शब्दसुद्धा काढत नव्हतं. मुख्यमंत्री आता चेहऱ्यावर पाणचट हसू आणून समोर बसलेल्या लोकांना ऊर्जा देण्याचा प्रयत्न करत होता. हिरोईन लाकडाच्या खुर्चीच्या ढेकणांना चुकवण्यात वेळ घालवता घालवता लालेलाल झाली होती. जवळजवळ दीड तासाच्या भाषणांनंतर पोलिस पाटलाने स्वच्छतेचा विषय छेडला. शमीची धडधड वाढू लागली. तिला वाटलं आपलं नाव घेईल, आपलं नाव घेईल! शेवटी पोलिस पाटीलही लायनीवर आला, हगंदारीवर बोलून नव्या शौचालयाची मागणी करून खुर्चीवर येऊन बसला. हिरोईनीच्या आणि मुख्यमंत्र्याच्या बुडाला आता कढ येऊ लागले होते. पण उठता येईना. चेहऱ्यावरचं पाणचट हसूही आता गायब झालं होतं. शमीला आता हळूहळू कळायला लागलं, परवा ग्रामसभेत झालं ते सगळं नाटक होतं. सभेतल्या सगळ्या लोकांनी आपल्याला घातलेली भुरळ, आपला सत्कार होईल म्हणून लोकांनी दिलेली खोटी आशा आता तिला पूर्ण कळली होती. बऱ्याच वेळानं मुख्यमंत्र्याला बुड मोकळं करण्याची संधी मिळाली. मुख्यमंत्री उठला आणि भाषण बोलायला लागला – पहिला स्वत:चा स्ट्रगल, मग विरोधी पक्षावर टीका, थोड्या वेळानं आश्वासनांचा गारवा आणि सरतेशेवटी या गावाला स्वच्छता अभियानाचा पुरस्कार आणि दोन लाख रूपये देणगी म्हणून देण्याचं घोषित केलं. पुन्हा फटाके, खालुबाजा, तुताऱ्या, बँजोपार्टीवाले रक्त उसळल्यागत बडवायला लागले. मुख्यमंत्र्यांनी हिरोईनकडे पाह्यलं आणि हजार शब्द आपल्या पोटातच गोठवून भाषण थांबवलं!

थोड्या वेळानं गावचा सरपंच उठला, गहिवरून आलेल्या आवाजात मोठमोठ्या शब्दांनी मुख्यमंत्र्यांना सजवलं. दोन लाखापेक्षा जास्त किंमती शब्द मुख्यमंत्र्यांच्या पायावजवळ आदळत आपटत म्हणाला, ''साहेब, तुम्ही आलाव, आमचा गाव पावन झाला. आता आमची आणि गाववाल्यांची एकच इच्छा हाव, आपला आणि मॅडमचा हातात झाडू धरून फोटो काढायचा. आणि या फोटोचा बॅनर आम्ही बारा गावात लावू, कारण उद्याच्या पिढीला स्वच्छेतेचा मतलब तुमच्याकडूनच कळेल, आणि तुम्ही आमच्यासाठी आदर्श ठराल. तुमच्या बॅनरकडे बघून सगळ्या माणसांना हुरूप येईल.'' शेवटचा हुंदका देऊन, नमस्कार म्हणून सरपंच जागेवर जाऊन बसला. सरपंचाने मुख्यमंत्र्याला चांगलंच गोचीत टाकलं होतं. झक मारून करावंच लागणार! मुख्यमंत्र्यानं हिरोईनकडे पाह्यलं. हिरोईननं मुख्यमंत्र्याकडे. मुख्यमंत्री लाचार होत काहीतरी नुसतं नजरेनं बोलला. बाई तयार झाली.

लग्नाची व्हिडिओ बनवणारा फोटोग्राफर तालुक्यावरून आणला. हिरोईन मेकअपसाठी गर्दीतून गाडीत गेली. फोटो काढायचा म्हणून कचरा तरी हवाच. नाहीतर तो फोटो नुसताच लग्नात काढल्यासारखा होईल. पण गावात इतका कचरा नव्हताच. गावाबाहेरच्या वेशीवरून तिघेचौघे तो सिमेंटच्या फाटक्या पिशवीतून पंधरा मिनिटात गाडीवरून घेऊन आले. सगळी तयारी झाली. जवळजवळ दोन तासांनी मेकअप करून मॅडम बाहेर आल्या. कपडे बदललेले होते. मघापेक्षा कपडे कमी झाले होते. मुख्यमंत्री साहेब आले. पहिले हिरोईनचे फोटो काढण्यात आले. हातात झाडू आणि मादक पोज. फोटो काढता काढता कॅमेरावाला मात्र हलत होता. वेगवेगळ्या एंगल्सनी फोटो काढण्यात आले. मुख्यमंत्री बिचारा ओटीभरणीसाठी राहिल्यागत वाकून उभा राहून फोटो काढून घेतो होता. मग दोघांचे एकत्र फोटो काढले गेले. झाला. जवळजवळ एक तासाचा कार्यक्रम झाला. मग उत्सव पुन्हा सुरू झाला. वाजवणारे पुन्हा तुटून पडले. कार्यकर्ते नाचता नाचता लावलेले पताके आपल्या गळ्यात घालून नाचू लागले.

मुख्यमंत्री आणि हिरोईनची गाडी धुरळा उडवत केव्हाचीच दिसेनाशी झाली. आणि प्रत्येक जण निरोप घेऊ लागला. नाचणारे दुपारच्या उन्हाने मंद होत गेले. गर्दी हळूहळू कमी होत गेली. सरपंचाने जाता जाता शमीकडे पाह्यलं आणि म्हणाला, ''शमे बघ, आजच्या कार्यक्रमामुळे लोकांनी कचरा केला. तेवढं जरा उद्या बघ.'' सरपंच हसला आणि निघून गेला.


शमी तिथेच बसून राहिली होती. सोना गाढ झोपेत

शमीच्या मांडीवर डोके ठेवून होती. दूरदूरपर्यंत धुरळा उडाला होता. तो उन्हातून चांगलाच चमकत होता. फटाक्यांचा धूर अजून रेंगाळत होता. पताक्यांच्या लांबलांब रांगा मधूनच तुटल्या होत्या. क्वचितच रांगा जशा होत्या तशा धुळीत मिसळत होत्या. कागदी कपटे, फरसाणाच्या खाऊन टाकलेल्या डिश, प्लास्टिकची ग्लासं, उन्हात चांगलेच तापून गेले होते. ते पाहून शमीला रडूच फुटायचं बाकी होतं – साधं आपलं नावसुद्धा नाही घेतलं. प्रत्येक जण आपापल्या घरी जाणार. उत्सव झाला म्हणून चांगलं चोपडं जेवणार. उरलंसुरलं गवरावर फेकणार. ती सगळी घाण आपण साफ करायची. तेही अवघ्या शंभर रुपयासाठी. तेही मिळतील न मिळतील... मनात राग सलत गेला. सोनाला उठवलं. दोघीही घराच्या दिशेने भराभरा चालू लागल्या. शमी आजुबाजूला कचरा किती पडलाय हे पाहात पाहात निघाली. दोघीही घरी पोहोचल्या. सदा बाहेर नव्हता. घर उघडलं. सोना जाऊन झोपली. दोघीही जेवल्या आणि शमीने सोनाच्या बाजूला अंग टाकलं. तिचा काही केल्या डोळा लागत नव्हता – भिक्कारचोट माण्सं. गाव स्वच्छ कोण करणार. ग्रामपंचायतीच्या सभेला विचारलं तर एकही माणूस तयार झाला नाही. मी एवढ्या माण्सांमधून उठून बोलले, मी करणार. मग मात्र भर सभेत गांडीवरले हात काढून टाळ्या वाजवल्या. सत्कार होईल, फोटो काढू. अजून बरंच काही. अर्धा तास नुसता यातच गेला होता. पण आज यातलं काही झालंच नाही. साधं नावसुद्धा कोणी आपलं काढलं नाही भाड्यानी. मंत्र्याचे आणि उघड्या बुडाच्या नटीचे हातात झाडवा घेऊन फोटो काढले. उद्या मोठमोठे बॅनर लागणार. वरती या भडव्या कार्यकर्त्यांचे अभिनंदनाचे हात जोडून टिळा लावलेले फोटो असणार... असं स्वत:च धुमसत राहिली. सोना म्हणाली, ''आये आपला फोटो का नाही काढला?'' शमीने तिच्याकडे पाह्यल. काहीच बोलली नाही. पिठ मळताना सगळा राग काढत होती. बाहेर सदाचा आवाज येत होता. खूप प्यायला होता. ''आयझवाडीचे कधी गावाकडे बघतात का... रांड आणून फोटो काढून गेले. दोन लाख रुपये देणार. मुख्यमंत्र्याचा घ्या हातात.'' शमीलाही बरं वाटत होतं. पण ती घाबरली. कुणी ऐकलं तर! बाहेर गेली. ''ऐ मेल्या गप्प बस. मेला जगू देणार नाय आम्हांला.''

जेवणं झाली. शमी सोनाच्या बाजूला येऊन झोपली. पुन्हा उठून सदा झोपला का पाहायला गेली. सदा जागेवर नव्हता. तिने दरवाजा लावला आणि येऊन झोपली. कार्यकर्त्यांनी धावपळ करून जिवाचा आटापिटा करून सगळ्या घरातल्या लाइटी जायच्या आत बॅनर तयार केले होते. मंत्र्याचे आणि हिरोईनचे सगळे फोटो बॅनरवर झाडू काढताना झळकू लागले. बॅनर रातोरात गावभर लावले. मोठमोठे बॅनर पाहून सदा अजूनच शिव्या देऊ लागला. अगदी मध्यरात्री येऊन आपल्या जागेवर झोपला. सकाळी शमी उठली. थोडं उजाडलंच होतं. सोनाला घेऊन कालची पडलेली घाण साफ करून तिला दुसऱ्या कामाला जायचं होतं. ग्रामपंचायतीजवळ गेली तेव्हा बराच गोंधळ उडाला होता. एवढी गर्दी कसली? शमीला आश्चर्य वाटलं. थोडं पुढं होऊन पाह्यलं आणि उडालीच. मुख्यमंत्र्याच्या आणि हिरोईनच्या तोंडावर गू फासला होता! तिच्या डोळ्यासमोर सदा दिसला. तिने पटकन सोनाचा हात पकडला आणि दोघीही पटापटा झाडू मारायला लागल्या. कार्यकर्त्यांची तोंडं लाल झाली होती. शिव्या हासडत हासडत गदारोळ चालू केला. आपल्या मुख्यमंत्र्याच्या तोंडाला गू फासला, त्यामुळे ते अजूनच चवताळले होते. बॅनर बघण्यासारखा नव्हता तरीही पुन्हा पुन्हा तिथे पाहून शिव्या हासडत होते. शमीने कचरा साफ करण्याची घाई केली. सोनालाही घाई करायला सांगत होती. पण सोना मध्येच थांबली आणि त्या हिरोईनच्या गू फासलेल्या बॅनरकडे टक लावून पाहात राह्यली.

## प्रा. तुलसीराम यांना 'स्फुलिंग'ची श्रद्धांजली

राजकीय विचारवंत आणि लेखक तुलसीराम यांचे गेल्या १३ फेब्रुवारी झालेले निधन म्हणजे हिंदी साहित्य आणि उत्पीडित जनतेच्या आंदोलनांसाठी एक न भरून निघणारी हानी आहे. तुलसीराम विरोधी विचारांशी धैर्यपूर्वक वादविवाद करणारे, डाव्या विचारधारेशी जवळीक असलेले एक प्रबुद्ध दलित विचारवंत होते. डावी विचारसरणी आणि आंदोलनांमध्ये त्यांचा दीर्घ काळ सक्रिय सहभाग होता. अर्थातच, आपल्या नंतरच्या वर्षांमध्ये जातीच्या प्रश्नावर त्यांच्या विचारांमध्ये अशा अनेक गोष्टी होत्या ज्यांच्याशी मार्क्सवादी दृष्टिकोनातून सहमत होता येणार नाही. परंतु गंभीरपणे आपले विचार मांडत विरोधी विचारांसोबत



निरोगी लोकशाही भूमिका घेणे त्यांचे वैशिष्ट्य होते. चंदीगढमध्ये 'जाती प्रश्न आणि मार्क्सवाद' या विषयावर अरविंद स्मृती न्यासतर्फे आयोजित अखिल भारतीय चर्चासत्रामध्ये (१२ – १६ मार्च २०१३) मध्ये सहभागी होऊन चर्चा करताना त्यांनी आपल्या याच भूमिकेचे दर्शन घडविले.

ते रशियन भाषा आणि इतिहासाचे उत्तम जाणकार,, एक चांगले वक्ता आणि शिक्षक असण्याबरोबरच एक दर्जेदार लेखकही होते. त्यांच्या आत्मकथेचे दोन खंड 'मुर्दहिया' आणि 'मणिकर्णिका' अनोख्या साहित्यकृती असण्याबरोबरच पूर्व उत्तर प्रदेशच्या दलितांच्या जीवनस्थितीचे तसेच साठ आणि सत्तरच्या दशकातील या क्षेत्रातील डाव्या आंदोलनातील घडामोडींचे जिवंत दस्तऐवज आहेत. त्यांच्या अनेक विचारांशी असहमती असूनदेखील जनतेशी असलेल्या त्यांच्या बांधीलकीचा तसेच निष्ठेचा आम्ही मनापासून आदर करतो. 'स्फुलिंग'कडून त्यांना हार्दिक आणि विनम्र श्रद्धांजली.

## समाज

# ढंढारी बलात्कार आणि हत्या प्रकरण - सामाजिक वास्तावाचे दर्शन

सामूहिक बलात्कार, तक्रार मागे घेण्यासाठी धमकावणे, मारहाण आणि शेवटी घरात घुसून जाळून हत्या! ढंढारीतील या प्रकरणाने पुन्हा एकदा आपल्या सामाजिक वास्तावाचे भयानक, बिभत्स रूप आपल्यासमोर ठेवले आहे. एक दिलासा मात्र आहे. पोलीस, प्रशासन आणि सत्ताधारी उघडउघड गुन्हेगारांच्या बाजूने उभे असताना जनता खंबीरपणे न्यायाचा लढा उभारते आहे, लढते आहे.

लुधियाना येथील सर्वसाधारण कुटुंबातील शहनाज या बारावीत शिकणाऱ्या १६ वर्षीय मुलीचे राजकीय वरदहस्त लाभलेल्या एका गुंडांच्या टोळक्याने २५ ऑक्टोबर रोजी शाळेत जातेवेळी अपहरण केले. तिचे कुटुंबीय जेव्हा पोलिसांकडे गेले तेव्हा त्यांना पोलिसांच्या अत्यंत असंवेदनशील वागण्याला तोंड द्यावे लागले. विनाकारण बदनामी कशासाठी ओढवून घेता, मुलगी कुणासोबत तरी पळून गेली असेल, स्वतःहून परत येईल, असे सांगून पोलिसांनी पालकांची बोळवण करण्याचा प्रयत्न केला. दोन दिवसांनंतर गुंडांनी शहनाजला सोडून दिले. शरीर आणि मनावर सामूहिक बलात्काराचे घाव घेऊन शहनाज २७ ऑक्टोबरच्या मध्यरात्री घरी परतली. दुसऱ्या दिवशी पालक पुन्हा तिला घेऊन पोलिसांकडे गेले तर पोलिसांकडून पुन्हा तीच टाळाटाळ. त्यांना एका पोलीस चौकीतून दुसऱ्या पोलिस चौकीत हेलपाटे मारावे लागले. एका चौकीच्या इन चार्जने तर त्यांच्याकडे ५० हजार रुपयांची लाच मागितली. बरीच धावाधाव केल्यानंतर अखेर एफआयआर नोंदवून घेण्यात आली, मात्र तिच्यामध्ये बलात्काराचे कलम लावण्यात आले नाही. शहनाजच्या आईवडिलांनी तिची वैद्यकीय तपासणी करण्याची मागणी केली मात्र आज- उद्या करत करत पोलिस टाळत राहिले व यातच एक आठवडा उलटला. एका आठवड्यानंतर वैद्यकीय चाचणी केल्यास बलात्काराची पुष्टी होण्याची शक्यता कमीच असते. त्यांच्या वकिलालासुद्धा विकत घेण्यात आले होते. मोठ्या चलाखीने न्यायाधिशासमोर तिचा जबाब नोंदविण्यात आला की तिच्यासोबत बलात्काराचा 'प्रयत्न' करण्यात आला होता. मुलगी हे समजू शकली नाही की 'प्रयत्न' म्हटल्याने सगळे अर्थच बदलून जातात. चार गुंडांवर एफआयआर नोंदविण्यात आली. तिघांना अटक करण्यात आली. या टोळक्यातील अन्य गुंडांनी मधल्या काळात तिच्या कुटुंबियांना तक्रार मागे घेण्यासाठी धमकावणे सुरू केले, आणि मग ३१ ऑक्टोबर रोजी शहनाज घरी एकटी असताना गुंडांनी घरात घुसून तिचे हातपाय बांधून, तिच्या तोंडात कापडाचा बोळा कोंबून तिला अमानुष मारहाण केली. १० दिवस कोठडीत राहिल्यानंतर बलात्कार व अपहरणाचे तीन आरोपीसुद्धा जामिनावर सुटले. शहनाज व तिच्या कुटुंबियांना जिवे मारण्याच्या धमक्या देण्यात येऊ लागल्या. परंतु त्यांनी तक्रार मागे घेतली नाही. ते पोलिसांकडे संरक्षण मागण्यासाठी गेले, त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले, वेगवेगळ्या राजकीय पक्षांकडे मदतीची याचना केली परंतु काहीही उपयोग झाला नाही. अखेर, चार डिसेंबर रोजी शहनाजचे आईवडिल या प्रकरणासंबंधात कचेरीत गेले असता गुंडांनी घरात घुसून शहनाजवर रॉकेल ओतून तिला पेटवून दिले.




या निर्घृण घटनेनंतरसुद्धा पोलिस प्रशासनाने गुन्हेगारांना पाठीशी घालणे सुरूच ठेवले. बहुतांश शरीर जळालेल्या अवस्थेत शहनाजचे आई-वडिल तिला बाईकवर बसून फोकल पॉईंट स्टेशनवर घेऊन गेले. तेथे पोलिसांनी त्यांचे काहीही ऐकून घेण्यास व मदत करण्यास स्पष्ट नकार दिला. आईवडिलांना शहनाजला बाईकवर बसवूनच सरकारी इस्पितळात घेऊन जावे लागले. शहनाजने इस्पितळात जजसमोर दिलेल्या जबाबात जाळण्याच्या संदर्भात सात तरुणांचा उल्लेख केला. चारी बाजूंनी टीका होत असल्यामुळे पोलिसांनी अखेर चार गुंडांना अटक केली. इतर आरोपी मोकाट फिरत राहिले. उपचारासाठी

पोलिस प्रशासन किंवा सरकारने कोणतीही विशेष मदत केली नाही. ९० टक्के जळालेल्या शहनाजला लुधियानाहून पटियालाच्या रजिंदर इस्पितळात हलविण्यात आले. तेथून चंदिगढच्या ३२ सेक्टर इस्पितळात. शहनाजला ताबडतोब एखाद्या चांगल्या इस्पितळात भरती करून उपचार करण्यासाठी कुटुंबियांची मदत करण्यात आली असती तर कदाचित तिचा जीव वाचला असता. चार दिवस शहनाज मृत्यूशी झुंजत होती. ८ डिसेंबरच्या रात्री तिची प्राणज्योत मालवली. मृत्यूच्या थोडा वेळ अगोदर तिने आपल्या आईवडिलांना सांगितले — ''मुझे इन्साफ चाहिये!''

या एकूण प्रकरणात शहनाज व तिच्या कुटुंबियांनी दाखविलेली हिम्मत वाखाणण्यासारखी आहे. कित्येक स्त्रिया व त्यांचे कुटुंबीय सामाजिक बदनामी, मारहाण, जिवाच्या धोक्यामुळे व न्याय मिळण्याची अपेक्षा नसल्यामुळे अशा घटना लपविण्याचा प्रयत्न करतात. परंतु या धैर्यवान मुलीने व तिच्या हिम्मतवान गरीब कुटुंबियांनी असे केले नाही.

८ डिसेंबर रोजी कारखाना मजदूर युनियन पंजाबने प्रेमनगर ढंढारी येथे लोकांची एक सभा बोलावून पीडित कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष सुरू करण्याची घोषणा केली. या सभेत जवळपास एक हजार कारखाना कामगार, दुकानदार, फेरीवाले सहभागी झाले होते. कारखाना मजदूर युनियनच्या नेत्यांनी व मोहल्ल्यातील काही लोक मिळून ढंढारी बलात्कार व हत्याकांडविरोधी संघर्ष समिती स्थापन करण्यात आली. दुसऱ्या दिवशी पोलिस कमिशनर कार्यालयासमोर मोठे धरणे आंदोलन करण्याचा व सर्व आरोपींना ताबडतोब अटक करून व लवकरात लवकर आरोपपत्र सादर करून फास्ट ट्रॅक कोर्टमध्ये केस चालविण्याची मागणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे दोषींना मृत्यूदंड, गुंडांची मदत करणाऱ्या पोलिसांना तुरुंगवास, पीडित कुटुंबाला अधिक नुकसानभरपाई, सर्वसामान्यांची, विशेषतः स्त्रियांच्या सुरक्षेची सुनिश्चिती आदी मागण्या करण्याचे ठरविण्यात आले.

त्याच रात्री १ वाजता शहनाजचा मृत्यू झाल्यामुळे दुसऱ्या दिवशी पोलिस कमिशनरच्या कार्यालयासमोर धरणे होऊ शकले नाही, परंतु शहनाजच्या घरापाशीच हजारो लोक जमले. कारखाना मजदूर युनियनसोबत बिगुल मजदूर दस्ता, टॅक्सटाइल हौजरी कामगार युनियन, नौजवान भारत सभा आणि पंजाब स्टुडंट्स युनियन (ललकार) हेदेखील या संघर्षात सामील झाले. हजारो लोक या निदर्शनात सहभागी झाले. प्रशासनाकडून एकूण इलाक्यात पोलिसांचा कडक बंदोबस्त लावून लोकांना निदर्शनात सहभागी होण्यास अटकाव करण्याचा प्रयत्न झाला. दहशतीद्वारे आंदोलन फोडण्यात अपयश आल्यानंतर काही राजकीय पक्षांचे नेते आणि धार्मिक नेत्यांमार्फतही प्रयत्न करण्यात आले. काँग्रेसच्या एका मुसलमान नेत्याने हा त्यांच्या समाजाचा मुद्दा असून निदर्शन बंद करण्यास सांगितले परंतु शहनाजच्या आईने निदर्शन बंद होणार नसल्याचे ठणकावून सांगितले. कामगार नेत्यांना 'असामाजिक तत्त्व' आणि 'दहशतवादी' म्हणून बदनामी करण्याचे प्रयत्नसुद्धा झाले. दुसऱ्या बाजूने अशा प्रकारची कारस्थाने सुरू असूनही लोकांनी संघर्ष सुरूच ठेवला.

पंजाबचे उपमुख्यमंत्री सुखबीरसिंह बादल यांनी मिडियासमोर ''या प्रकरणाचे वास्तव काही वेगळेच आहे'', असे वक्तव्य दिले. याचाच अर्थ शहनाजने ९० टक्के जळालेल्या अवस्थेत दिलेला जबाब खोटा होता! पंजाब सरकार या प्रकरणाला चुकीचे वळण देण्याचा प्रयत्न करून गुन्हेगारांना आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या राजकीय नेत्यांना वाचविण्याचा प्रयत्न करीत होते हे उघड झाले होते. सुखबीरसिंह बादल यांच्या या वक्तव्याच्या विरोधात १४ डिसेंबर रोजी ३ हजार आंदोलनकर्त्यांनी, ज्यांच्यामध्ये प्रामुख्याने कामगारांचा समावेश होता, संघर्ष समितीच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्रीय महामार्ग बंद केला. ढंढारी इलाका आता पोलिस छावणी बनला होता. पोलिसांच्या दहशतीला न जुमानता लोक खंबीरपणे उभे होते आणि प्रशासनाकडून न्यायाचे ठोस आश्वासन मिळाल्यानंतरच राष्ट्रीय महामार्ग खुला करण्यात आला. यानंतर सरकारने बादल यांचे वक्तव्य वेगळ्या प्रकरणाबाबत होते, अशी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला.

यानंतर अजूनही मोकाट असलेला आणि एक दोषी पोलिसांच्या हाती आला. अन्य दोन व्यक्तींनादेखील यानंतर अटक करण्यात आली. आता पोलिसांचे म्हणणे झाले की अटक करण्यात आलेल्यांपैकी एक व्यक्ती सुल्तान याच्या मते २५ ते २७ ऑक्टोबर या काळात मुलगी त्याच्यासोबत होती, व तिचे अपहरण करण्यात आलेले नव्हते. पोलिस खोटे साक्षीदार उभे करून प्रकरणाला वेगळा रंग देण्याचा प्रयत्न करीत असल्याचेच आतापर्यंत दिसून आले होते. अशा परिस्थितीमध्ये 'ढंढारी बलात्कार आणि हत्या प्रकरण विरोधी संघर्ष समिती'चे पुर्नगठन करण्यात आले आणि २० डिसेंबर रोजी एका विशाल श्रद्धांजली सभेची घोषणा करण्यात आली. गाव आणि शहरांमध्ये अभियान चालवून लोकांना एकत्रित करण्यात आले. या दिवशी जास्त मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त लावून सतत दहशतीचे वातावरण निर्माण केले गेले, तरीही कडाक्याच्या थंडीतही १० हजार लोक या श्रद्धांजली सभेसाठी गोळा झाले.

आज समाजात स्त्रिया पावलोपावली महिलाविरोधी मानसिकतेच्या बळी ठरत आहेत. यामागे राजकीय वजन लाभलेल्या टोळक्यांकडून होणाऱ्या उपद्रवाचा मोठा वाटा आहे. अशा वेळी या समस्येला तोंड देण्यासाठी लोकांची एकजूट आत्यंतिक महत्त्वाची असून शहनाजला न्याय मिळवून देण्यासाठी लोकांनी उभारलेल्या संघर्षाने त्या एकजुटीचा एक आदर्श घालून दिलेला आहे. या संघर्षामुळे आरोपींना अटक झालीच, त्याचबरोबर स्त्रियांवर होणाऱ्या भीषण अत्याचारांना वाचा फोडत पोलिस आणि प्रशासनाच्या दडपशाहीला न जुमानता एकजुटीने संघर्ष करण्याची प्रेरणा दिलेली आहे. परंतु हा लढा अजून संपलेला नाही. शहनाजवर बलात्कार करून तिची हत्या करणाऱ्या नराधमांना शिक्षा होण्यासाठी लोकांची ही झुंजार एकता टिकवून ठेवावी लागेल, तसेच स्त्रिया व सर्वसमान्य जनतेला वेठीस धरणाऱ्या गुंडतंत्रापासून लोकांच्या संरक्षणाचा आणि मुक्तीचा हा लढा पुढे नेण्यासाठी लोकांची ही एकता अधिक विशाल आणि मजबूत बनवावी लागले.

●

समाज

# जवखेड दलित हत्याकांडाने पुन्हा उघडकीस आणले व्यवस्थेचे वास्तव

## सत्यशोधन समितीचा एक अहवाल

• नारायण

ऑक्टोबर महिन्यात जवखेड येथील जाधव कुटुंबातील तीन व्यक्तींच्या निर्घृण हत्येची सुन्न करणारी घटना घडली आणि ठिकठिकाणी या हत्याकांडाचा निषेध करण्यासाठी तसेच गुन्हेगारांना कडक शिक्षा व्हावी या मागणीसाठी लोक रस्त्यावर उतरले. महाराष्ट्रभर या भीषण हत्याकांडाच्या विरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. ३० ऑक्टोबर रोजी वानखेडे स्टेडियमवर आयोजित भाजप सरकारच्या शपथविधी सोहळ्याच्या वेळीसुद्धा राज्यभरातून आलेल्या आंदोलकांनी या घटनेचा निषेध करून न्यायची मागणी केली. दलित अत्याचार रोखण्यासाठी पुन्हा एकदा निर्धार करण्यात आला आणि त्यानंतर या प्रकरणात पीडित कुटुंबातीलच तिघांना अटक झाल्यानंतर बघता बघता सारे काही थंड पडले.

देशातील दलित अत्याचारांचा इतिहास पाहता जे काही या प्रकरणात घडले त्यात आश्चर्य वाटण्यासारखे खरे तर काहीच नाही. पीडित कुटुंबातील व्यक्तींनाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे, जातीय अत्याचारांच्या प्रकरणांना अनैतिक शरीर संबंधांतून झालेल्या खूनाचे रूप देणे हे गेल्या काही काळापासून वारंवार घडते आहे. या प्रकरणातही पुन्हा तेच पाहावयास मिळाले. त्यानंतर 'दलित अत्याचार विरोधी कृती समिती'च्या सत्यशोधन समितीने पोलिस तपासाचा आढावा घेतला. सत्यशोधन समितीचा अहवाल पोलिस प्रशासनापासून मुख्यमंत्र्यापर्यंत अनेकांच्या या प्रकरणातील भूमिकेवर प्रश्न उपस्थित करणारा आहे. या अहवालाचा काही अंश आणि त्याने उपस्थित केलेले प्रश्न येथे देत आहोत.

हत्याकांडानंतरचा घटनाक्रम.

१५ ते १९ ऑक्टोबर २०१४ – हत्याकांड घडण्याच्या दोन दिवस आधी संजय जाधव यांचा एक कुत्रा व तीन चार दिवस आधी हिराबाई वाघ यांचे दोन कुत्रे संशयास्पदरित्या मृत आढळून आले.

२० ऑक्टोबर २०१४– संजय जाधव, त्यांची पत्नी जयश्री आणि मुलगा सुनील या तिघांची रात्री हत्या.

२१ ऑक्टोबर – घराजवळच्या विहिरीत मृतदेह सापडले. मृतदेहाचे अनेक अवयव न मिळाल्याने अंत्यसंस्कारास कुटुंबियांचा विरोध.

२२ ऑक्टोबर २०१४– मृतदेह शवविच्छेदनासाठी औरंगाबादला नेण्यात आले.

२३ ऑक्टोबर २०१४– मारेकरी सापडेपर्यंत अंत्यसंस्कार करणार नाही, अशी जाधव परिवाराची भूमिका, परंतु पोलिस आणि नेतेमंडळींच्या मंध्यस्थीनंतर मृतदेहांवर अंत्यसंस्कार. पोलिसांनी अनुसूचित जाती, जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ चे कलम ३ (१) (दहा) व कलम ३ (२) (पाच) या प्रकरणी अज्ञात व्यिक्तिविरोधी लागू केले.

२७ ऑक्टोबर– माजी उपमुख्यमंत्री अजित पवार व जातीय अत्याचार विरोधी कृती समितीच्या सत्यशोधन समितीची जवखेडला भेट.

२८ ऑक्टोबर– महाराष्ट्रभर हत्याकांडाच्या निषेधाचा उद्रेक.

३० ऑक्टोबर– जातीय अत्याचार विरोधी कृती समितीच्या सत्यशोधन समितीचा अहवाल मुंबईतील मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात झालेल्या पत्रकार परिषदेत प्रकाशित करण्यात आला.

३१ ऑक्टोबर– दवखेड हत्याकांडातील मारेकरी अद्याप पकडले गेले नाहीत म्हणून महाराष्ट्राचे नवनिर्वाचित मुख्यमंत्र्यांच्या शपथविधी समारोहाच्या निषेधार्थ आंदोलकांची स्टेडियमबाहेर निदर्शने. शेकडो कार्यकर्त्यांना अटक व सुटका.

३ नोव्हेंबर २०१४ – पंकजा मुंडे व दिलीप कांबळे या मंत्र्यांची जवखेडला जाधव परिवाराला भेट.

५ नोव्हेंबर २०१४– पोलिसांनी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पाथर्डी यांच्याकडे खालील सहा लोकांची नार्को टेस्ट करण्यासाठी परवानगी मागितली.

१. हिराबाई अर्जुन वाघ, रा. जवखेड, २. बबन रामकिसन कराडे, रा, कामत हिंगवे, ३. अनिल संतराम कराडे, रा, कामत हिंगवे, ४. बाळू बन्सी माळी, रा. हंडी निमगाव, ५. प्रशांत दिलीप जाधव, रा. जवखेड, ६. अशोक दिलीप जाधव, रा. जवखेड.

१० नोव्हेंबर २०१४– न्यायालयाने वरील सहा जणांच्या नार्को टेस्टला परवानगी दिली. याच दिवशी प्रशांत जाधवच्या ब्रेन मॅपिंग टेस्टमध्ये पोलिसांचा त्याच्यावर संशय बळावला असे 'एबीपी माझा' वृत्तवाहिनीने ३१ डिसेंबरच्या प्रसारणात सांगितले आहे.

१९ नोव्हेंबर २०१४– मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र न्यूज वृत्तवाहिनीला सांगितले, "जवखेडच्या संदर्भात मी रोज माहिती घेतो आहे आणि मला जी लेटेस्ट माहिती पोलिसांनी दिली आहे, त्या प्रकरणामध्ये फोरेन्सिक सायन्सेसची जी मदत एक्सपर्टनी घेतली आहे त्यामध्ये त्यांचा तपास पुष्कळ पुढे गेला आहे आणि लवकरच ते सर्व झिरो डाउन करू शकतील असा विश्वास आजही

त्यांनी माझ्याकडे व्यक्त केला आहे.''

२० नोव्हेंबर २०१४- न्याय दंडाधिकारी, प्रथम वर्ग पाथर्डी यांच्या न्यायालयाकडे पोलिसांनी खालील चार जणांच्या नार्को टेस्ट करण्यासाठी परवानगी मिळावी म्हणून अर्ज केला.

१. दिलीप जगन्नाथ जाधव, रा. जवखेड, २. शारदा दिलीप जाधव, रा. जवखेड, ३. रवींद्र जगन्नाथ जाधव, रा. धवन वस्ती, ४. नाथा फकीर आल्हाट, रा. शेंडी पोखर्डी.

२४ नोव्हेंबर २०१४- रवींद्र जाधव यांनी मुंबई उच्च न्यायालयात पोलिस जाधव परिवाराचा छळ करीत असल्याबाबत शपथपत्र दाखल केले व याच दिवशी सदरबाबत त्यांनी मुख्यमंत्री व पोलिस महासंचालक यांच्या कार्यालयात पत्रे सादर केली.

२५ नोव्हेंबर- मुंबई येथील पत्रकार परिषदेत जाधव परिवाराने पोलिस छळाची माहिती दिली.

२७ नोव्हेंबर- प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी, पाथर्डी यांनी पोलिसांचा दि. २० नोव्हेंबर रोजीचा चार जणांची नार्को टेस्ट करण्यासाठीच्या परवानगीचा अर्ज नामंजूर केला. याच दिवशी टीवी ९ ह्या वृत्तवाहिनीवर अश्विनी जाधव (दिलीप जाधव यांची मुलगी व प्रशांत आणि अशोक यांची बहिण) हिने सांगितले की पोलिसांनी तिला भावांची नावे घेण्यासाठी दीड लाख रुपयांचे बक्षिस देऊ केले व त्यापैकी तीन हजार रुपये आगाऊ रक्कम तिच्या हातात कोंबली व रोज वडिलांना दारू प्यायला पैसे दे व ते काय बोलतात ते सांग व नाव घेतले की बाकी पैसे देऊ, असे पोलिसांनी म्हटल्याचे सांगितले.

२८ नोव्हेंबर- सदर हत्याकांड प्रकरणी अनुसूचित जाती, जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ च्या लागू केलेल्या कलम ३(१) (दहा) व ३(२) (पाच) पैकी कलम ३(१)(दहा) हे कलम कमी केल्याचे पोलिसांनी न्यायालयाला कळवले.

३० नोव्हेंबर- मुख्यमंत्री फडणवीस यांनी अगदी राज्य विधानसभेच्या तोंडावर जवखेडला जाधव परिवाराची भेट घेतली व पोलिसांनी जर या प्रकरणात छडा लावण्यात विलंब केला तर हे प्रकरण सीबीआईकडे देण्यात येईल, असा पोलिसांना इशारा दिला.

३ डिसेंबर- न्यायालयाच्या परवानगीने पोलिसांनी जाधव यांच्या घराची झडती घेतली व रात्रौ ८.४० वा. प्रशांतला अटक केली.

४ डिसेंबर- पोलिसांनी न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, पाथर्डी यांच्या न्यायालयातून प्रशांतला १४ दिवसांची पोलिस कोठडी मंजूर करून घेतली. पोलिसांनी घटना स्थळावरून एक लाकडी दांडा जप्त केला, असे पोलिसांनी त्यांच्या रिमांड अर्जात न्यायलयास सांगितले. न्यायालयाने १३ डिसेंबरपर्यंत प्रशांतला पोलिस कोठडी मंजूर केली, मात्र न्यायालयाच्या रिमांड आदेशात आरोपीच्या घरातून हत्यारे जप्त करण्यात आली, असा बहुवचनी उल्लेख आहे.

त्याच दिवशी प्रवीण साळुंखे, पोलिस महासंचालक (नाशिक रेंज) यांनी पत्रकार परिषद घेऊन प्रशांतच्या अटकेची माहिती दिली व प्रशांतच्या घरातून लाकडी दांडा, पारंपरिक हत्यारे, राख व अर्धवट जळालेले कपडे मिळाल्याचे सांगितले. न्यायवैद्यक शाळेच्या पहिल्या अहवालानुसार व साक्षीदारांचे जवाब, प्रशांतच्या संशयास्पद हालचाली यावरून त्याला अटक करण्यात आली आहे आणि प्रशांतच्या जबाबात एका समाजाविरोधात आरोप होते त्यावरून अनुसूचित जाती, जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमाची कलमे लावण्यात आल्याचे सांगितले. याप्रकरणी पोलिसांवर दबाव आला असल्याचे त्यांनी स्पष्टपणे नाकारले.

७ डिसेंबर- न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, पाथर्डी न्यायालयाने अशोकला १९ डिसेंबर पर्यंत पोलिस कोठडी मंजूर केली. पोलिसांच्या रिमांड अर्जात पूर्वीच घटनास्थळी जप्त केलेल्या एका लाकडी दांड्याचा उल्लेख आहे.

१३ डिसेंबर- प्रशांतला पोलिसांनी संध्याकाळी ४.१५ वाजता न्यायालयात उपस्थित केले व त्याच्या पोलिस कोठडीत मुदतवाढ मागितली व त्याला १७ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी वाढवून देण्यात आली.

१७ डिसेंबर- पोलिसांनी प्रशांतला दि. १७ पासून १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी मागितली. दि. १७ रोजीच्या रिमांड रिपोर्टमध्ये दि. १३ च्या रिमांड रिपोर्टमध्ये उल्लेख केलेल्या मुद्देमालाचाच पुनरुच्चार केला आहे. प्रशांतला न्यायालयाने ३० डिसेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी दिली.

१८ डिसेंबर- दिलीप जाधव (वय ५१) यांना २२.४५ वाजता अटक.

१९ डिसेंबर- दिलीप जाधव यांना २९ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी मंजूर. रिमांड रिपोर्टमध्ये आरोपी अशोक जाधव याने दिलेल्या निवेदनाप्रमाणे यातील मयताचे घरातील मिरी ते घोडेगाव रोडलगतच्या ओढ्यात नेऊन टाकलेले कपडे काढून दिले, ही मुद्देमालाबाबतची नवीन माहिती दिसून येते. पोलिसांनी अशोक याची पोलिस कोठडी आणखी दोन दिवस म्हणजे २१ डिसेंबरपर्यंत वाढवून मागितली.

२१ डिसेंबर- अशोकला दि. ३ जानेवारी २०१५ पर्यंत न्यायालयीन कोठडी मंजूर करण्यात आली.

१ जानेवारी २०१५ - या प्रकरणात लागू करण्यात आलेला अत्याचार प्रतिबंध कायदा पूर्णपणे हटविण्यात आला.

हा एकंदर घटनाक्रम, हत्याकांडानंतरची गावातील परिस्थिती तसेच पीडित कुटुंब व अन्य लोकांकडून मिळणारी माहिती पोलिसांच्या तपासाची दिशा व पद्धत यांवर प्रकाश टाकणारी आहे व त्यातून काही साधे परंतु महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होता ज्यांची उत्तरे अजून मिळायची आहेत.

अशोक आणि प्रशांतची नार्को टेस्ट गुजरातला करण्यात आली. जाताना या दोघांसह इतर सवर्ण समाजातील चार जणांच्या नार्को टेस्ट करण्याची परवानगी घेण्यात आली होती. प्रत्यक्षात 'मेडिकली अनफिट' असल्याचे निमित्त करून इतरांची नार्को टेस्ट करण्यात आली नाही. नार्को टेस्टसाठी परवानगी मागताना या इसमांकडे वेळोवेळी केलेल्या चौकशीत त्यांनी दिलेल्या माहितीत विसंगती आढळून आली असून ते काहीतरी लपवीत असावेत, असे पोलिसांनी म्हटले होते. मग इतरांची नार्को टेस्ट झाली नाही, तर त्यांच्या जबानीत विसंगती आढळून आल्या, त्याचे काय? प्रशांत व अशोक यांच्या नार्को टेस्टमध्ये आक्षेपार्ह असे काय आढळून आले आहे? नार्को

टेस्टला तज्ज्ञ विश्वासार्ह मानीत नाहीत, आणि स्वत:ला गुंतविण्याचे पुराव्याच्या कायद्याला मान्य नाही. मग प्रशांत आणि अशोक यांचीच नार्को टेस्ट एवढी विश्वासार्ह का? चाचणीपूर्वी चार दिवस सतत आपणच गुन्हा केला आहे असा टेप या दोघांना एकवण्यात आला. थर्ड डिग्री वापरून कस्टडीत त्यांचा छळ करण्यात आला.

घटना घडली त्या रात्री पकडण्यात आलेले सर्वजण घरी होते. सकाळी वाघ कुटुंबातील महिलेने फोन करून सांगितल्यावर ते घटनास्थळाकडे गेले. तक्रारही त्यांनीच केली. पोलिस जो तक्रारीतील संशयाचा भाग सांगतात तो मुलांनी सांगितलेला नसून सवर्ण समाजाच्या हिराबाई वाघ या महिलेच्या तोंडची ती वाक्ये आहेत. परंतु हे जाणीवपूर्वक समजून घेतले जात नाही. न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करुन काही आरोपींवर संशय व्यक्त करण्यात आला आहे. मात्र पोलिस त्यांना हात घालत नाहीत, असा पीडित कुटुंबाचा आरोप आहे. घटनेनंतर एक मोबाइल गायब आहे. तो सुनीलचा मोबाइल असून त्यामध्ये बरेचसे फोटो आणि व्हिडिओ क्लिप उपलब्ध होत्या. त्यामुळे घटनेमागचे बरेचसे धागेदोरे उघड झाले असते, म्हणूनच हा मोबाइल गायब करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

घटना घडल्या दिवसापासून संशय व्यक्त करण्यात आलेल्या सवर्ण कुटुंबाच्या शेताच्या कामावरील मजुराचा मुलगा गायब आहे. नंतर ते कुटुंबही निघून गेल्याचे बोलले जाते. त्याची चौकशीदेखील पोलिसांनी केलेली नाही. घटना घडली त्या ठिकाणापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या सवर्ण समाजाच्या कुटुंबाला या क्रूर हत्याकांडा दरम्यान किंकाळ्या कशा ऐकू गेल्या नाहीत? घटनेच्या आधी पाळीव कुत्र्याचा जीव घेण्यात आला. त्याचा गाजावाजा का झाला नाही? २१ ऑक्टोबर रोजी विहिरीतून मृतांचे देह बाहेर काढताना सगळा जाधव परिवार तेथे होते. अर्थात दिलीप, प्रशांत आणि अशोकही तेथेच होते. तेव्हा पोलिसांनी श्वान पथकाचा वापर केला होता. मात्र जाधव परिवारातील कुणालाच पकडले नाही. प्रशिक्षित श्वान पथकाचा दोन वेळा वापर करण्यात आला, मात्र वाघांच्या परिवारातील कुणीही तेव्हा कुत्र्यांच्या आसपास नव्हते. विहिरीतून प्रेते बाहेर काढताना वाघ परिवारातील मंडळी तेथे का फिरकली नाहीत?

जाधव मंडळींचे एक शेत संजय जाधव व हिराबाई वाघ यांच्या घराच्या मध्ये आहे. तेथे मृतांवर अंत्यसंस्कार झाला, त्यावेळी त्या जागेत अंत्यसंस्कार करण्यास हिराबाईने हरकत घेतली होती, असे का? संजय जाधवांच्या शेतावरील घरात कुणी नाही याची खबर जाधव वस्तीमधल्या जाधव परिवाराला सर्वप्रथम हिराबाईने संजयच्या मोबाइल हॅंडसेटवरून फोन करून दिली. सदर कॉल प्रशांतने घेतला होता. संजयचा हॅंडसेट घरात पडलेला तिला सापडला, असे हिराबाईचे म्हणणे आहे. संजयला साप चावला आहे असे हिराबाईने प्रशांतला सांगितले. घरात सुनील आणि जयश्रीही होते, मग संजयलाच साप चावला असे हिराबाई का म्हणते? साप चावल्यामुळे संजयचे कुटुंब एखाद्या इस्पितळात गेले असावे ह्या कल्पनेने जाधव मंडळींनी प्रथम इस्पितळे पालथी घातली. संजयचा फोन हिराबाईला सापडला पण सुनीलचा फोन सापडत नाही. या मोबाइलमधून महत्त्वपूर्ण तपशील मिळू शकतो. सुनीलचा मोबाइल क्रमांक उपलब्ध आहे, त्यावरून कंपनीकडून निश्चितच तपशील मिळू शकेल, पण त्या दिशेने पोलिस काहीच हालचाली का करत नाहीत?

३ डिसेंबर २०१४ रोजी पोलिसांनी प्रशांतच्या पोलिस कोठडीत १७ डिसेंबर रोजीपर्यंत मुदतवाढ मागितली. त्यावेळच्या त्यांच्या रिमांड पेपर्समध्ये पुढील तपशील दिसून येतो– १. लाकडी दांडा – घटनास्थळी मिळालेला. २. नितीन जाधन, दिलीप जाधव, मोहन तिजोरे यांचे झाडाझडतीत मिळालेले कुऱ्हाडी, कोयते, खोश्या, करवत, नान चाकू, लाल रंगाचे डाग असलेले कपडे, सिमकार्ड वगैरे ३. कमांडर जिप क्र. एमएच १५ के ६७६० ४. आरोपी प्रशांत जाधव याने दिलेल्या निवेदनाप्रमाणे त्याच्या शर्टाच्या बाहीचा तुकडा व त्याने घटनेच्या वेळी पायात घातलेली चप्पल जोड, अर्धवट जळलेल्या काड्या, कोळसा, जळालेल्या ठिकाणची माती व साधी माती. ५. आरोपी अशोक जाधव याने दिलेल्या निवेदनाप्रमाणे त्याने जाळलेल्या कपड्याचा तुकडा व उकीरड्यावरील कपडे जाळल्याची राख. १९ डिसेंबर रोजी पोलिसांच्या रिमांड पेपरमध्ये पुढील नवी बाब दिसून येते. ६. आरोपी अशोक जाधव याने दिलेल्या निवेदनाप्रमाणे यातील मयताचे घरातील मिरी ते घोडेगाव रोडलगतच्या ओढ्यात नेऊन टाकलेले कपडे काढून घेतले. दिलीप जाधव, नितीन जाधव व मोहन तिजोरे यांच्या झाडाझडतीत कुऱ्हाडी, कोयते, खोश्या, नान चाकू इत्यादी हत्यारे मिळाल्याचे रिमांड पेपरमध्ये पोलिस म्हणत असले तरी कोणाकडून नेमकी कोणती हत्यारे व किती मिळाली याचा तपशील रिमांड पेरमध्ये नाही. कुऱ्हाड आणि कोयता ही शेतीची अवजारे प्रत्येक शेतकऱ्याच्या घरात असतातच. शिवाय सिमकार्डही आता ग्रामीण भागांत सर्वसामान्य बाब आहे. या साऱ्या गोष्टींचा नेमका काय उपयोग करण्यात आला हा तपशील रिमांड पेपर्समध्ये नाही. पुरावा नष्ट करण्यासाठी जाळण्यात आलेले कपडे, त्यांची राख, त्यातील अर्धवट जळलेल्या काड्या, त्यांचा कोळसा तेथे टाकल्यापासून पोलिसांनी ते जप्त करीपर्यंतचा कालावधी किती आहे? इतका वेळ या साऱ्या गोष्टी जशाच्या तश्या तेथे पडून होत्या? जळलेल्या कपड्याची राख, अर्धवट जळलेल्या काड्या उडून नाही गेल्या? ३० ऑक्टोबर पासून दोन, तीन दिवस नगर परिसरात पाऊस झाल्याचे कळते. अशा परिस्थितीत या साऱ्या गोष्टी पोलिसांची वाट पाहत आज्ञाधारकपणे तिथेच स्वस्थ बसून होत्या का? मिरी घोडेगाव रोडवरील ओढ्यात मयताचे घरातील कपडे नेऊन टाकले होते तर ते पडलेल्या पाण्यात वाहून का नाही गेले? वाऱ्याने उडून का नाही गेले? कुत्र्याने किंवा कुणीही आजपर्यंत त्यांना जागेवरून हलवलेसुद्धा नाही, हे कसे काय? शिवाय संजय यांच्या घरातून त्यांचे कपडे नेऊन ओढ्यात टाकण्याचे प्रयोजन काय? पोलिस मयताच्या घरातील कपडे म्हणतात, अंगावरील कपडे म्हणत नाहीत.

१३ डिसेंबर २०१४ च्या रिमांड पेपरमध्ये जप्त केलेल्या बाबींमध्ये क्रमांक ३ वर कमांडर जीप क्र. एम. एच. १५ के. ६७६० या वाहनाचा उल्लेख आहे. मात्र पोलिस कोठडीत

पोलिसांनी केलेल्या तपासाचा संक्षिप्त गोषवारा रिमांड पेपरमध्ये दिलेला आहे. त्यात या जीपचा काही संदर्भ येत नाही व वाहन म्हणून जीप गुन्ह्यात वापरली आहे, असा कोणताच संदर्भ नाही, तर मग या जीपचा नेमका संदर्भ काय? समितीला सांगण्यात आले की प्रशांतच्या अटकेनंतर प्रशांतच्या मामी कांता तिजोरे यांनी कोर्टाच्या आवारातच पोलिसांना शिवीगाळ केली आणि त्याच्याच सूडासाठी जवखेडहून पाच किलोमीटर अंतरावरील कासार पिंपळगावमध्ये राहणाऱ्या कांता तिजोरेंच्या घरासमोर उभे असलेले त्यांचे हे वाहन पोलिसांनी धक्के देत पाथर्डी पोलिस ठाण्यात आणून जमा केले. हे एक वाहन पोलिसांनी जमा केले असले तरी पोलिस अटकेतील जाधव कुटुंबियांकडे अद्याप वाहनाची चौकशी करत आहेत, असे नंतरच्या रिमांड पेपरवरून दिसून येते. पोलिसांना त्यांच्याकडून ना धारदार शस्त्रे मिळाली, ना वाहनाचा संदर्भ जोडता आला, ना या कृत्यामागचे कारण पोलिस शोधून काढू शकले. जाधव परिवारातील व्यक्तींच्या अटकांमधून काय निष्पन्न होते?

हत्येच्या दिवसापासून म्हणजे २१ ऑक्टोबरपासून हिराबाई बाघच्या घराशेजारी एक मोठी पोलिस वॅन संरक्षणासाठी तैनात केली होती. हिराबाईच्या परिवाराला एवढे संरक्षण कशासाठी?पोलिसांनी तिथपर्यंत श्वानपथकेही का नेली नाहीत? याउलट पीडित जाधव कुटुंबाला जास्तीत जास्त एकटे पाडण्याचा प्रयत्न पोलिसांनी केल्याचे दिसून येते. सर्वात कळस म्हणजे जाधव परिवाराची बँक खाती गोठवून त्याची चौकशी करण्याचा पोलिसांना स्थानिक न्यायालयाने आदेश दिला. या तपासामुळे पोलिसांच्या निष्कर्षाला बळकटी मिळेल, असे मत पोलिस महासंचालक (नाशिक रेंज) प्रवीण साळुंखे यांनी द हिंदू या इंग्रजी दैनिकाकडे व्यक्त केले (३० डिसेंबर). तसेच १९ नोव्हेंबरच्या मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यावरून त्यांना या प्रकरणात तपास कोणत्या दिशेने चालला आहे याची पुरेपूर माहिती होती, व पोलिसांच्या नजरेत जाधव परिवारच मुख्य संशयित आहे हेदेखील त्यांना ठाऊक होते. मग ३० नोव्हेंबर रोजी पोलिसांच्या नजरेत गुन्हेगार असणाऱ्या या परिवाराला भेटण्यासाठी मुख्यमंत्री कशासाठी गेले? तेही ऐन विधानसभा अधिवेशनाच्या तोंडावर?

यासारखे अनेक प्रश्न दलित अत्याचार विरोधी कृती समितीच्या अहवालातून पुढे आलेले आहेत. देशभरात घडणाऱ्या दलित अत्याचाराच्या घटना आणि त्यांचा पोलिस तपास व न्यायालयीन निवाड्यांचा इतिहास पाहता देशातील पोलिस तसेच न्यायव्यवस्थासुद्धा जातिव्यवस्थेच्या प्रभावातून मुक्त नसल्याचे वारंवार दिसून आले आहे. भवरी देवी प्रकरण, झज्जर, बथानीटोला, लक्ष्मणपूर बाथे इत्यादी घटनांनी प्रशासन व न्यायव्यवस्थेची लक्तरेच वेशीवर टांगली. त्याची पुनरावृत्ती पुन्हा जवखेडला झाल्यास आश्चर्य नाही, परंतु पोलिसांनी पीडित कुटुंबातील लोकांनाच संशयित म्हणून अटक करताच ताबडतोब रस्त्यावर उतरलेले बहुतेक आंदोलनकर्ते आपापल्या घरी निघून जातात, आंदोलन थंड पडते, याला काय म्हणावे? येता जाता पोलिसांना नावं ठेवणाऱ्या लोकांचा दलित हत्याकांडांच्या बाबतील पोलिसांच्या म्हणण्यावर लगेच विश्वास कसा काय बसतो? या प्रकरणाचे न्यायालयात काय होते ते येणारा काळ सांगेल. सध्या तरी जाधव कुटुंबीय एकटे पडले आहे. हे असे कां व्हावे? आंदोलनकर्त्यांमध्ये व्यावहारिक शहाणपण आणि व्यापक संघटनाचा अभाव आहे का? या प्रश्नांची उत्तरेदेखील या निमित्ताने शोधावी लागतील.

## सुप्रसिद्ध मराठी साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर 'कुसुमाग्रज' यांच्या जन्मदिवसानिमित्त (२७ फेब्रुवारी) त्यांची एक कविता



### आश्चर्य

ती आदिवासी म्हातारी
प्राणांतिक भयाने धडपडत
डोंगराच्या कडेला गेली
आणि चिकटून उभी राहिली
पालीसारखी खडकाला.
उघडीवाघडी
हजार सुरकुत्यांच्या कातडीत कोंबलेली
हाडांची जीर्णाकृती.
मी क्षणभर आदिवासी झालो
आणि तिच्याकडे पाहिलं,
अहो आश्चर्य -
तिच्या एका थानाच्या गाठोळीवरून
लोंबत होतं आपलं पार्लमेंट
आणि दुसऱ्या गाठोळीवरून लोंबत होतं
आमचं साहित्यसंमेलन.

श्रद्धांजली

# कॉम्रेड गोविंद पानसरेंच्या बलिदानानंतर...

कोल्हापूरमध्ये फॅसिस्ट गुंडांकडून झालेल्या गोळीबारामध्ये जखमी झालेल्या कॉम्रेड गोविंद पानसरेंचा २० फेब्रुवारी, २०१५ ला मुंबईमध्ये मृत्यू झाला. पानसरेंचा मृत्यू म्हणजे एकूण लोकशाही आंदोलनाचे जबर नुकसान आहे. मात्र अशा हौतात्म्यामुळे समाजाची जेवढी हानी होते तेवढीच परिवर्तनाचा लढा बळकट करण्याची ऊर्जाही त्यामध्ये सामावलेली असते! कॉ. पानसरे यांच्याशी राजकीय मतभेद बाळगूनही परिवर्तनाच्या लढ्यातील ते अत्यंत आदरणीय व अनुकरणीय सैनिक होते, हे कोणालाही नाकारता येणार नाही. त्यांच्यातील अक्षय ऊर्जा, अखंड काम करण्याची क्षमता, वैचारिक लढा आणि रस्त्यावरचा वास्तविक संघर्ष यांची सांगड घालण्याची दुर्मीळ हातोटी आणि संघटनशक्ती परिवर्तनाच्या लढ्यातील नव्या फळीने आत्मसात केली पाहिजे. दीड वर्षापूर्वी अगदी ह्याच पद्धतीने अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या नरेंद्र दाभोलकरांची हत्या करण्यात आली होती. चौकशीच्या सगळ्या फार्सनंतरही त्यांचे खुनी अद्याप मोकाट आहेत. कॉम्रेड गोविंद पानसरेंच्या खुनाचा तपास ज्या दिशेने जात आहे त्यातून फार काही निष्पन्न होण्याची शक्यता नाही, हे स्पष्ट झालेले आहे. विधानसभा अधिवेशनात त्यांच्या निधनाचा शोकप्रस्ताव आणण्याची मागणी झिडकारून महाराष्ट्र सरकारने आपली ''वैचारिक बांधिलकी'' जपलेली असली तरी येणाऱ्या पिढ्या पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीत कॉ. पानसरेंच्या भरीव योगदानाची दखल घेतल्यावाचून राहणार नाहीत!



आपल्या राजकारणासाठी शिवाजीचा विकृत इतिहास लोकांसमोर उभा करू पाहणाऱ्यांच्या प्रयत्नांना 'शिवाजी कोण होता?' या पुस्तिकेद्वारे पानसरेंनी सुरुंग लावला. 'मुस्लिमांचे लाड?' या पुस्तिकेतून मुसलमान समाजाचे वास्तव मांडून जनतेमध्ये द्वेषाचे विष पसरवणाऱ्यांचा त्यांनी बुरखा फाडला. २६/११ च्या मुंबई हल्ल्यात बळी गेलेले पोलिस अधिकारी हेमंत करकरेंच्या मृत्यूचे प्रस्थापित मिथक तोडणाऱ्या एस.एम. मुश्रीफ लिखित 'WHO KILLED KARAKARE?' या पुस्तकावर, समस्त प्रतिक्रियावादी शक्तेंचा विरोध मोडून काढत, त्यांनी काही महिन्यांपूर्वी कोल्हापूरात परिसंवाद घडवून आणला. तथाकथित राष्ट्रवाद्यांचे सत्यस्वरूप समाजासमोर आणण्यासाठी ह्या विषयावर मार्च, २०१५ पासून सबंध महाराष्ट्रामध्ये १५० परिसंवाद घडवून आणण्याचा त्यांचा मानस होता. तत्पूर्वीच त्यांच्या झालेल्या हत्येमागे कोणत्या शक्ती आहेत हे ओळखणे कठीण नाही.

या हत्येच्या विरोधात कायदेशीर लढाई लढलीच पाहिजे, हल्लेखोर शक्तींच्या विरोधात वैचारिक लढाही चालवला पाहिजे, परंतु फॅसिस्ट शक्तींना रोखण्यासाठी तेवढे पुरेसे नाही, त्यांचा प्रतिकार रस्त्यावर करावाच लागतो, हे इतिहासाने दाखवून दिलेले आहे. देशातील कष्टकऱ्यांनी, कामगारांनी, विद्यार्थ्यांनी ही जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली पाहिजे. संवैधानिक चौकटीमध्ये उपलब्ध लोकशाही 'स्पेस' आपण अधिकाधिक उपयोगात आणायलाच हवा, पण त्याच वेळी त्याच्या मर्यादाही लक्षात घ्यायला हव्या. आज दाभोलकर आणि कॉम्रेड पानसरेंच्या हत्येबद्दल केवळ शोक करत बसणे पुरेसे नाही तर त्यांच्या जुंझार जीवनापासून प्रेरणा, शक्ती घेऊन आणि त्यांच्या बलिदानापासून योग्य धडा घेऊन आपणास फॅसिस्ट शक्तींच्या विरोधातील दीर्घ लढाईची तयारी करावी लागणार आहे. कॉ. पानसरेंना 'स्फुलिंग'ची श्रद्धांजली.






**कॉ. पानसरे यांच्या हत्येच्या निषेधार्थ मुंबईत झालेली निदर्शने**

# आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त (८ मार्च)
# कात्यायनी यांच्या निवडक कविता

### १. या स्त्रीला घाबरून असा...

ही स्त्री सारे काही जाणते
पिंजऱ्याबद्दल
जाळ्याबद्दल
यातनागृहांबद्दल
तिला विचारा.
पिंजऱ्याबद्दल विचारा
ती सांगते
निळ्या अनंत विस्तारात
उडण्याच्या रोमांचाबद्दल.
जाळ्याबद्दल विचारताच
खोल खोल समुद्रात
हरवून जाण्याच्या
स्वप्नाबद्दल
बोलू लागते.
यातनागृहांचा विषय काढताच
गाऊ लागते
प्रेमाबद्दलचे एक गाणे.
रहस्यमय आहे या स्त्रीचा असंगतपणा.
तो समजून घ्या.
या स्त्रीला घाबरून असा.

### २. देह न होणे

एक दिवस
स्त्री
देह होत नाही
आणि
उलथेपालथे होऊन जाते
सारे विश्व
अचानक



### ३. स्त्रीचे भाषेत लपणे...

न जाणे काय सुचलं
एक दिवस
स्त्रीला
खेळता खेळता पळत जाऊन
भाषेमध्ये सामावून गेली.
लपून बसली.
त्या दिवशी
हुकुमशहांना
झोप आली नाही रात्रभर.
त्या दिवशी
खेळू शकले नाहीत कविगण
अग्निकुंडातील सन्मान्य ज्वलंत शब्दांशी.
भाषा सारी रात्र मूक राहिली.
रुद्रविणेवर कुठलासा प्रचंड राग वाजत
राहिला.
फक्त मुलं
निर्भय
गल्लिबोळांतून खेळत राहिली...

### ४. स्त्रीचे एकांतात विचार करणे

एक मोकळा श्वास घेण्यासाठी
स्त्री आपल्या एकांताला बोलावते.
स्त्री एकांताला स्पर्श करते,
संवाद साधते त्याच्याशी.
जगते,
पान करते त्याचं मूकपणे.
एक दिवस
ती काहीच सांगत नाही आपल्या
एकांताला,
कोणताच प्रयत्न करत नाही दुःख वाटून
घेण्याचा,
फक्त विचार करते.
जशी ती विचार करू लागते
एकांतात,
निर्णयापर्यंत पोहोचण्याआधीच
धोकादायक घोषित केली जाते.

## चांगल्या जीवनाचा मार्ग चांगल्या पुस्तकांमधून जात असतो

# जनचेतना

**एक वैचारिक मोहीम, एक सांस्कृतिक अभियान**

जवळपास अडीज दशकांपूर्वी प्रगतिशील, लोकपक्षधर साहित्य प्रत्येक माणसापर्यंत घेऊन जाण्याच्या मोहिमेची मोठ्या महत्त्वाकांक्षेसह एक लहानशी सुरुवात झाली. एक छोटेसे दुकान आणि फूटपाथवर, मोहल्ल्यांमध्ये आणि कार्यालयांसमोर लहानसहान प्रदर्शने लावणाऱ्या तसेच सायकलवर, ठेल्यांवर, झोळ्यांमध्ये भरून घराघरात पुस्तके पोहोचविणाऱ्या समर्पित स्वयंसेवकांची टीम – सुरुवात फक्त येथूनच झाली. आज हे वैचारिक अभियान भारतातील अनेक शहरांपर्यंत आणि गावांपर्यंत जाऊन पोहोचले आहे. जनचेतना ठिकठिकाणी वेगवेगळ्या भाषांतील साहित्य आणि कला–सामुग्रीसह स्वप्ने आणि विचार घेऊन जात आहे, जीवन–संघर्ष–सृजन–प्रगतीची घोषणा घेऊन जात आहे. हा या स्वरूपाचा एक अनोखा प्रयत्न आहे. एकाही पगारी कर्मचाऱ्याशिवाय, समर्पित स्वयंसेवक आणि वेगवेगळ्या सहयोगी लोकसंघटनांच्या कार्यकर्त्यांच्या बळावर हा प्रकल्प पुढे जात आहे. या, आपण सर्व या मोहिमेत आमचे सहयात्री बना!

**मुख्य केंद्र : डी-६८, निरालानगर, लखनौ – २२६०२०**

**दूरध्वनी – ०५२२-२७८६७८२**

**मुंबईतील केंद्र**

**रूम नं. ७, धनलक्ष्मी कोऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी,**

**प्लॉट नं. बी-१६, सेक्टर १२, खारघर ४१०२१०**

**संपर्क: ९७६९९०३५८९, ९६१९०३९७९३.**

राहुल फाउंडेशन, परिकल्पना प्रकाशन, अनुराग ट्रस्ट, शहीद भगतसिंह यादगारी प्रकाशन, दस्तक प्रकाशन आणि अरविंद स्मृति न्यासच्या पुस्तकांचे मुख्य वितरक. विस्तृत पुस्तक–सूचीसाठी संपर्क करावा किंवा वेबसाइट पाहावी.

**ईमेल: info@janchetnabooks.org**

**वेबसाइट:http://janchetnabooks.org**

# संपवा भांडवलाचे राज्य
# लढा आणि निर्माण करा लोकस्वराज्य!!



आम्ही भांडवली संसदीय लोकशाहीची खर्चिक धोकेबाजी, लूटतंत्र आणि दमनतंत्रास मुळापासून नाकारतो. आम्ही पंचायत राजचा कपटपूर्ण सरकारी तमाशासुद्धा मुळापासून नाकारतो. काळाच्या गर्भात आज महत्त्वपूर्ण बदलांची बीजे अंकुरत आहेत. पर्याय निर्माण करण्यासाठी त्यांनाच पुढे यावे लागेल जे नाडले जात आहेत, लुटले जात आहेत आणि आवाज उठवताच चिरडले जात आहेत. या व्यवस्थेत ज्यांचे काहीच भविष्य नाही त्यांनाच पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यासाठी पुढे यावे लागेल.

साम्राज्यवाद आणि भांडवलशाहीचा एक एक दिवस आपल्याला जड जातो आहे. ही घुसमट, ही दुर्गंधी आता जिवंत माणसाच्या सहनशक्तीच्या पलीकडे गेली आहे. आपल्याला उठावे लागेल आणि आपल्या जिवंत असण्याचा पुरावा द्यावा लागेल, अन्यथा येणाऱ्या पिढ्यांना इतिहास काय सांगेल की आपण काय करत होतो जेव्हा देश ज्वालामुखीच्या तोंडावर उभा होता, दुर्दशेच्या नरककुंडात होरपळत होता?

हेच कारण आहे की आम्ही जागतिक भांडवलशाहीशी नालबद्ध भांडवली व्यवस्था चकनाचूर करून एकूण समाजाच्या आर्थिक आधाराची आणि वरच्या संरचनेची न्याय आणि समतेच्या तत्त्वावर पुनर्रचना करण्यासाठी लोकस्वराज्याची घोषणा देत आहोत. या घोषणेचा अर्थ आहे – उत्पादन, शासन आणि समाजाच्या संपूर्ण संरचनेवर उत्पादन करणाऱ्या सामाजिक वर्गाचा ताबा असेल, निर्णयाचा संपूर्ण अधिकार त्यांच्या हाती असेल. या घोषणेचे सारतत्त्व आहे – संपूर्ण सत्ता कष्टकऱ्याच्या हाती!

... परिवर्तनेच्छुक विद्यार्थी–युवकांना नव्याने आपल्या क्रांतिकारी संघटना आणि झुंजार संघर्ष संघटित करावे लागतील आणि त्यांना कष्टकऱ्यांच्या सघर्षाशी जोडावे लागेल. त्यांना भगतसिंहांचा संदेश स्मरून क्रांतीचा संदेश कारखान्यांपर्यंत आणि शेतीवाडीपर्यंत घेऊन जावा लागेल. क्रांतिकारी बुद्धिजीवींना एका नव्या सर्वहारा पुनर्जागरणाचे आणि प्रबोधनाचे कार्यभार पूर्ण करण्याच्या कामी स्वत:ला झोकून द्यावे लागेल. अर्धी लोकसंख्या असलेल्या स्त्रियांच्या भागीदारीवाचून कोणतेही सामाजिक परिवर्तन शक्य नाही. कष्टकरी, विद्यार्थी–युवक, बुद्धिजीवी या सर्वच आघाड्यांवर स्त्रियांची भागीदारी वाढविणे ही यशाची मूलभूत शर्त आहे. त्याचबरोबर स्त्री आंदोलनाला कुलीन मध्यमवर्गीय वर्तुळाच्या, एन.जी.ओ.मार्गी सुधारणावादी चिखलातून आणि निष्क्रिय, चर्चावादी, अस्मितावादी वैचारिक संभ्रमांच्या दलदलीतून बाहेर काढून त्याला झुंजार, संघर्षशील आणि व्यवस्था–परिवर्तनवादी दिशा द्यावी लागेल.

## बिगुल मजदूर दस्ता, नौजवान भारत सभा, यूनीव्हर्सिटी कम्युनिटी फॉर डेमॉक्रेसी एण्ड इक्वॉलिटी ( UCDE ), दिशा छात्र संगठन, स्त्री मुक्ति लीग

### तर्फे चालविल्या जाणाऱ्या

## 'क्रांतिकारी लोकस्वराज्य अभियान' तर्फे प्रसिद्ध

संपर्क : रूम नं. ७, धनलक्ष्मी कोऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, प्लॉट नं. बी–१६, सेक्टर १२, खारघर ४१०२१०
फोन: ९७६९९०३५८९, ९६१९०३९७९३. ईमेल – ucde.mu@gmail.com